मंगळवार
३
फेब्रुवारी २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : ३२९
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

# अजिंक्य भारत

बातम्यांचा गतिमान पाठलाग



शून्यावर आऊट होऊनही आयुष म्हात्रे मॅचविनर
(पान ७ वर)

# संसदेत चीन-पाकिस्तानचा मुद्दा!

## माजी लष्कर प्रमुखांच्या पुस्तकामुळे गोंधळ; राहुल गांधींचा माइक बंद करण्याचे निर्देश

**नवी दिल्ली: दि. २ वृत्तसंस्था**

लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर धन्यवाद प्रस्तावावर चर्चा सुरू असताना विरोधी पक्षनेते राहुल गांधी बोलायला उभे राहिले आणि सभागृहात गोंधळ उडाला. राहुल गांधी यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच माजी लष्करप्रमुख मनोज मुकुंद नरवणे यांच्या आत्मचरित्रातील एक संदर्भ दिला. या उल्लेखात डोकलाम आणि चीनचा संदर्भ असल्याने सत्ताधाऱ्यांकडून आक्षेप घेण्यात आला.

राहुल गांधी म्हणाले की, नरवणे यांच्या पुस्तकात डोकलाममध्ये चार चीनी टँक भारताच्या हद्दीत येण्याच्या अगदी जवळ पोहोचले होते, असा उल्लेख आहे. "हे मी बनवून सांगत नाही. जे लिहिलं आहे तेच वाचतोय. यावरून कोण देशभक्त आहे आणि कोण नाही हे समजेल," असे राहुल गांधी यांनी सांगितले. मात्र असे बोलताच संरक्षणमंत्री राजनाथ सिंह उभे राहिले.



### सभागृहाची कार्यवाही स्थगित

राहुल गांधींच्या सुमारे ४६ मिनिटांच्या भाषणात संरक्षणमंत्री, गृहमंत्री, संसदीय कामकाज मंत्री आणि सत्ताधारी पक्षातील खासदारांनी वारंवार आक्षेप घेतले. विरोधकांकडूनही जोरदार प्रतिवाद झाला. समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी चीनचा मुद्दा देशाच्या सुरक्षेशी संबंधित असल्याने चर्चा होऊ द्यावी, अशी मागणी केली. मात्र गोंधळ वाढतच गेला. अखेर लोकसभा अध्यक्षांनी सभागृहाची कार्यवाही स्थगित केली.

त्यांनी स्पष्टपणे विचारले की, ज्या पुस्तकाचा उल्लेख केला जात आहे ते पुस्तक प्रकाशित झाले आहे की नाही, हे आधी सांगावे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनीही राहुल गांधींना नियमांची आठवण करून दिली आणि "ऑथेंटिक पुरावा असेल तरच सदनात मांडावा," असे सांगितले. राहुल गांधींनी मात्र हे सर्व शंभर टक्के खरे असून, नरवणे यांच्या पुस्तकात पंतप्रधान आणि संरक्षणमंत्र्यांचा थेट उल्लेख असल्याचा दावा केला. यावर गृहमंत्री अमित शाह यांनी हस्तक्षेप करत सांगितले की, हा उल्लेख कोणत्याही प्रकाशित पुस्तकाचा नाही, तर एका मॅगझिनमधील लेखाचा आहे.

"मॅगझिन काहीही छापू शकते. नरवणे यांनी असे विधान केल्याचे आम्हाला माहीत नाही," असे अमित शाह म्हणाले. लोकसभा अध्यक्षांनी सांगितले की, सदनात केवळ अधिकृतरीत्या प्रकाशित मजकूर किंवा वृत्तपत्रातील कात्रणच ग्राह्य धरले जाऊ शकते.

अप्रकाशित पुस्तकाचा किंवा अप्रमाणित मजकुराचा उल्लेख नियमबाह्य आहे. यानंतर अध्यक्षांनी राहुल गांधींचा माइक बंद करण्याचे निर्देश दिले.

# हरित महाराष्ट्रसाठी ३०० कोटी वृक्ष लागवड मिशन राबवा : मुख्यमंत्री फडणवीस

## हरित महाराष्ट्र प्राधिकरण स्थापनेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश

**मुंबई : दि. २ वृत्तसंस्था**

पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाशी लढा आणि ग्रामीण रोजगार निर्मिती या त्रिसूत्रीवर महाराष्ट्रातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी २०२६ ते २०३१ या कालावधीत ३०० कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घ्यावा. वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमात या क्षेत्रातील तज्ज्ञ, स्वयंसेवी संस्था याच्याबरोबरच स्टार्टअपचा सहभाग घ्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

प्रस्तावित हरित प्राधिकरण - ३०० कोटी वृक्ष लागवड मिशन संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी आढावा बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, राज्यातील वनक्षेत्र ३३ टक्के करण्यासाठी मिशन मोडवर हा कार्यक्रम हाती घ्यावा. या कार्यक्रमाच्या



समन्वयासाठी हरित महाराष्ट्र प्राधिकरण स्थापन करण्यासाठीचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत सादर करावा. शासकीय विभाग, विविध संस्थाबरोबरच या विषयातील स्टार्टअपचा सहभाग या मोहिमेसाठी घ्यावा.स्टार्टअपची इकोसिस्टीम तयार करून रोजगार निर्मिती करता येईल. मराठवाड्यासारख्या कमी वृक्षाच्छादन असलेल्या भागात हा कार्यक्रम प्राधान्याने राबविण्यात यावा. हरित महाराष्ट्र उपक्रमांतर्गत रोप उपलब्धतेनुसार पहिल्या वर्षात सुमारे २० कोटीपर्यंत वृक्ष लागवड हाती घ्यावी. यामध्ये बांबू, (पान २ वर)

### मिशनची अंमलबजावणी

या मिशनची अंमलबजावणी डिजिटल व उपग्रह-आधारित रिअल-टाईम निरीक्षण प्रणालीद्वारे होणार असून, लागवड आणि वृक्ष जगण्याचा दर पारदर्शकपणे नोंदवला जाणार आहे. झाडे जिवंत असण्याचा दर, जंगलाची निर्मिती आणि रोपांच्या वाढीची नियमित तपासणी करण्यात येणार आहे. मनरेगा, कॅम्पा, कृषी विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या योजनांद्वारे तीन ते पाच वर्षांची निगा सुनिश्चित करण्यात आली आहे. तथापी वृक्ष जगण्यासाठी हा कालावधी १० वर्ष करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रमातून भूजल पुनर्भरण, मातीची सुपीकता, जैवविविधता वाढीसोबतच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होणार आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

## थोडक्यात

### कात्रज दूध संघाला 'अजितदादा' यांचे नाव



**पुणे:** पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित (कात्रज) या संघाला आता 'अजितदादा पवार पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ, कात्रज' असे नाव देण्याचा निर्णय संघाच्या संचालक मंडळाने सर्वानुमते घेतला आहे. संचालक मंडळाच्या बैठकीत हा ठराव मंजूर करण्यात आला. संघाच्या वार्षिक सभेला उपस्थित राहून त्यांनी संघटनेच्या कामकाजासाठी, तिच्या विस्तार योजनेसाठी आणि प्रशासकीय समन्वयासाठी महत्त्वाचे धडे दिले. पवार कुटुंबाच्या विविध सहकारी आणि संघ उपक्रमांना त्यांच्या सहकार्याचा सतत फायदा होत आहे. संघाच्या विकासाच्या महत्त्वाच्या टप्प्यांमध्ये, विशेषतः पायाभूत सुविधा वाढविण्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्याच्या प्रक्रियेत आणि दीर्घकालीन नियोजनात अजितदादा पवार यांची भूमिका खूप महत्त्वाची होती.

### पिंपरी चिंचवडच्या महापौरपदी रवी लांडगे



**पिंपरी चिंचवड :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रिक्त असलेल्या महापौर पदासाठी आज झालेल्या विशेष सभेत रवी लांडगे यांची अधिकृतपणे निवड करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत भाजपने आपले पहिले खाते उघडले असून, प्रभाग क्रमांक ६ 'ब' मधून रवी लांडगे यांची बिनविरोध निवड झाली आहे. अन्य उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्याने रवी लांडगे यांची निवड बिनविरोध झाल्याचे घोषित करण्यात आले. पिंपरी चिंचवडच्या महापौर पदी भाजपचे रवी लांडगे यांच्या नावावर प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी शिक्कामोर्तब केले आहे. मात्र, या निवडीमुळे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांची संधी हुकल्याची चर्चा आहे.

### बंगालच्या लोकांना त्रास देणे थांबवावे



**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी दिल्लीत येताच केंद्र सरकार आणि दिल्ली पोलिसांवर जोरदार हल्ला चढवला. त्यांनी आरोप केला, की बंगालला जाणूनबुजून बदनाम केले जात आहे आणि केंद्रीय संस्था भाजपच्या इशाऱ्यावर काम करत आहेत. ममता बॅनर्जी यांनी चाणक्यपुरी येथील बंग भवनला भेट देण्याचा आपला हेतू स्पष्ट केला आहे. यावेळी त्या दिल्ली पोलिसांनी केलेल्या कथित अत्याचारांबद्दल जाणून घेण्यासाठी बंगालमधील लोकांशी भेटतील. दिल्ली पोलिसांनी बंगालच्या लोकांना त्रास देणे आणि छळ करणे थांबवावे, असे देखील ममता बॅनर्जी म्हणाल्या आहेत. ममता बॅनर्जी यांनी म्हटले की, जेव्हा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा पश्चिम बंगालला भेट देतात तेव्हा राज्य सरकार त्यांचे लाल कार्पेट घालून स्वागत करते, परंतु जेव्हा बंगालमधील लोक किंवा लोकप्रतिनिधी दिल्लीत येतात तेव्हा त्यांना ब्लॅक कार्पेटसारखे वागवले जाते. ममता यांनी हे अपमानजनक आणि पक्षपाती असल्याचे म्हटले.

### लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ- शिंदे

**छत्रपती संभाजीनगर: दि. २ वृत्तसंस्था**

लाडक्या बहिणींना लखपती करू तसेच लवकर त्यांना २१०० रुपये देऊ, असे आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. ज्या उमेदवाराच्या मागे महिला, त्याचा नंबर पहिला. त्यामुळे दर महिन्याला ओवाळणी देणारा हा भाऊ आज विनंती करायला आला आहे असे सांगत एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या उमेदवारांना मतं देण्याचे आवाहन केले. शिंदे म्हणाले, ' जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूका कार्यकर्त्यांच्या आहेत. पक्षाचा पाया रचणारी निवडणूक आहे. मी आज मी नेहमी सारखं भाषण करणार नाही. कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडता येत नाही म्हणून अशा परिस्थितीत निवडणूक प्रचार करावा लागत आहे.

# विमान अपघातावेळी 'ती' फाईल अजित पवारांसोबत होती!


## संजय राऊतांचा राज्यसभेत खळबळजनक दावा



**नवी दिल्ली: दि. २ वृत्तसंस्था**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या अपघाती निधनाबाबत वेगवेगळे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. याच मुद्द्यावर शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते संजय राऊत यांनी राज्यसभेत भाजपाला घेरल्याचे पाहायला मिळाले. राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर सुरू असलेल्या चर्चेदरम्यान राऊतांनी अजित पवार यांच्या मृत्यूबाबत काही शंका उपस्थित केल्या. तसेच त्यांनी या प्रकरणाच्या सखोल न्यायिक चौकशीची मागणी केली आहे. संजय राऊत भाजपा सरकारवर टीका करताना म्हणाले की, हे सरकार पूर्णपणे भ्रष्टाचाऱ्यांनी भरलेले आहे. संपूर्ण देशभरातील भ्रष्टाचाऱ्यांना एकत्र आणून सरकार उभं करतात, सरकार पाडतात, आमदार-खासदारांना विकत घेतले जाते. आम्ही निवडून आणतो, तुम्ही रेडिमेड विकत घेता पूर्वी आपण नेत्यांना तयार (पान २ वर)

### भुजबळांनीही व्यक्त केली शंका



मुंबई: राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्र सरकारमधील मंत्री छगन भुजबळ यांनीही अपघाताबाबत शंका व्यक्त केली आहे. अपघातस्थळाची पाहणी केल्यानंतर आणि सीसीटीव्ही फुटेज पाहिल्यानंतर भुजबळ यांनी भावूक आणि संभ्रमित प्रतिक्रिया दिली. छगन भुजबळ यांनी सांगितले, "विमान घिरट्या घालत असताना अचानक पलटी झाल्याचे दिसत आहे. कुठेतरी काहीतरी गडबड झाली आहे. विमान दुसरी घिरटी घालत असताना अचानक पलटी मारल्याचे फुटेजमध्ये दिसते आणि त्यानंतर काही क्षणांत होत्याचे नव्हते झाले. मी तज्ज्ञ नाही, पण इंजिनमध्ये किंवा रडारमध्ये गडबड झाल्याचे वाटते. आणखी काही असू शकते. ठीक आहे, चौकशी होईल, (पान २ वर)

### "ज्यांनी हे पाप केले असेल..."

#### मिटकरींच्या ट्वीटमुळे राजकीय वर्तुळात खळबळ




**अकोला :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सुरक्षिततेबाबत सोशल मीडियावर सुरू असलेल्या चर्चांदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार अमोल मिटकरी यांनी केलेल्या भावनिक आणि वादग्रस्त ट्वीटमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. अजित पवार यांच्याशी संबंधित कथित विमान अपघाताच्या अफवांवरून काही नेत्यांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर, मिटकरींच्या या ट्वीटची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. अमोल मिटकरी यांनी सोशल मीडियावर व्यक्त केलेल्या भावनांनी अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. त्यांनी ट्वीटमध्ये म्हटले आहे, "माझा विश्वास आहे आणि माझं मन सांगतंय दादा असे जाऊच शकत नाहीत. ज्यांनी कुणी हा देवमाणूस हिरावून नेण्याचं पाप केलं असेल, भविष्यात त्यांच्या घरात त्यांची चिता जाळणारा कुणी शिल्लक नसेल. देवा, तुला कुठे रे शोधायचं," अशा शब्दांत त्यांनी तीव्र भावना व्यक्त केल्या. या वक्तव्यामुळे संशय, भावना आणि टीकेचे मिश्र वातावरण निर्माण झाले आहे. (पान २ वर)

### चार सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई : दि. २ वृत्तसंस्था**

राज्य सरकारने सोमवारी प्रशासनात खांदेपालट करत चार सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले. विविध विभागांतील आयएएस अधिकाऱ्यांना नव्या जबाबदाऱ्या देत, शासकीय कामकाजाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या आदेशानुसार, श्रीधर दुबे यांची अन्न व औषध प्रशासन आयुक्त या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. सत्यजित बडे यांची दिव्यांग आयुक्त (पुणे) म्हणून बदली करण्यात आली आहे. डॉ. सुनील भोकरे यांच्याकडे नागरी आरोग्य आयुक्त (मुंबई) या पदाची जबाबदारी सोपविण्यात आली असून, राहुल कुलकर्णी यांची महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी मुंबई येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

# जम्मू-काश्मीरमध्ये पहाटेच भूकंपाचे जोरदार धक्के




**जम्मू: दि. २ वृत्तसंस्था**

जम्मू आणि काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यात आज सकाळी ४.६ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, पहाटे ५:३५ च्या सुमारास भूकंप झाला, त्यामुळे अनेक भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आणि लोक घराबाहेर पळाले . भूकंपाचे केंद्र बारामुल्ला जिल्ह्यातील पट्टन परिसरात असल्याचे वृत्त आहे. भूकंपाचे धक्के इतके तीव्र होते की ते आजूबाजूच्या परिसरातही जाणवले. आतापर्यंत कोणत्याही प्रकारची जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्याचे वृत्त नाही. स्थानिकांच्या मते, काही सेकंदांसाठी भूकंपाचे धक्के जाणवले, ज्यामुळे घरांच्या खिडक्या आणि दरवाजे हादरले. काश्मीर खोरे भूकंपाच्या दृष्टीने संवेदनशील क्षेत्रात येते, जिथे वेळोवेळी सौम्य ते मध्यम भूकंप होतात. भूकंपानंतर, जिल्हा प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन पथके सक्रिय करण्यात आली आणि संवेदनशील भागांचे निरीक्षण सुरू करण्यात आले.

# दोन कंटेनरमध्ये बसचा अक्षरशः चुराडा

**नंदुरबार : दि. २ वृत्तसंस्था**

नवापूर तालुक्यातील कोंडाईबारी घाटात एका भीषण अपघाताने परिसरात खळबळ उडाली. विसरवाडी पोलीस चौकी परिसरात प्रवाशांच्या सोयीसाठी उभी असलेल्या नवापूर आगाराच्या एसटी बसला एका सुसाट कंटेनरने मागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, बसमधील चालक आणि वाहकासह एकूण १७ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताचे दृश्य पाहून उपस्थितांच्या अंगावर शहारे आले, मात्र सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. जखमींना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे घाटातील वाहतूक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.



### १७ प्रवासी गंभीर जखमी

सुरत-धुळे महामार्गावर १ फेब्रुवारी रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास एक थरारक अपघात घडला. नवापूर आगाराची पुणे-नवापूर बस ( १४ १९५७) महामार्गावर उभी असताना, मागून येणाऱ्या एका भरधाव कंटेनरने तिला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, बस समोर असलेल्या ट्रक आणि मागचा कंटेनर यांच्यामध्ये अक्षरशः चिरडली गेली. समोरच्या ट्रकचा लोखंडी अँगल बसच्या केबिनमध्ये घुसल्याने बसच्या पुढच्या भागाचा पूर्णपणे चक्काचूर झाला आहे. या अपघातात बस चालक महेंद्र लाजा गावित हे केबिनमध्ये अडकून पडले होते, (पान २ वर)

# लंडन-बेंगळुरू एअर इंडिया विमानाचे इमर्जन्सी लँडिंग

**बेंगळुरू: दि. २ वृत्तसंस्था**

लंडनहून बेंगळुरूकडे झेपावलेल्या एअर इंडियाच्या बोइंग ७८७-८ विमानामध्ये उड्डाणादरम्यान तांत्रिक बिघाड झाल्याची धक्कादायक घटना सोमवारी घडली. विमानाच्या 'फ्यूल कंट्रोल स्विच'मध्ये बिघाड झाल्याचे लक्षात येताच वैमानिकाने प्रसंगावधान राखत विमानाचे तातडीने लँडिंग केले. या घटनेमुळे विमानात काही काळ भीतीचे वातावरण पसरले होते, मात्र सुदैवाने सर्व प्रवासी आणि क्रू मेंबर्स सुरक्षित असल्याचे एअरलाईन प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या घटनेनंतर संबंधित विमान तातडीने तपासासाठी ग्राउंडेड करण्यात आले आहे.

या गंभीर प्रकरणाची दखल घेत

### इंधन स्विचमध्ये बिघाड

एअर इंडियाने अधिकृत निवेदन प्रसिद्ध केले आहे. वैमानिकाने इंधन नियंत्रण स्विचमधील संभाव्य त्रुटी निदर्शनास आणून दिल्यानंतर कंपनीने तातडीने पावले उचलली असून, मूळ उपकरण निर्माता कंपनीला या तपास प्रक्रियेत सामील करून घेण्यात आले आहे. नागरी विमान वाहतूक संचालनालयाला या संपूर्ण घटनेची रीतसर माहिती देण्यात आली असून, सुरक्षेच्या कारणास्तव विमानाची कसून चौकशी केली जात आहे. प्रवाशांची सुरक्षितता हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे एअर इंडियाने म्हटले आहे. विशेष म्हणजे, गेल्या काही काळातील (पान २ वर)

# उद्योग, आस्थापना व कारखान्यांमधील कर्मचाऱ्यांना शनिवारी भरपगारी सुट्टी जाहीर

**मुंबई : दि. २ वृत्तसंस्था**

राज्यातील १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांमध्ये शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या निवडणुकीमध्ये राज्यातील तसेच राज्याच्या सीमेलगतच्या सर्व मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी उद्योग, आस्थापना व कारखान्यांमधील कामगार कर्मचाऱ्यांना या दिवशी सुट्टी किंवा सवलत देणे बंधनकारक आहे, असे परिपत्रक उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने जारी केले आहे.

यानुसार, निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी तसेच कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असलेल्या मतदारांनाही निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्याचे निर्देश देण्यात



आले आहेत. त्याचबरोबर, ही सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू असेल. यात खासगी कंपन्या यामधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, माल्स, रिटेलर्स आदींना हे आदेश लागू राहणार आहेत. अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थितीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान (पान २ वर)

## निराशा | १.१९ कोटी कर्मचाऱ्यांची प्रतीक्षा कायम

# आठव्या वेतन आयोगाला विलंब होणार?

**नवी दिल्ली: दि. २ वृत्तसंस्था**

**२०२६ च्या अर्थसंकल्पात केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना आठव्या वेतन आयोगाची मोठी आशा होती. तथापि, अर्थमंत्र्यांनी त्याची थेट घोषणा केली नाही. अहवालांनुसार ते यावर्षी लागू केले जाईल, परंतु २०२६ च्या अर्थसंकल्पात असे खर्चाचे डेटा उघड झाले आहेत.**



सरकारने अर्थसंकल्पात येणाऱ्या संपूर्ण खर्चाची माहिती दिली आहे, ज्यामध्ये खर्चाचा डेटा समाविष्ट आहे, जो २०२६-२७ च्या आर्थिक वर्षासाठी ८,२४,११४ कोटी असण्याचा अंदाज आहे, जो गेल्या वर्षीच्या ७८२,७०१ कोटींच्या तुलनेत ४१,४१३ कोटींनी वाढला आहे. खर्चातील ही वाढ वेतन आयोगाच्या खर्चाच्या तुलनेत माफक आहे, कारण हा सरकारी पैसा केवळ नवीन नियुक्त्या आणि डीए पेमेंटवर खर्च केला जाऊ शकतो. शिवाय, सरकारने आठव्या वेतन आयोगासाठी स्वतंत्र बजेट वाटप केलेले नाही. अशा परिस्थितीत, या आर्थिक वर्षात आठव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीचा मार्ग कठीण असू शकतो असा अंदाज आहे.

२०२६ च्या सुरुवातीपासून, अंदाजे १.१९ कोटी केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारक आठव्या वेतन आयोगाअंतर्गत पगारवाढीची अपेक्षा करत आहेत. वाढत्या पगाराचा संदेश कधी येईल हे सर्वांना जाणून घ्यायचे आहे. वाढत्या महागाईमुळे, फिटमेंट फॅक्टरमध्ये सुधारणा करण्याची मागणी वाढत आहे, परंतु वास्तव असे आहे, की पगारवाढीला काही वेळ लागू शकतो.

सरकारने १५ जानेवारी २०२५ रोजी आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेची घोषणा केली होती, परंतु त्यानंतरची प्रक्रिया खूपच मंद होती. त्याची अधिकृत राजपत्र अधिसूचना सुमारे १० महिन्यांनंतर, २८ ऑक्टोबर २०२५ रोजी जारी करण्यात आली. या अधिसूचनेत स्पष्टपणे म्हटले आहे, की आयोगाला त्याचा अहवाल सादर करण्यासाठी १८ महिने असतील.

### अहवाल जुलै २०२७ पर्यंत

जर आपण ऑक्टोबर २०२५ मध्ये १८ महिने जोडले तर आयोगाचा अहवाल जुलै २०२७ पर्यंत प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे. अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर, सरकारला तो निर्णय घेण्यासाठी आणि अंमलात आणण्यासाठी थोडा वेळ लागेल. त्यामुळे, पगारवाढीचे प्रत्यक्ष फायदे २०२७ च्या मध्यापासून किंवा २०२८ च्या सुरुवातीपासूनच अपेक्षित आहेत. सरकारने अर्थसंकल्पातही असेच काहीतरी करण्याचे संकेत दिले आहेत. कारण जर यावेळी खर्च वाढवला नाही तर २०२७ च्या अर्थसंकल्पात आठव्या वेतन आयोगाबाबत काही घोषणा केली जाऊ शकते.

पान 1 वरून...

## हरित महाराष्ट्रसाठी ३०० कोटी ...

साग लागवड करण्यात यावी. यासाठी लागणारी रोपे तयार करण्यासाठी शासकीय नर्सरी बरोबरच खासगी नर्सरी, बचतगट यांचाही सहभाग घ्यावा. या कार्यक्रमातील सर्व शासकीय विभागाबरोबरच वन विभाग, नर्सरी यांना उद्दिष्टे ठरवून द्यावीत, ग्रामीण भागात शेतकरी, युवा, महिलांचा सहभाग घ्यावा. असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. यावेळी 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांनी या उपक्रमांचे सादरीकरण केले. या मिशन अंतर्गत राज्यातील विविध कृषी-हवामान पट्ट्यांनुसार स्थानिक परिसंस्थेला अनुरूप प्रजातींचीच लागवड करण्यात येणार असून, गवताळ प्रदेश व दलदलींमध्ये वृक्ष लागवड न करता त्यांचे पुनर्संचयितीकरण केले जाणार आहे.

## लंडन-बेंगळुरू एअर इंडिया ....

विमान अपघातांच्या पार्श्वभूमीवर या घटनेने प्रवाशांमध्ये मोठी घबराट निर्माण केली होती. २८ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पाच जणांचा विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला होता, त्या आठवणी या घटनेमुळे पुन्हा ताज्या झाल्या. तसेच, गेल्या वर्षी १२ जून रोजी अहमदाबाद ते लंडन दरम्यान झालेल्या भीषण विमान अपघातात २६० प्रवाशांना आपला जीव गमवावा लागला होता. त्या अपघाताच्या चौकशी अहवालातही तांत्रिक बिघाडाकडेच बोट दाखवण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर, डीजीसीएने एअर इंडियाच्या सर्व बोइंग ७८७ विमानांच्या इंधन स्विचची तपासणी करण्याचे आदेश दिले होते, मात्र त्यावेळी कोणताही दोष आढळला नव्हता. आता पुन्हा एकदा हा बिघाड समोर आल्याने विमान सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

## दोन कंटेनरमध्ये बसचा ...

तर वाहक संतोष बारसू सोंडे यांच्या डोक्याला व पायाला गंभीर दुखापत झाली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली आणि मोठ्या प्रयत्नांनंतर चालकाला केबिनमधून सुखरूप बाहेर काढले. जखमींवर सध्या उपचार सुरू असून, या अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. जामनपाडा येथील मनोहर जयवंत गावित यांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे जखमींना वेळेवर उपचार मिळणे शक्य झाले. त्यांनी माणुसकीचे दर्शन घडवत आपल्या खाजगी वाहनातून गंभीर जखमींना तातडीने विसरवाडी ग्रामीण रुग्णालयात हलवले. बसमध्ये एकूण १७ प्रवासी होते, ज्यात नवापूर, साक्री, सुरत आणि सटाणा येथील नागरिकांचा समावेश होता. सुदैवाने, या भीषण अपघातात बहुतांश प्रवासी किरकोळ जखमी झाले असून त्यांच्यावर प्राथमिक उपचार सुरू आहेत. आपत्कालीन सेवांच्या मदतीने वाहतूक पूर्ववत करण्यात आली असून, पोलीस या घटनेचा सखोल तपास करत आहेत.

## उद्योग, आस्थापना....

होईल अशा धोकादायक अथवा लोकोपयोगी सेवेत अथवा आस्थापनांच्या संदर्भात अधिकारी, कर्मचारी व कामगार इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी दोन ते तीन तासांची विशेष सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील. सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या जिल्हा परिषदेमध्ये रायगड (पंचायत समित्या पनवेल, कर्जत, खालापूर, सुधागड, पेण, उरण, अलिबाग, मुरुड. रोहा, तळा, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर); रत्नागिरी (मंडणगड, दापोली, खेड, चिपळूण, गुहागर, रत्नागिरी, संगमेश्वर, लांजा, राजापूर); सिंधुदुर्ग (वैभववाडी, कणकवली, देवगड, मालवण, कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी दोडामार्ग); पुणे (जुन्नर, आंबेगाव, शिरुर, खेड, मावळ, मुळशी, हवेली, दौंड, पुरंदर, वेल्हे, भोर, बारामती, इंदापूर); सातारा (खंडाळा, फलटण, माण, खटाव, कोरेगाव, वाई, महाबळेश्वर, जावळी, सातारा, पाटण, कराड); सांगली (आटपाडी, जत, खानापूर (विटा), कडेगाव, तासगाव, कवठेमहांकाळ, पलूस, वाळवा-ईश्वरपूर, शिराळा, मिरज); सोलापूर (करमाळा, माढा, बार्शी, उत्तर सोलापूर, मोहोळ, पंढरपूर, माळशिरस, मंगळवेढा, सांगोला, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट); कोल्हापूर (शाहुवाडी, पन्हाळा, हातकणंगले, शिरोळ, कागल, करवीर, गगनबावडा, राधानगरी, भुदरगड, आजरा, गडहिंग्लज, चंदगड); छत्रपती संभाजीनगर (सोयगाव, सिल्लोड, कन्नड, फुलंब्री, खुलताबाद, वैजापूर, गंगापूर, छत्रपती संभाजीनगर, पैठण); परभणी (जिंतूर, परभणी, मानवत, सेलू, पाथरी, सोनपेठ, पूर्णा, पालम, गंगाखेड); धाराशीव (परांडा, भूम, वाशी, कळंब, धाराशीव, तुळजापूर, लोहारा, उमरगा) आणि लातूर (पंचायत समित्या अहमदपूर, जळकोट, उदगीर, चाकूर, रेणापूर, लातूर, शिरूर (अनंतपाळ), देवणी, औसा, निलंगा) यांचा समावेश आहे.

## विमान अपघातावेळी 'ती' फाईल ....

करायचो, आता आपण विकत घेतो. ही तुमची लोकशाही आहे. पुढे बोलताना संजय राऊतांनी अजित पवार यांची आठवण काढली ते म्हणाले की, ''आज मला अजित पवार यांची आठवण येत आहे. महाराष्ट्रातील मोठे नेते होते. तुमचे तीन वर्षांपासन सहकारी देखील राहिले. त्यांचे दुर्दैवी निधन झाले. आजही आम्ही हे कसे घडले या धक्क्यात आहोत.'' अजित पवारांच्या अपघाती निधनाबद्दल बोलताना संजय राऊत पुढे म्हणाले की, ''अजित पवार यांच्यावर ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याचा आरोप तुमच्या (भाजपा) सरकारने केला, पण ते भारतीय जनता पार्टीबरोबर आले आणि पवित्र झाले. १५ जानेवारी रोजी अजित पवार यांनी एक वक्तव्य केलं होतं. त्यांनी भारतीय जनता पार्टीला एक उत्तर दिले होते. ते म्हणाले होते की, जर तुम्ही माझ्यावर सिंचन घोटाळ्याचे आरोप करत असाल, तर सिंचन घोटाळ्याचा पैसा फक्त आम्ही खाल्ला नाही. भारतीय जनता पार्टीने देखील या सिंचन घोटाळ्यात भरपूर पैसा खाल्ला आहे आणि भारतीय जनता पार्टीची फाईल माझ्याकडे आहे, हे अजित पवारांचे वक्तव्य १५ जानेवारी रोजी आले. यानंतर १० दिवसांनी अजित पवारांचा विमान अपघात मृत्यू होतो मी आरोप करत नाही. पण हा मृत्यू रहस्यमयपूर्ण आहे.'' अजित पवारांनी ज्या फाईलवरून आरोप केले, ती फाईल अपघातावेळी अजित पवार यांच्याकडे होती असा दावा संजय राऊतांनी केला आहे. ''तुमच्यावर आरोप केला फाईल कुठे आहे? माझी माहिती आहे की, अजित पवार नेहमी ती फाईल स्वतःजवळ ठेवत. जेव्हा मुंबईहून ते बारामतीकडे निघाले तेव्हाही ती फाईल त्यांच्यासोबत होती आणि अर्ध्या तासात अजित पवार यांचा अत्यंत वेदनादायी मृत्यू झाला. त्याचा तपास झाला पाहिजे आणि ही चौकशी एक स्वतंत्र न्यायिक चौकशी असली पाहिजे,'' असे संजय राऊत म्हणाले. अजित पवार यांचा अपघात पाहिल्यानंतर मला जस्टिस लोया यांची आठवण आली. तसाच प्रकारची घटना तर घडली नाही ना? असा प्रश्नही संजय राऊत यांनी यावेळी उपस्थित केला.

## ज्यांनी हे पाप केले असेल...

या आधीही अमोल मिटकरी यांनी या प्रकरणासंदर्भात काही गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. ''मृत्यूच्या आदल्या दिवशी दुपारनंतर कुठलाच कार्यक्रम नव्हता. त्या ठिकाणी पक्षातील कार्यकर्त्यांना भेटल्याचे समजले. दुसऱ्या दिवशी त्याच खुर्चीवरून कामे आटोपून बारामतीकडे रवाना झाले,'' असे म्हणत त्यांनी संपूर्ण घटनाक्रमावर शंका व्यक्त केली होती. तसेच, ''गेले तीन दिवस मनात शंकेचं काहूर आहे,'' असेही त्यांनी नमूद केले होते.

## भुजबळांनीही व्यक्त केली शंका...

त्याची माहिती समोर येईल. पण सोन्या सारखी माणसे गेली ती परत येणार नाहीत.'' भुजबळ यांनी अपघाताच्या घटनास्थळाची प्रत्यक्ष पाहणी केली होती. त्यावेळी त्यांनी धावपट्टी मोठी असतानाही विमान कसे कोसळले, याबाबत आश्चर्य व्यक्त केले होते. ते म्हणाले होते, ''रनवे मोठा आहे, तरी हे कसे घडले? प्लेनमध्ये किंवा पायलटच्या चुकीमुळे झाले की काय?'' असा प्रश्न उपस्थित केला होता.

# विलिनीकरणाबाबत त्यांनी आधी भूमिका स्पष्ट करावी- सुनील तटकरे

**कराड : दि. २** वृत्तसंस्था



भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी. विशेषतः 'विलीनीकरण कोणत्या पक्षाचे, कोणत्या पक्षात?' याबाबत स्पष्टता आवश्यक असून, त्याशिवाय या विषयावर चर्चा होऊ शकत नसल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी ठामपणे सांगितले. अजित पवारांच्या विमान दुर्घटनेमागील सत्य महाराष्ट्रासमोर यावे, ही ठाम भूमिका असल्याचे ते म्हणाले.

अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्याकडे असलेल्या उपमुख्यमंत्रीपदावर निवडलेल्या सुनेत्रा पवार यांनी सोमवारी सकाळी कराडमध्ये माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीला आणि वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्यास अभिवादन केले. या प्रसंगी खासदार सुनील तटकरे व अन्य नेतेही उपस्थित होते. यानंतर तटकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला.

यशवंतराव चव्हाणांचे विचार घेवून अजित पवारांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसने गेल्या अडीच वर्षांत केलेली वाटचाल लक्षात घेता, महाराष्ट्राच्या व्यापक हितासाठी सुनेत्रा पवार यांनी ही जबाबदारी स्वीकारली आहे. राज्याच्या भविष्यासाठी सुनेत्रा पवार पूर्ण योगदान देतील, असा विश्वास तटकरे यांनी व्यक्त केला.

शपथविधीस शरद पवार, सुप्रिया सुळे यांना आमंत्रण नव्हते? या आरोपांवर तटकरे यांनी, राष्ट्रवादी विधिमंडळ पक्षाने एकमताने त्यांच्या निवडीचे पत्र मुख्यमंत्र्यांना दिले आणि त्यानुसारच शपथविधी पार पडल्याचे सांगितले. 'राष्ट्रवादी'च्या विलिनीकरणासंदर्भातील शरद पवारांच्या प्रतीक्रीयेबाबत आपण बोलणार नाही. परंतु, अजित पवारांवर अंत्यसंस्कार होण्याआधीच याबाबत प्रतिक्रिया यायला लागल्या. तरी कोणत्या पक्षाच कोणत्या पक्षात विलीनीकरण? याची स्पष्टता झाल्यास यावर बोलता येईल असा सावध पवित्रा त्यांनी घेतला. आम्ही भाजपसोबत राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या माध्यमातून जनहितासाठी केंद्रात व राज्याच्या सत्तेत आहोत. आणि हीच भूमिका पुढे नेण्याचे आमचे कर्तव्य असल्याचे तटकरेंनी स्पष्ट केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भाजपने 'गिळंकृत' केल्याच्या संजय राऊत यांच्या आरोपावर तटकरे त्यांच्या बोलण्याला फार महत्व नसल्याचे स्पष्ट करत. आमचे विचार, धोरणे व भूमिका स्वतंत्र असून, विधानसभा निवडणुकीत १३ कोटी जनतेने आमच्या भूमिकेला कौल दिल्याचे त्यांनी सांगितले.

### आधी खुलासा मग बोलेन

शरद पवार यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या विलीनीकरणाबाबत चर्चा सुरू असल्याचे संकेत दिल्यानंतर आपल्या गटाकडून प्रतिक्रियाच नाही? या प्रश्नावर तटकरे यांनी कोणत्या पक्षाचे कोणत्या पक्षात विलीनीकरण होणार, याचा खुलासा आधी झाला पाहिजे. त्यानंतरच यावर स्पष्ट भूमिका मांडता येणार असल्याचे सांगितले.

### विजय वडेट्टीवारांवर टीका

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येऊ म्हणून कट रचला जात असल्याच्या काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्या आरोपांवर तटकरे यांनी 'आधी काँग्रेसने चंद्रपूरचा महापौर कोणाचा होतोय ते पाहावे. काँग्रेसमध्येच पळवा- पळवी सुरू असताना, वडेट्टीवारांना आमच्या पक्षावर बोलण्याचा नैतिक अधिकार नसल्याचा टोला लगावला.

## साडेबारा वर्षांनंतर अखेर न्याय : पत्नी व चार मुलांवर हल्ला करणाऱ्या पित्याला जन्मठेप

**डोंबिवली :दि. २** वृत्तसंस्था




कल्याण पश्चिमेकडे असलेल्या रामबाग गल्ली क्रमांक चारमध्ये स्वानंद कॉलनीत पाताडे कुटुंब राहते. साडेबारा वर्षांपूर्वी मध्यरात्रीच्या सुमारास याच स्वानंद कॉलनीमध्ये काळजाचा ठोका चुकविणारी घटना घडली होती. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन रागाच्या भरात पत्नी आणि झोपेत असलेल्या चार मुलांवर धारदार पात्याने हल्ला चढवून माथेफिरूने त्यांना गंभीर जखमी केले होते. या हल्ल्यात नऊ वर्षाचा प्रणव उर्फ देवेश सुनील पाताडे (९) या मुलाचा जागीच मृत्यू झाला होता. पत्नी मीनासह तिच्या प्रणव उर्फ देवेश (९), सुजित, शुभम (५) आणि सर्वेश (अडीच वर्ष) या तिन्ही मुलांना गंभीर जखमी केले होते. या खटल्याचा निकाल जाहीर करताना कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधिश एस. एस. इनामदार यांनी मारेकरी सुनील सदाशिव पाताडे (४६) याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

न्यायालयाने सुनील पाताडे याला पाच हजार रूपये दंड ठोठावला आहे. दंड न भरल्यास तीन महिने कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. मार्च २०१३ रोजी खुनाची घटना घडली होती. साडेबारा वर्षानंतर या खटल्याचा निकाल लागला आहे. या संदर्भात हल्ल्यातून बचावलेल्या आणि गंभीर जखमी झालेल्या पत्नी मीना पाताडे हिच्या जबानीवरून महात्मा फुले चौक पोलिसांनी गुन्हा दाखल होता. वरिष्ठ पोलिस निरीक्षक बळीरामसिंग परदेशी, पोलिस निरीक्षक विजय नाईक आणि त्यांचे सहकारी सोपान नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक एस. के. धनवडे यांनी तपास करून कल्याण जिल्हा न्यायालयात आरोपपत्र दाखल केले होते. पोलिसांनी या प्रकरणी आरोपी सुनील पाताडे याला अटक केली होती. या खटल्यात सरकार पक्षातर्फे सरकारी वकील ॲड. संजय गोसावी, ॲड. जयश्री भटेजा, तर आरोपीतर्फे टी. ए. देवरे यांनी काम पाहिले. न्यायालय आणि पोलिस ठाण्याचे समन्वयक म्हणून पोलिस उपनिरीक्षक आर. डी. आटपाटकर, हवालदार संजय शेलार, भालचंद्र पवार आणि जयश्री झोळेकर यांनी काम पाहिले. न्यायालयात आरोपपत्र दाखल झाल्यानंतर सरकारी वकील ॲड. संजय गोसावी यांनी या गुन्ह्यातील सबळ पुरावे न्यायालयासमोर सादर करून आरोपी सुनील या घटनेला प्रत्यक्ष कसा जबाबदार आहे.

## मालवण तारकर्लीतील एमटीडीसी कार्यालयाला भीषण आग; लाखोंचे नुकसान

**सावंतवाडी : दि. २** वृत्तसंस्था



पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या मालवण तालुक्यातील तारकर्ली येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या (एमटीडीसी) कार्यालयाला आज सोमवारी पहाटे भीषण आग लागली. या आगीत कार्यालयातील संगणक, फर्निचर आणि महत्त्वाचे दस्तऐवज जळून खाक झाले असून, लाखोंचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचे सांगण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज सोमवारी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास एमटीडीसीच्या या कार्यालयातून अचानक धूर येऊ लागला. हे कार्यालय लाकडी बोटीच्या प्रतिकृतीच्या स्वरूपात अत्यंत कलात्मकरीत्या उभारण्यात आले होते. लाकडी बांधकाम असल्याने काही वेळातच आगीने रौद्र रूप धारण केले आणि संपूर्ण इमारत आगीच्या विळख्यात सापडली.

आग लागल्याचे लक्षात येताच स्थानिक नागरिक आणि कर्मचाऱ्यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला, मात्र आगीची तीव्रता अधिक असल्याने यश आले नाही. घटनेची माहिती मिळताच मालवण नगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून काही तासांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. या दुर्घटनेत कार्यालयातील फर्निचर, महत्त्वाची कागदपत्रे आणि यंत्रणा पूर्णपणे जळून भस्मसात झाली आहे. सुदैवाने ही घटना पहाटेच्या वेळी घडल्याने कार्यालयात कोणीही उपस्थित नव्हते, त्यामुळे मोठी जीवितहानी टळली. पर्यटनाच्या दृष्टीने हे कार्यालय महत्त्वाचे केंद्र मानले जात होते. या आगीच्या घटनेचा अधिक तपास संबंधित विभागाकडून सुरू आहे.

## मालवणीतील गॅस सिलिंडर स्फोटात दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू

**मालाड :दि. २** वृत्तसंस्था



मालाड मालवणीतील एमएचबी कॉलनीत २७ जानेवारीरोजी सकाळी ९. २५ वाजता गॅस लिकेज मुळे झालेल्या गॅस सिलिंडर स्फोट दुर्घटनेत मोठा अपडेट समोर आला आहे. या भीषण घटनेत जखमी झालेल्या सात जणांपैकी दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तर आणखी दोघांची प्रकृती अत्यवस्थ आहे.

मालवणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतांची ओळख विजय चौधरी आणि जुलेखा खान अशी आहे. दोघांनाही गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. या स्फोटात जखमी झालेल्या उर्वरित व्यक्तींवर शहरातील वेगवेगळ्या रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. डॉक्टरांच्या माहितीनुसार, दोन जखमींची प्रकृती गंभीर असून इतरांची प्रकृती हळूहळू स्थिर होत आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दलाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. प्राथमिक तपासात गॅस गळतीमुळे स्फोट झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, स्फोटाचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू आहे. या दुर्घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, मृतांच्या कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे.

## उत्साहात साजरी केली सामूहिक रविदास जयंती!

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**अकोला, दि.२ :**संत शिरोमणी गुरु रविदास यांच्या 'बेगमपुरा' या समतावादी संकल्पनेतून अकोला शहरातील न्यू तापडिया नगर येथे गुरु रविदास प्रतिष्ठानच्या वास्तूचे भूमिपूजन रविवारी दुपारी पार पडले. सर्वधर्मीय धर्मगुरूंच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात चर्मकार समाजासह सर्व समाजघटकांनी या लोकाभिमुख उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन डॉ. बाबासाहेब बहुउद्देशीय उत्कर्ष प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. मुकुंद भारसाकळे यांनी केले.

समाजाचे नेते लक्ष्मणराव घुमरे म्हणाले, संत गुरु रविदास यांची बेगमपुरा संकल्पना ही समता, बंधुता व न्यायावर आधारित आहे. त्या विचारांना प्रत्यक्ष कृतीत उतरवण्यासाठी गुरु रविदास प्रतिष्ठान महत्त्वाची भूमिका बजावेल. समाजातील दुर्बल घटकांना आधार देणारे उपक्रम उभारण्यासाठी चर्मकार समाजाने एकजुटीने प्रतिष्ठानच्या पाठीशी उभे राहावे, असे त्यांनी भाषणात नमूद केले.

यावेळी गुरु रविदास रोसा या संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. विठ्ठल दांडगे नागपूर यांनी समाजाला परिवर्तनाच्या दिशेने नेण्यासाठी प्रतिष्ठानच्या कार्यात सर्वतोपरी योगदान देण्याचे आवाहन केले. प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ. गणेश बोरकर यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत समाजबांधवांनी त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहावे, असेही त्यांनी सांगितले. चर्मकार महासंघाचे उपाध्यक्ष गजानन भटकर व रविदास ट्रस्टचे अध्यक्ष मधुकर वानेटकर यांनी संत रविदास प्रतिष्ठानला भरीव सहकार्य करणे बाबत अभिवचन दिले. जिल्ह्यातील सर्व चर्मकार संघटना डॉक्टर गणेश बोरकर यांच्या पाठीशी प्रतिष्ठानच्या कामाशी सदैव सक्रिय असतील अशा प्रतिक्रिया विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधींनी व्यक्त केल्या. मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष.राम शेगोकार. सेवानिवृत्त अधिकारी राम गव्हाळे नगरसेवक धनंजय ढबाले . सेवानिवृत्त उपकुलसचिव प्रल्हाद शेगोकार .प्रदीप चौरे अशोक इंगळे रमेश तायडे यांची समुचित भाषणे झाली. डॉ. गणेश बोरकर यांनी प्रतिष्ठानच्या संकल्पना मांडताना सांगितले की, न्यू तापडिया नगर येथे १७ हजार स्क्वेअर फूट जागा बोरकर कुटुंबीयांतर्फे दान करण्यात आली आहे. राज्याचे मुख्य सचिव जे पी डांगे साहेब यांनी व आदित्य सगोकार यांनी संत रविदास प्रतिष्ठान साठी देणगी जाहीर केली समाजाकडून मोठ्या प्रमाणात सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे याबाबत संत रविदास प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. गणेश बोरकर यांनी समाधान व्यक्त केले. प्रतिष्ठानच्या माध्यमातून समाजहिताचे विविध उपक्रम राबवले जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रारंभी १०० खाटांचे रुग्णालय उभारण्याचा संकल्प असून, त्यानंतर ज्येष्ठ नागरिकांना आधार देणाऱ्या योजना, विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण सहाय्य, आरोग्य व सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे डॉ. बोरकर यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमाला शेगाव नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रकाश शेगोकार, नगरसेवक धनंजय धबाले, संदीप शेगोकार, सरपंच गजानन वजीरे, रोसा अकोला मुख्य समन्वयक प्रा. गजानन पद्मने, डॉ. जया वजीरे, एडवोकेट शेषराव गव्हाळे. योगेश इंगळे शिवलाल इंगळे मधुसूदन गव्हाळे. विकी इंगळे आप्पा डामरे. आदित्य शेगोकार सपना गव्हाळे आदर्श शिक्षक निलेश ठाकरे या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

## राज्यात 'पुस्तकांचे गाव' व 'कवितांचे गाव' उपक्रमांचा राज्यव्यापी विस्तार

**मुंबई : दि. २** वृत्तसंस्था




मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि वाचनसंस्कृतीला चालना देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'पुस्तकांचे गाव' आणि 'कवितांचे गाव'या उपक्रमांचा राज्यभर विस्ताराचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे. या योजनांसाठी वेगवेगळ्या गावांसाठी स्वतंत्र निर्णय घेण्याची पद्धत बंद करत आता एकत्रित शासन निर्णयाच्या आधारे संपूर्ण राज्यात राबवण्यात येणार आहे. अंमलबजावणीची जबाबदारी राज्य मराठी विकास संस्थेकडे सोपवण्यात आली आहे.

सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वरमधील भिलार येथे २०१७ मध्ये सुरू झालेल्या 'पुस्तकांचे गाव' या उपक्रमाला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळाला. त्यानंतर विविध टप्प्यांत या योजनेचा विस्तार करण्यात आला. मात्र, प्रत्येक नव्या गावासाठी स्वतंत्र शासन निर्णय काढावा लागत असल्याने अंमलबजावणी प्रक्रियेत विलंब होत होता. नव्या शासन निर्णयामुळे ही अडचण दूर होऊन राज्यातील आधी घोषित तसेच पुढे निवडल्या जाणाऱ्या सर्व 'पुस्तकांचे गाव' आणि 'कवितांचे गाव' या एकाच चौकटीत येणार आहेत. यासंबंधीचे धोरणात्मक व कार्यकारी निर्णय संस्थेच्या कार्यकारी समितीकडून घेतले जाणार आहेत. जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा मराठी भाषा समिती या उपक्रमाचे नियंत्रण, मार्गदर्शन व देखरेख करणार आहे. गावनिवड, प्रत्यक्ष पाहणी, पात्रता तपासणी आणि प्रगती अहवालाची जबाबदारीही या समितीकडे असणार आहे. या निर्णयामुळे 'पुस्तकांचे गाव' आणि 'कवितांचे गाव' हे उपक्रम केवळ सांस्कृतिक किंवा पर्यटन उपक्रम न राहता, मराठी भाषा, साहित्य आणि वाचनसंस्कृतीच्या संवर्धनासाठीचे धोरणात्मक पाऊल ठरणार आहेत.

ही योजना केवळ ग्रामपंचायत, नगरपंचायत आणि 'क' वर्ग नगरपरिषद क्षेत्रातच राबवली जाणार आहे. गावांची निवड करताना पर्यटनस्थळे, तीर्थक्षेत्रे, ऐतिहासिक वारसा लाभलेली गावे, केंद्र किंवा राज्य संरक्षित स्मारके असलेली ठिकाणे तसेच आदर्श गाव, संत गाडगेबाबा, तंटामुक्ती, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन यांसारखे राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त गावे यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. याशिवाय साहित्यिक चळवळीची परंपरा असलेली किंवा वाङ्मयीन वैशिष्ट्ये जपणारी गावेही राज्य मराठी विकास संस्थेच्या कार्यकारी समितीच्या शिफारसीनुसार निवडली जाणार आहेत. प्रत्येक 'पुस्तकांचे गाव' किंवा 'कवितांचे गाव' येथे किमान १५० चौरस फूट क्षेत्रफळाचे दालन असणे बंधनकारक आहे. ही दालने उभारण्यासाठी ग्रामस्थ, संस्था किंवा दालनचालकांनी कोणत्याही आर्थिक लाभाची अपेक्षा न ठेवता स्वेच्छेने सहभाग घ्यावा, अशी स्पष्ट अट आहे. दालनासाठी अनावर्ती खर्चाकरिता ५ लाख आणि आवर्ती खर्चाकरिता ५० हजार असा एकूण ५.५० लाखांपर्यंतचा खर्च अपेक्षित.

## समाजएकतेचा आदर्श : धनगर अधिकारी कर्मचारी संघटनेचा ५ वा वर्धापन दिन प्रेरणादायी ठरला



**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि.२ :** सामाजिक संघटनांचे कार्यक्रम म्हणजे राजकीय भाषणे व गटबाजी असा समज असताना, धनगर अधिकारी कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य, अकोला जिल्हा शाखेच्या वतीने आयोजित ५ वा वर्धापन दिन व हळदी-कुंकू समारंभाने हा समज पूर्णतः खोडून काढला. नुकताच अण्णासाहेब रोकडे सभागृहात पार पडलेला हा कार्यक्रम विचारप्रवर्तक व समाजाला दिशा देणारा ठरला. कार्यक्रमास महिला-पुरुषांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन, अहिल्या स्तवन व दीपप्रज्वलनाने झाली.प्रास्ताविक अकोला जिल्हाध्यक्ष व कार्यकारी अभियंता विनोद हंबर्डे यांनी करत संघटनेच्या पाच वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रदेशाध्यक्ष सुधीर ढवळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संघटनेचे राज्याध्यक्ष अनिलकुमार ढोले यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख उपस्थितीत नाना पांडे, प्रविण लांडे, प्रविण भागवत तर विशेष उपस्थितीत केशवराव पातोड, धिरज गादे, डॉ. राजेंद्र काटकर, प्रा. डॉ. अनिल तिरकर, मुकुंदराव भदे, मनोज पुंड व सचिव सचिन डाखोडे उपस्थित होते. महिला आघाडीच्या वतीने आयोजित हळदी-कुंकू समारंभात सुमारे ४०० भगिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. ''या कार्यक्रमात केवळ समाजकारण दिसले'' अशी प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली. सूत्रसंचालन सौ. जयश्री सुरोशे व आशाताई कात्रे यांनी केले. शंकर जोगी यांनी मान्यवरांचे स्वागत केले तर आभारप्रदर्शन सौ. कांचन वसतकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. सचिन बंडगर, कैलास बचे व दिपक नागे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## महत्त्वाचे

### बांग्लादेशच्या अर्थव्यवस्थेचा कणाच मोडला

**नवी दिल्ली** :भारतानं बांग्लादेशमध्ये सध्या असलेल्या मोहम्मद यूनुसच्या सरकारला आतापर्यंतचा सर्वात मोठा झटका दिला आहे. रविवारी एक फ ब्रुवारी रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पामध्ये त्यांनी टेक्सटाइल इंडस्ट्रीसाठी मोठी घोषणा केली आहे. त्यामुळे आता बांग्लादेशच्या अर्थव्यवस्थेचा कणा तुटणार आहे, भारतानं टेक्सटाइल संदर्भात अर्थसंकल्पात केलेल्या घोषणेचा सर्वात मोठा फटका हा बांग्लादेशच्या टेक्सटाइल इंडस्ट्रीला बसणार आहे. केवळ अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या घोषणाच नाही, तर भारतानं युरोपियन यूनियन सोबत केलेल्या एफटीएमुळे देखील बांग्लादेशमधील कापड उद्योग मोठ्या संकटात सापडला आहे. आज अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्प सादर केला, ज्यामध्ये त्यांनी सिल्क प्रोडक्शन, मशनरी सपोर्ट, हँडलूम आणि हँडीक्राफ्ट प्रोगाम, तसेच टेक्सटाइल सेक्टरमध्ये कौशल्य विकासाची घोषणा केली आहे. या अर्थसंकल्पामध्ये श्रम -केंद्रीत वस्त्रोद्योग क्षेत्रासाठी मजबूत धोरणांवर भर देण्यात आला आहे. जागतिक स्पर्धेसाठी वातावरण निर्मिती तसेच स्वावलंबन आणि रोजगार वाढीला चालना देणं हा त्यामागचा उद्देश आहे. बांग्लादेशचा कापड उद्योग हा भारतासमोर मोठं आव्हान आहे, बांग्लादेश हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा कापड निर्यातदार देश आहे.

### बलुचिस्तानमधील बंडखोरांमध्ये महिलांची संख्या लक्षणीय

**नवी दिल्ली** : पाकिस्तानमधील बंडखोर गट बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने एका महिला फिदायीन (आत्मघाती हल्लेखोर) चा व्हिडिओ जारी केला आहे. ही महिला गेल्या आठवड्यात पाकिस्तानच्या बलोचिस्तान प्रांतात झालेल्या मोठ्या हल्ल्यात सामील होती. हा हल्ला अलिकडच्या वर्षांतील सर्वात भीषण हल्ल्यांपैकी एक मानला जातो. या क्लिपमध्ये, हवा बलोच असे नाव असलेली ही हल्लेखोर ग्वादर फ्रंटवर च्या ऑपरेशन हेरॉफच्या दुसऱ्या टप्प्यात पाकिस्तानी सुरक्षा दलांवर गोळीबार करताना दिसत आहे. पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात शनिवारी झालेल्या भीषण गोळीबार आणि आत्मघाती बॉम्बस्फोटांच्या मालिकेत किमान ३३ जणांचा मृत्यू झाला. बलुच बंडखोरांनी सामान्य नागरिक, अतिसुरक्षित कारागृहे, पोलीस ठाणी आणि निमलष्करी दलांच्या तळांना लक्ष्य केले. मृतांमध्ये १८ नागरिक आणि १५ सुरक्षा कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. दरम्यान, मागील काही वर्षांमध्ये बलुच बंडखोरांमध्ये महिला आत्मघाती हल्लेखोरांचे संख्या वाढत आहे.

# डॉलरची बादशाहत संपणार, चीनचे युआन आता जागतिक चलन?

## डोनाल्ड ट्रम्प यांची तारांबळ

**नवी दिल्ली : दि. २ वृत्तसंस्था**



चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी अलिकडेच अमेरिकेला एक संदेश दिला आहे. एका भाषणात जिनपिंग यांनी डॉलरचा दबदबा आता संपला असून जगाला एका नव्या चलनाची आवश्यकता असल्याचे म्हटले आहे. अमेरिकेचे चलन डॉलरचे जागतिक बाजारपेठेत वर्चस्व आहे. जागतिक व्यापार हा डॉलरच्या माध्यमातून केला जातो. मात्र आता चीनच्या जागतिक चलनाबाबतच्या एका घोषणेमुळे डोनाल्ड ट्रम्प यांची झोप उडाली आहे. चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी अलिकडेच अमेरिकेला एक संदेश दिला आहे. एका भाषणात जिनपिंग यांनी म्हटले की, डॉलरचा दबदबा आता संपला आहे आणि जगाला अशा चलनाची आवश्यकता आहे. जगाला असे चलन हवे आहे ज्यावर सर्व देशांना विश्वास ठेवता येईल. चीन एका मजबूत चलनाच्या दिशेने काम करत आहे आणि युआनला जागतिक राखीव चलन म्हणून स्थापित करण्याचे ध्येय गाठण्याच्या प्रयत्नात आहे.

चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी पुढे आपल्या भाषणात म्हटले की, 'चीनला आर्थिक महासत्ता बनण्यासाठी मजबूत आर्थिक पाया, जागतिक दर्जाची आर्थिक आणि तांत्रिक क्षमता आणि विश्वासार्ह आणि जागतिक स्तरावर वापरले जाणारे चलन आवश्यक आहे. यासाठी चीनची मध्यवर्ती बँक चलन धोरण आणि मॅक्रोप्रुडेन्शियल व्यवस्थापन प्रभावीपणे अंमलात आणण्याचा प्रयत्न करत आहे. तसेच जागतिक स्तरावर स्पर्धात्मक वित्तीय संस्था आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र आवश्यक आहेत. जी जगभरातून भांडवल आकर्षित करू शकतील आणि जागतिक किमतींवर प्रभाव टाकू शकतील.' शी जिनपिंग यांचे हे भाषण ''च्युशी'' या चिनी मासिकात प्रकाशित झाले आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, शी जिनपिंग यांनी हे भाषण २०२४ मध्ये दिलेले. मात्र आता ते आता २०२६ च्या सुरुवातीला प्रकाशित करण्यात आले आहे. जागतिक तज्ज्ञांनी डोनाल्ड ट्रम्प यांची चिंता वाढवणारे हे भाषण असल्याचे म्हटले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी याआधी डॉलरच्या वर्चस्वाला आव्हान देणाऱ्यांना आव्हान दिलेले आहे.

याआधी त्यांनी भारत, चीन आणि रशिया सदस्य असलेल्या ब्रिक्स गटावर १००% कर लादण्याची धमकी दिली आहे. या देशांनी डॉलरला पर्याय शोधण्याचा प्रयत्न करत आहे. ब्रिक्स गट लवकरच एक कॉमन डिजिटल पेमेंट सिस्टम सुरू करण्याची तयारी करत असल्याचीही माहिती समोर आली आहे. त्यामुळे अमेरिकेची चिंता वाढली आहे.

## इराणच्या धमकीने उडाली जगाची झोप

**नवी दिल्ली : दि. २ वृत्तसंस्था**



अमेरिका कोणत्याही क्षणी इराणवर हल्ला करू शकते, असे सातत्याने सांगितले जात आहे. तशी पाऊले देखील अमेरिकेकडून उचलली जात आहेत. इराणकडे अमेरिका पुढे सरकताना दिसत आहे. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांनी अमेरिकेला कडक इशारा दिला आहे. खामेनी यांनी स्पष्ट शब्दात सांगितले की, जर इराणवर हल्ला झाला तर त्याचा परिणाम फक्त त्या संबंधित देशालाच नाही तर संपूर्ण प्रदेशाला भोगावा लागेल आणि युद्ध पसरेल. अमेरिकेकडून दबाव असतानाही इराण झुकताना दिसत नाहीये. इराणने पुन्हा एकदा हल्ल्याच्या चर्चांमध्ये थेट धमकी दिल्याचे बघायला मिळाले. अयातुल्ला अली खामेनी सत्ता सोडावी, याकरिता दबाव आहे. अमेरिकेने स्पष्ट शब्दात त्यांना इशारा दिला. इराणमध्ये सुरू असलेल्या आंदोलनालाही पाठबळ देताना अमेरिका दिसली. इराणच्या लोकांचा लढा शेवटच्या टप्प्यात असून कोणत्याही क्षणी त्यांच्यापर्यंत अमेरिकेची मदत पोहोचू शकते, असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले.

अयातुल्ला अली खामेनी यांनी म्हटले की, डोनाल्ड ट्रम्प यांना हे माहिती असले पाहिजे की, यावेळी युद्ध केले तर हे युद्ध प्रादेशिक युद्ध असेल आणि याचे परिणाम सर्वांनाच भोगावे लागतील. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्य पूर्वेत मोठ्या प्रमाणात लष्करी तैनाती केली आहे. यासोबतच त्यांनी अनेकदा थेट इराणवर हल्ला करण्याची धमकी देखील दिली आहे.खामेनी यांनी यादरम्यान अमेरिकेवर आरोप करत म्हटले की, अमेरिका इराणचे तेल आणि नैसर्गिक वायू संसाधने हाडप करण्याच्या तयारीत आहे, त्यांना कोणत्याही परिस्थितीमध्ये इराणचे तेल आणि नैसर्गिक वायू संसाधने हवी आहेत. सरकारविरोधी निदर्शनांचे वर्णन परकीय षड्यंत्र म्हणून केले, त्यांनी यापूर्वीच केले आहे.मुळात म्हणजे खामेनी यांनी केलेल्या विधानानंतर डोनाल्ड ट्रम्प नक्की काय बोलतात? याकडे सर्वांच्या नजरा आहेत. मात्र, यावर भाष्य करणे डोनाल्ड ट्रम्प यांनी टाळल्याचे बघायला मिळतंय. डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून सतत इराणला धमकावले जात आहे. मात्र, ज्यापद्धतीने डोनाल्ड ट्रम्प धमक्या देत आहेत, त्याच पद्धतीने इराणही धमावताना दिसत आहे. मात्र, अमेरिका इराणवर कधीही हल्ला करू शकते, असे सातत्याने सांगितले जात आहे.

## एपस्टीन फाईल्समुळे ब्रिटीश राजकुमारावरही संकट

**नवी दिल्ली : दि. २ वृत्तसंस्था**

गेल्या काही काळापासून संपूर्ण जगात अमेरिकन लैंगिक गुन्हेगार जेफ्री एपस्टीनशी संबंधित फाईल्समुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात खळबळ उडवून दिली आहे. शुक्रवारी अमेरिकेच्या न्याय विभागाने जारी केलेल्या फाईल्समुळे अनेकांची झोप उडाली आहे. आता या फाईल्समुळे स्लोवाकियाच्या एका वरिष्ठ नेत्याला राजीनामा द्यावा लागला आहे. तसेच ब्रिटनचे माजी राजकुमार अँड्र्यू यांचीही चिंता वाढली आहे.

या फाईल्समध्ये जगभरातील शक्तिशाली, श्रीमंत आणि राजकीयदृष्ट्या प्रभावी व्यक्तींचा एपस्टीन याच्याशी संबंध असल्याचे समोर आले आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

अमेरिकेच्या न्याय विभागाने जारी केलेल्या फाईल्समध्ये नाव आल्यामुळे स्लोवाकियाच्या पंतप्रधानांनी मिरोस्लाव लाजॅक यांचा राजीनामा स्वीकारला आहे. लाजॅक संयुक्त राष्ट्र महासभेचे माजी अध्यक्ष आहेत. त्यांच्यावर कोणत्याही फौजदारी गुन्ह्याचा आरोप नाही, मात्र एपस्टाईन तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांच्या बैठकींशी संबंधित फोटो आणि ईमेल समोर आल्यानंतर त्यांनी पद सोडण्याचा निर्णय घेतला आहे. या फाईल्समुळे माजी ब्रिटिश प्रिन्स अँड्र्यू माउंटबॅटन-विंडसर यांच्यावरील दबाव वाढला आहे. कारण त्यांचाही एक आक्षेपार्ह फोटो समोर आला आहे.

## रघुराम राजन यांचा भारताला धोक्याचा इशारा

**नवी दिल्ली : दि. २ वृत्तसंस्था**



रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी जगाच्या सध्याच्या परिस्थितीवर भारताला अत्यंत मोठा इशारा दिला. रघुराम राजन यांनी दिलेल्या इशाऱ्यानंतर टेन्शन अधिकच वाढल्याचे बघायला मिळत आहे.

रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी नुकताच भारताला मोठा धोक्याचा इशारा दिला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर मोठा टॅरिफ लावला. भारत हा रशियाकडून कच्चे तेल खरेदी करत असल्याने हा टॅरिफ लावण्यात आला होता. भारताने आता पूर्णपणे रशियाकडून तेल खरेदी बंद केली. मात्र, असे असतानाही अमेरिकेने टॅरिफ कमी केला नाही. अमेरिकेने लावलेल्या टॅरिफनंतर भारताने थेट अनेक देशांसोबत मुक्त व्यापार करार केले. मात्र, यावेळी भारताला मोठी कसरत करावी लागत आहे. तसा अमेरिकेच्या टॅरिफचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर कोणताही परिणाम पडला नाही. मात्र, बदललेल्या समीकरणांमुळे फटका बसण्याची शक्यता आहे.

पाकिस्तानसोबतच भारताचे बांगलादेशासोबतचही संबंध तणावात आहेत. चीनसोबतचे संबंध बऱ्यापैकी सुधारले आहेत. मात्र, कोणत्याही परिस्थितीमध्ये चीनवर विश्वास ठेवणे घातक आहे. रघुराम राजन यांनी यासर्व परिस्थितीवर मोठा इशारा दिला. रघुराम राजन यांनी म्हटले की, सध्या जग एका कठीण काळातून जात आहे. भारताने यादरम्यान काही चुका करणे टाळावे.

आज बघायला गेले तर प्रत्येक शहराला मेट्रोची आवश्यकता आहे पण खरोखरच तिथे मेट्रो चालवण्याची क्षमता आहे का? हे पाहणेही महत्वाचे आहे. रघुराम राजन यांनी पुढे म्हटले की, श्रीलंका, बांग्लादेश आणि नेपाळसोबत आपण संबंध चांगली ठेवायला हवीत. भारताला या देशांची आर्थिक दृष्ट्या नक्कीच गरज आहे. मुळात म्हणजे सध्याच्या परिस्थितीला गुंतवणूक करताना फार विचार करणे आवश्यक आहे.

अमेरिका सतत भारतावर विविध प्रकारचे निर्बंध लादताना दिसत आहे. मात्र, दुसरीकडे नरेंद्र मोदी माझे चांगले मित्र असल्याचा दावा सातत्याने डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून केला जातो. अमेरिका भारतावर दबाव आणत असतानाच रशियाचे अध्यक्ष पुतिन आपल्या काही मंत्र्यांसोबत भारत दौऱ्यावर आले आणि त्यांनी थेट महत्वाचे करार भारतासोबत केले.

## खाणकाम करताना २०० हून अधिक जणांचा मत्यू

### जगातील सर्वात मोठ्या कोबाल्ट खाणीत भीषण दुर्घटना

**नवी दिल्ली : दि. २ वृत्तसंस्था**



गरीब देशात एक भयंकर दुर्घटना घडली आहे. पूर्व कांगो लोकशाही प्रजासत्ताक मधील रुबाया कोबाल्ट खाणीत झालेल्या भीषण भूस्खलनाने संपूर्ण परिसर हादरला आहे. या दुःखद दुर्घटनेत आतापर्यंत २०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. स्थानिक अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, ही दुर्घटना त्यावेळी घडली जेव्हा शेकडो लोक खाणीच्या आत काम करत होते.

प्रांतातील बंडखोर गटाने नियुक्त केलेल्या गव्हर्नरचे प्रवक्ते लुबुम्बा काम्बेरे मुइसा यांनी सांगितले की, भूस्खलनाच्या वेळी खाणीत काम करणाऱ्या मजुरांव्यतिरिक्त लहान मुले आणि स्थानिक बाजारपेठेत काम करणाऱ्या महिला देखील उपस्थित होत्या. त्यांनी सांगितले की काही लोकांना गंभीर अवस्थेत ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्यात आले, त्यापैकी सुमारे २० जखमींवर स्थानिक आरोग्य केंद्रांमध्ये उपचार सुरू आहेत.

एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार, शुक्रवारी संध्याकाळपर्यंत मृतांचा आकडा किमान २२७ पर्यंत पोहोचला होता, तथापि वास्तविक आकडा यापेक्षा जास्त असू शकतो. मदत आणि बचाव कार्य सुरू आहे, परंतु सततच्या पावसामुळे आणि अस्थिर जमिनीमुळे बचाव कार्यात मोठ्या अडचणी येत आहेत. प्रशासनाने या दुर्घटनेसाठी पावसाळ्यामुळे कमकुवत झालेल्या जमिनीला जबाबदार धरले आहे. स्थानिक लोक अनेक वर्षांपासून अत्यंत धोकादायक परिस्थितीत, हातांनी खोदकाम करून दररोज काही डॉलर्स कमावण्यासाठी या खाणीत काम करतात. सुरक्षा मानकांची कमतरता आणि अवैध खाणकाम ही या क्षेत्रातील दीर्घकाळापासूनची मोठी समस्या राहिली आहे.

रुबाया खाण जागतिक स्तरावर अत्यंत महत्त्वाची मानली जाते. येथून जगातील सुमारे १५ टक्के कोबाल्टचे उत्पादन होते. कोबाल्टपासून टँटलम नावाचा धातू काढला जातो, ज्याचा वापर मोबाईल फोन, संगणक, एरोस्पेस उपकरणे आणि गॅस टर्बाइन यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानामध्ये होतो. संयुक्त राष्ट्रांच्या मते, २२४ पासून ही खाण /२३ बंडखोर गटाच्या नियंत्रणात आहे.

## पाकिस्तानला अत्यंत मोठा धक्का, मित्र देशानेच केली मोठी पोलखोल

**नवी दिल्ली : दि. २ वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकिस्तानला एका मागून एक धक्के बसताना दिसत आहेत. तुर्की पूर्वीपासूनच पाकिस्तानचा चांगला मित्र राहिला. मात्र, आता तुर्कीनेही अत्यंत मोठा झटका पाकला दिला. यामुळे पाकिस्तानच्या अडचणीत चांगलीच मोठी वाढ झाल्याचे बघायला मिळत आहे. अंकाराने स्पष्ट केले आहे की सौदी अरेबिया आणि पाकिस्तानसोबत कोणत्याही बहुपक्षीय संरक्षण करारात सामील होणार नाहीत. भारताने ज्याप्रकारे पाकिस्तानात घुसून दहशतवाद्यांचे कंबरडे मोडले, त्यानंतर पाकिस्तानने सौदी अरेबियासोबत मोठा संरक्षण करार केला. पाकिस्तानवर हल्ला म्हणजे सौदी अरेबियावर समजला जाणार असल्याचा तो करार आहे. आता यादरम्यानच तुर्कीने हातवर गेले. पाकिस्तानला तुर्कीकडून मोठ्या अपेक्षा असताना तुर्कीने हा मोठा झटका दिला.

एएफपीच्या अहवालानुसार, तुर्कीच्या संरक्षण अधिकाऱ्यांनी बोलताना स्पष्टपणे सांगितले की, एर्दोगान सरकार पाकिस्तान आणि सौदी अरेबियासोबतच्या कोणत्याही संरक्षण कराराचा भाग नाही. हेच नाही तर त्यांनी म्हटले की, आम्हाला असा संरक्षण करारात कोणत्याही रस नाहीये. त्यांनी पुढे म्हटले, सौदी अरेबिया कोणत्याही बहुपक्षीय व्यवस्थेच्या बाजूने नक्कीच नाही, ते फक्त द्विपक्षीय संरक्षण करारांना प्राधान्य देतात, ही वस्तू स्थिती आहे.

हेच नाही तर तुर्कीने पाकिस्तानबद्दल चिंता व्यक्त केली आहे. भारत, अफगाणिस्तान आणि इराणसारख्या देशांसोबत अगोदरच पाकिस्तानचे संबंध तणावात आहेत. पाकिस्तानच्या सीमेवर तणाव बघायला मिळतोय. पाकिस्तान सैन्य दबावात असल्याचेही सांगितले जाते. तुर्कीने यादरम्यान पाकिस्तानमधील आर्थिक स्थितीकडेही बोट दाखवले मजबूत अर्थव्यवस्था मजबूत लष्करासाठी उपयुक्त ठरेल, असेही त्यांनी म्हटले.

तुर्की आणि पाकिस्तानने त्यांचे संवर्धन संबंध मजबूत असल्याचे अधोरेखित केले आहे.

## निवडणूक आयुक्तांनी गैरवर्तन केले, अपमान केला! बैठकीतून तडकाफडकी बाहेर पडत ममता बॅनर्जींचा आरोप

**नवी दिल्ली : दि. २ वृत्तसंस्था**




पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोमवारी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची भेट घेऊन मतदार याद्यांची विशेष सखोल फेरतपासणी प्रक्रियेबाबत तक्रार केली. ही भेट जवळपास सुमारे ९० मिनिटे चालली. परंतु, या बैठकीत निवडणूक आयुक्तांनी गैरवर्तन केल्याचा दावा ममता बॅनर्जी यांनी केला. बैठक अर्ध्यावर सोडून त्यांनी बाहेर येऊन माध्यमांशी संवाद साधत निवडणूक आयोग आणि आयुक्तांवर टीका केली.

बैठकीतून बाहेर पडताना बॅनर्जी यांनी पत्रकारांना सांगितले की, ''बंगालमध्ये किरकोळ स्पेलिंग बदल आणि शीर्षक बदलांमुळे मतदारांची नावे रद्द केली जात आहेत. त्यांनी प्रथम लोकांची नावे काढून टाकली. निवडणूक आयुक्त हे भाजपाचे आयटी सेल आहेत. तुम्ही म्हणता की ही लोकशाही आहे? बॅनर्जी आणि बंदोपाध्याय, मुखर्जी आणि मुखोपाध्याय, किंवा चॅटर्जी आणि चट्टोपाध्याय अशी स्पेलिंगमधील फरकांमुळेही नावे वगळली जात आहेत.''

५८ लाख मतदारांची नावे कोणत्याही चौकशीशिवाय काढून टाकण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला. ममता बॅनर्जी यांनी आरोप केला की या तपासणीदरम्यान बूथ-स्तरीय अधिकाऱ्यांवर (बीएलओ) दबाव आणला जात होता. तसंच, अनुसूचित जाती आणि अल्पसंख्याकांना जास्त प्रमाणात त्रास होत आहे. ''अनुसूचित जाती आणि अल्पसंख्याकांना का लक्ष्य केले जात आहे? ते मानव नाहीत का?'' असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. प्रक्रिया निवडणुकांच्या तोंडावर का राबविली जात आहे. आसाममध्ये भाजपाचं सरकार आहे, तिथे ही प्रक्रिया का राबविली नाही? ुम्ही बंगाल, केरळ आणि तामिळनाडूला लक्ष्य करत आहात आणि भाजपाशासित राज्य सोडत आहात'', असाही आरोप त्यांनी केला.

## चिंताजनक | ऑक्सफोर्डने दिला इशारा

# जगात भयानक उष्णता वाढणार

**लंदन: दि. २ वृत्तसंस्था**



जगात अनेक ठिकाणी हाडे गोठवणारी थंडी पडली आहे. परंतू आता उन्हाळ्यात देखील भयंकर उष्णता वाढण्याचा इशारा देण्यात आला आहे. ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटीच्या ताज्या संशोधनातून नवीन माहिती उघड झाली आहे. २०२६ चा नवा धोकादायक रिपोर्ट जारी झाला आहे. साल २०५० पर्यंत जगातील ४० टक्के लोकसंख्या म्हणजे जवळपास ४ अब्ज लोक अशा उष्णतेला झेलण्यास मजबूर होतील. हे तापमान सहन करणे मनुष्यांच्या क्षमते पलिकडे आहे. या अहवालात भारतासाठी देखील इशारा देण्यात आला आहे. असा उन्हाळा येणार आहे की पृथ्वीचे पाणी उकळण्याची वेळ येणार आहे.

ऑक्सफोर्डच्या संशोधकांच्या मते भारतासाठी 'रेड अलर्ट' जारी केला आहे. अहवालानुसार भारत, नायजेरिया आणि इंडोनेशिया त्या देशात सर्वात पुढे आहे जेथे उष्णता सर्वात भयानक रुप धारण करणार आहे. असा दावा केला जात आहे की पारा ४५ ते ५० डिग्री सेल्सियस पार करणार आहे. त्यामुळे मानवाचे शरीराच्या अवयवयांना आतून थंड ठेवणे अशक्य होणार आहे. भारतातील कोट्यवधीची लोकसंख्येकडे एअर कंडीशनिंगसारखी सुविधा नाही.तसेच सुरक्षित घरे नाहीत त्यामुळे गरीबांची अवस्था अत्यंत बिकट होणार आहे. संशोधकांनी दावा केला आहे की येणाऱ्या दशकात उकाड्याने होणाऱ्या मृत्यूंची संख्येत एक प्रकारची सुनामी येण्याची शक्यता आहे. २०१० मध्ये केवळ १.५ अब्ज लोक या संकटात होते, परंतू २०५० पर्यंत ही संख्या दुप्पट होणार आहे. आपण एका अशा वातावरणाकडे जाणार आहोत ज्याची ओळख केवळ आग आणि धुर असणार आहे. तुम्हाला वाटत असेल की या उकाड्यापासून रशिया, कॅनडा वा फिनलँड सारखे थंड देश सुरक्षित आहे, तर ही तुमची मोठी चुक आहे.कारण या देशात घरे गर्मी शोषणासाठी आणि थंडीपासून बचावासाठी तयार केलेली आहेत. त्यामुळे जसजसे तापमानात वाढ होईल तसतसे ही घरे गॅस चेंबरमध्ये परिवर्तित होतील. येथील वाहतूक आणि आरोग्य यंत्रणा भीषण उष्णतेसाठी तयार नाही.

### मोठ्या प्रमाणावर स्थलांतर

ऑक्सफोर्डच्या संशोधक राधिका खोसला यांनी सावधान करताना सांगितले की १.५ डिग्रीची सीमा मर्यादा पार होताच. आरोग्य आणि शेती सर्वकाही नष्ट होऊन जाईल. अन्न आणि पाण्याचे संकट येईल. पिके एकतर जळतील किंवा पाण्यावाचून मरतील. कोट्यवधी लोक रहाण्या लायक जागा शोधण्यासाठी त्यांची घरे सोडतील. मोठ्या प्रमाणावर स्थलांतर घडून येईल.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले साहित्य या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## सवंग आर्थिक योजनांना आळा घालणे आवश्यक!

भारताची अर्थव्यवस्था एप्रिलपासून सुरू होणाऱ्या २०२६-२७ या आर्थिक वर्षात ६.८ ते ७.२ टक्क्यांनी वाढेल, हा आर्थिक पाहणी अहवालात व्यक्त केलेला अंदाज आजच्या जागतिक आर्थिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर बराचसा आशादायक ठरतो शिवाय देशाची अर्थव्यवस्था या कोंडीतून मार्ग काढेल, असा संकेतही तो देतो. चालू आर्थिक वर्षासाठी व्यक्त केलेल्या ७.४ टक्क्यांच्या विकास दर अंदाजाच्या तुलनेत तो कमी असला, तरी जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून भारताचे स्थान टिकून राहील, असा आशावाद अहवालात व्यक्त केला आहे. तो आश्वासक आहे. व्यापारातील जोखीम आणि जागतिक अस्थिरतेचे मळभ हे चित्र आगामी दशकभरासाठी तरी कायम राहील आणि त्या सावटाखालीच देशाची पुढील आर्थिक वाटचाल होईल, असे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी तयार केलेल्या या पाहणी अहवालात स्पष्ट करण्यात आले. दरवर्षी केंद्रीय अर्थसंकल्प पूर्व आर्थिक पाहणी अहवाल येतो. त्यामध्ये देशातील आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतला जातो. तसेच भविष्याबद्दल अंदाजही बांधण्यात येतात. अर्थव्यवस्थेत असलेल्या त्रुटी दाखवून कोणकोणत्या सुधारणा करणे आवश्यक आहे, हे सूचविले जाते. सरकार कोणतेही असो, या अहवालातील सूचना गंभीरपणे घेणे आवश्यक असते. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी भारतासह अनेक देशांवर वारेमाप आयात शुल्क लादले. युरोपीय देशांशी देखील पंगा घेतला. इराणला त्यांनी पुन्हा कारवाईचा इशारा दिला. ट्रम्प यांची कारकीर्द आणखी तीन वर्षे असून, त्याचा आंतरराष्ट्रीय व्यापारावर सतत प्रतिकूल परिणाम होण्याची भीती आहे. अमेरिकेच्या आयात शुल्कामुळे रुपया जवळपास ५ टक्क्यांनी घसरला, तरीदेखील रुपयाच्या मूल्यात अर्थव्यवस्थेच्या उत्तम कामगिरीचे पुरेपूर प्रतिबिंब उमटले नसल्याचे निरीक्षण अहवालाने नोंदवले आहे. मुळात देशातील भाववाढ आटोक्यात आहे आणि विकासाच्या दिशेने नवनवीन पावले उचलली जात असताना विदेशी गुंतवणूकदार भारताकडे पाठ का करत आहेत, असा रास्त सवाल अहवालात केला आहे. वाढती निर्यात नियंत्रणे, प्रगत देशांकडून तंत्रज्ञान देण्याची टाळाटाळ आणि जागतिकीकरणाचा शेवट दर्शवणारी कार्बन कर यंत्रणा हे सर्व बघता भारताने स्वदेशीचा पुरस्कार करणे अपरिहार्य असल्याची टिप्पणी अहवालात केली आहे. केंद्र सरकारने आत्मनिर्भर भारताची हाक दिलेलीच असून, देशांतर्गत उत्पादनाला चालना देण्यासाठी उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजना राबवली आहे. तसेच नवीन कामगार संहितांच्या अंमलबजावणीस सुरुवात केली. असंघटित गिग कामगारांनाही संरक्षणाच्या चौकटीत आणले. त्यामुळे रोजगारवाढीला चालना मिळेल, कामगारांचेही हित साधले जाईल; परंतु सेवा पुरवठादार कंपन्यांसाठी काम करणाऱ्या ४० टक्के गिग कामगारांचे प्रतिमहिना उत्पन्न अत्यल्प आहे. त्यामुळे या कामगारांसाठी प्रतितास किंवा प्रतिकामासाठी किमान उत्पन्नासारखे विशेष धोरण राबवणे गरजेचे आहे, अशी योग्य सूचना अहवालात केली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा एआयप्रणीत वाढ सर्वसमावेशक राहावी, यासाठी शिक्षण सुविधा वाढवण्याबाबत तातडीने धोरणे निश्चित करण्याची सूचनाही अहवालात आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अभिभाषणात आर्थिक सुधारणांचे महत्त्व अधोरेखित केले. देशात अनेक सुधारणा राबवण्यात आल्या असून, आता उद्योजकांनी आत्मसंतुष्ट न राहता जागतिक दर्जाच्या गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करावे. त्यातूनच जागतिक बाजारपेठा व ग्राहकांचा विश्वास जिंकता येईल, असे आवाहन पंतप्रधान मोदींनी केले आहे. सरकारने धोरणात्मक जबाबदारी पार पाडल्यानंतर उद्योजकांनी योग्य प्रतिसादही दिला पाहिजे. अहवालात काही रोख अनुदान योजनांमुळे महिलांचा रोजगार व कामाच्या बाजारातील सक्रिय सहभाग कमी होण्याची शक्यता निर्माण होत असल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. 'लाडकी बहीण'सारख्या रोख लाभ देणाऱ्या योजनांमुळे तत्काळ दिलासा मिळत असला, तरी राज्याच्या महसुली संतुलनावर दीर्घकालीन ताण येतो. त्यामुळे पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य यासाठी उपलब्ध निधी मर्यादित राहतो, असे ताशेरेही अहवालात मारले आहेत. केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर मध्य प्रदेशपासून ते पश्चिम बंगालपर्यंत अनेक राज्यांनी सवंग आर्थिक योजना सुरू केल्या असून, याला आळा घालणे आवश्यक आहे. आर्थिक अनारोग्याकडे बोट दाखवताना देशातील जनतेच्या स्वास्थ्याबाबतही महत्त्वाची टिप्पणी अहवालात केली आहे. बैठी जीवनशैली व प्रक्रियायुक्त खाद्यपदार्थांचा वाढता वापर यामुळे भारतात लठ्ठपणाचे प्रमाण वाढत आहे. त्यातून मधुमेह, हृदयविकार आणि उच्च रक्तदाब यासारख्या रोगांचा धोका वाढला. कृषी क्षेत्रात किंमत आणि उत्पादनांची अस्थिरता असल्यामुळे निर्यातीचे धोरण अल्पकालीन उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून राबवले जात असल्याची स्पष्टोक्तीही अहवालात केली आहे. सोयाबीन, कापूस, कांदा अशा अनेक पिकांबाबत आयात-निर्यात विषयक धोरणात धरसोड दिसून येते आणि हे टाळणे आवश्यक आहे. मुलांच्या डिजिटल सवयी सुधारण्यात शाळा महत्त्वाची भूमिका बजावतात हे नमूद करतानाच जुगाराची विविध ॲप आणि विशिष्ट जाहिरातींच्या बाबतीत समाजमाध्यमांच्या वापरासाठी वयोमर्यादेची शिफारस केली आहे. यासाठी शाळा आणि समाजसेवी संस्थांना पालकांसाठी कार्यशाळा आयोजित कराव्या लागतील. समाजमाध्यमांच्या अतिवापरामुळे केवळ मुलांच्याच नव्हे, तर सर्वांच्याच मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. चालू आर्थिक वर्षाचा विकास दर ७.४ टक्के इतका असेल, असा होरा केंद्रीय अर्थ खात्याने व्यक्त केला होता. तो त्यापेक्षा कमी असेल, असे भाकित आर्थिक अहवालाने केले. त्याची कारणे शोधून केंद्र सरकारने तातडीने उपाय योजले पाहिजेत. जागतिक व्यापार गर्तेत सापडला असताना देश कोणती आर्थिक पावले उचलणार, हे अर्थसंकल्पातून स्पष्ट झाले आहे. सुधारणांची गरज अहवालात मांडली आहेच.



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### बजेट



विकासाच्या मार्गावर
आहे म्हणते बजेट
मेहरबानी कोणावर
सांगाल का तुम्ही थेट

गुजरातला मोठी गिफ्ट
महाराष्ट्राला तुलनेने कमी
कुणीच काढत नाही खोट
हो नेतेच देऊ लागले हमी

ह्या शेतकऱ्यांना नारळ
हा अन्नदाता वाऱ्यावर
कंपन्यांना रोज फराळ
आता बेदखल रोजगार

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

जे जे पेरलेले
ते तुला मिळेल ।
ना राजा सुटेल
ना रंकही ॥

चिंतेचा जन्म हा
मोहातून होतो ।
चितेतून जातो
शेवटाला ॥

द्वेषाने मिळते
सुडाची भावना ।
पवित्र भावना
माफितून ॥


मनाचे मंथन
चिंतनाने व्हावे ।
चिंतेतून व्हावे
मुक्त सारे ॥



## सप्तरंग

डॉ. विनय व. दांदळे
मो. ९८२२२ ३१७६९

# ' शोधातून उमललेला अर्थ '



दैनंदिनतेच्या गर्दीत हरवलेले क्षण
कधी अचानक हाताला लागतात.
तेव्हा कळतं हे जे क्षण गवसतात
ते क्षण क्षुल्लक नसतात, आपणच
त्यांच्याकडे पाहणं विसरलेलो
असतो.
जसं सेलोटेपचं टोक सापडणं
दिसायला क्षुल्लक, बोलायला साधं;
पण अनुभवायला मात्र अगदी
मूक चमत्कार.दैनंदिन आयुष्याच्या
कोरड्या कडांवर,
हात घसरत असताना,
नखं वेळेवर घासली जात असताना,
अचानक काहीतरी अलगद बोटाला
लागतंन दिसणारं, पण जाणवणारं.
क्षणभर श्वास थांबतो
आणि मन म्हणतं,
"हेच ते...!"
ते टोक म्हणजे जणू विस्मरणाच्या
धुळीत अडकून पडलेली एखादी
आठवण जिला आपण विसरलो
होतो,पण तिने आपल्याला कधीच
विसरलेलं नसतं.
सेलोटेप म्हणजे पारदर्शक गुंफण.
त्याची सुरुवात कुठे आहे, शेवट कुठे
हे कळत नाही.
जसं आयुष्याचंही कळत नाही.
आपण त्यावर बोटं फिरवतो,
डोळ्यांनी प्रकाश शोधतो,
आणि मन मात्र अधीरपणे
स्वतःचाच अर्थ उलगडू पाहतं.
त्या शोधात अस्वस्थता असते.
थोडी चिडचिड.थोडं अपयश.
जसं शब्द ओठांवर येऊनही
उतरत नाहीत,जसं अश्रू डोळ्यांत
साठूनहीओघळत नाहीत.
आणि मग अचानक.
अगदी अनाहूत. एक टोक सापडतं.
ते मोठ्या आवाजात सापडत नाही.
ते जाहीरपणे प्रकट होत नाही.ते फक्त
जाणवतं.कल्पना म्हणजे हेच टोक.
मनाच्या गाभाऱ्यात लपलेला
अतिसूक्ष्म धागा अस्पष्ट, धूसर,
पण अस्तित्वाने ठाम.तो धागा
सापडतो तेव्हा
शब्द स्वतःहून रांगेत उभे राहतात.
अस्वस्थतेचं पाणी निवतं.
डोळ्यांत चित्रं उमलतात.
आणि आत कुठेतरी एक शांत सूर
जन्म घेतो. कल्पना सुचणं म्हणजे
अंधारलेल्या पाण्यात चंद्राचं प्रतिबिंब
दिसणं.
तो चंद्र हातात येत नाही,
पण पाण्याचं सौंदर्य मात्र बदलून
जातं.कधी ही कल्पना येते
एका सुगंधातून ओळखीच्या
अंगणातल्या मातीसारखी.कधी
एखाद्या विसरलेल्या नजरेतून.
कधी एका वाक्यातून,
जे आपण ऐकतो, पण लगेच समजत
नाही.मन थरथरतं.काहीतरी हलतं.
पण नाव देता येत नाही.आणि
मग तो क्षण येतो जणू अंतर्मनाचं
घड्याळ थोडा वेळ थांबतं.
तोच असतो कल्पनेचं टोक
सापडण्याचा क्षण.
तो क्षण निःशब्द असतो,
पण स्पंदनांनी भरलेला.
तो भाषेच्या आधीचा असतो,
पण भाषेला जन्म देणारा.
एकदा टोक सापडलं,
की कल्पना वाट मागत येते.
कधी ती कवितेत एक ओलसर
ओळ बनते.कधी कथेत जिवंत श्वास
घेणारं पात्र. कधी लेखात चिंतनाचं
मध्यबिंदू.
ती फुलते जसं बी उगवून वाऱ्याशी
बोलायला लागतं. जसं कोरड्या
दगडातून अचानक झरा फुटतो.
जिथं काहीच नव्हतं, तिथं अर्थ उभा
राहतो. शब्दांना घर मिळतं. आणि
वाचणाऱ्याच्या मनालाही
एक सावली मिळते. कवी म्हणजे
या टोकाचा शोध घेणारा. लेखक
म्हणजे या गुंफणीतून सत्य अलगद
उलगडणारा. कलावंत म्हणजे या
टोकातून काळाशी संवाद साधणारा.
पण कल्पना सापडणं
हेच सर्जनाचं सर्वात गूढ,
सर्वात अंतर्मुख, आणि सर्वात मौन
असलेलं सत्य आहे.
कारण आपण शब्दांत पकडतो
फक्त तिचा आवाज.तिचं मर्म मात्र
नेहमीच त्या टोकातच अडकलेलं
राहतं. आणि जेव्हा सारा टेप संपतो,
काम पूर्ण होतं, तेव्हा आपण ते टोक
पुन्हा अलगद चिकटवतो कधी
पुस्तकाच्या कडेला, कधी
अंतर्मनाच्या काठावर. आणि पुन्हा
तयार होतो पुढच्या टोकासाठी
थोडेसे अस्वस्थ, थोडेसे अधीर
पण मनोमन आशावादी. कारण
हेच तर आयुष्य आहे .कल्पना
सापडणं,तिचं उमलणं,
आणि पुन्हा नव्याने हरवून जाणं.
कारण टोक सापडलं,की तुटलेल्या
अर्थालाही शब्द मिळतात
शब्द थांबतात, टेप संपतो,पण अर्थ
अजून ओलसरच राहतो
कारण जिथं टोक सापडलं होतं,
तिथंच पुढच्या शोधाची सुरुवात
दडलेली असते.
आणि मगशब्द थांबतात.
अर्थही नाहीसा होत नाही,
तो फक्त हळूच मौनात उतरतो.
जिथं टोक सापडलं होतं, तिथंच
पुढच्या शोधाची पहिली श्वासरेषा
हलते



## विचारमंथन

डॉ. एम. आर. इंगळे
मो. 9423429060

# लोकशाहीत प्रश्न विचारणे गुन्हा आहे का...?

२६ जानेवारी, २०२६ रोजी ७७ वा प्रजासत्ताक दिन देशभरात मोठ्या उत्साहात साजरा झाला. कारण तो राष्ट्रीय सण आहे. मात्र आजपर्यंत आम्ही प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्य दिन सारख्याच पद्धतीने साजरा करत आलो, त्यामुळे १५ ऑगस्ट रोजी जे गाणे वाजवतो तेच गाणे २६ जानेवारी रोजी वाजवतो. स्वातंत्र्य लढ्यात बलिदान दिलेल्या शहिदांना अभिवादन करतो. शाळा महाविद्यालयात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करतो. या दोन्ही दिवशी फक्त झेंडा वंदन करून अशोकचक्रांकित राष्ट्रध्वजाला सलामी दिली की सुट्टी साजरी करतो, म्हणजे आम्हाला या दोन्ही दिवसाचे गांभीर्य तर कळले नाहीच पण या दोन दिवसांमध्ये काय फरक आहे याची जाणीवही नाही, एवढे आम्ही शिक्षित व उच्च शिक्षित अतिशहाणी माणसं आहोत ही आमच्या स्वातंत्र्याची आणि गणतंत्राची फार मोठी शोकांतिका आहे.



**दोन स्वातंत्र्य दिन:**

भारत इंग्रजांच्या राजकीय गुलामीत तर होताच पण भारतात सामाजिक गुलामी देखील होती. त्यामुळे इंग्रजांच्या गुलामीतून देशाला मुक्त करण्यासाठी राजकीय स्वातंत्र्याचा तर याचसोबत मनुस्मृतीच्या सामाजिक गुलामीतून समाजाला मुक्त करण्यासाठी मानवी स्वातंत्र्याचा देखील लढा सुरू होता. राजकीय स्वातंत्र्य लढ्याचे फलित म्हणजे १५ ऑगस्ट, १९४७ रोजी देश इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त होऊन स्वतंत्र झाला, तर सामाजिक लढ्याची परिणीती म्हणून न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूलभूत तत्त्वांवर आधारित संविधानाची निर्मिती झाली आणि २६ जानेवारी, १९५० रोजी त्या संविधानाची देशात अंमलबजावणी सुरू झाली आणि देश लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र झाले. त्यामुळेच देशातला माणूस सामाजिक गुलामीतून मुक्त होऊन स्वतंत्र झाला. म्हणूनच आपल्या देशात दोन वेळा राष्ट्रध्वज फडकवून देशाचा आणि मानवी स्वातंत्र्याचा दिवस साजरा केला जातो. १५ ऑगस्ट, १९४७ रोजी देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळाले. म्हणून या दिवशी स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शहिदांना तसेच आपल्या सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या स्वातंत्र्य सेनांनींना अभिवादन करणे हे प्रत्येक भारतीयांचे आद्य कर्तव्य आहे. तसेच या दिवशी त्यांच्या बलिदानाचा आणि त्यागाचा गौरव करणारी गाणी वाजविली पाहिजेत आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमातून त्यांच्या बलिदानाचा इतिहास नवीन पिढीसमोर मांडला पाहिजे. तर २६ जानेवारी, १९५० रोजी संविधान सभेने आणि संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मोठ्या कष्टाने संविधानाची निर्मिती केली आणि भारत प्रजासत्ताक राष्ट्र झाले. त्यामुळे या दिवशी संविधानाचा गौरव करून संविधान सभेतील सदस्यांना आणि संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करणे, त्यांच्या संविधान निर्माण कार्याची आठवण ठेवून संवैधानिक मूल्यांची रुजवण करणे, त्यानुषंगाने कार्यक्रम आयोजित करणे गरजेचे आहे. पण भारतीय लोकांमध्ये अजूनही ही समज निर्माण होऊ नये ही फार खेदाची गोष्ट आहे.

**नाशिकची घटना :**

दरवर्षीप्रमाणे दिनांक २६ जानेवारी, २०२६ रोजी देशभरात ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा झाला. मात्र या दिनाच्या निमित्ताने अनेक शाळांमध्ये, महाविद्यालयात, ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, सरकारी कार्यालये इत्यादी ठिकाणी प्रजासत्ताक दिनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा लावली नाही, त्यांना अभिवादन केले नाही तसेच संविधानाच्या उद्देशिकेचे वाचनही केल्या गेले नाही. त्यामुळे शासन निर्णय असतांनाही असे का व्हावे याबद्दल कोणीच प्रश्न उपस्थित करण्याची हिंमत करत नाही हीच खरी समस्या आहे. पण नाशिक येथील शासकीय कार्यक्रमात पालकमंत्री गिरीश महाजन यांनी आपल्या भाषणात संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेतले नाही. त्यामुळे अस्वस्थ झालेल्या महिला वन कर्मचारी माधवी जाधव यांनी पालकमंत्री गिरीश महाजन यांना आपण भाषणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव का घेतले नाही असा थेट प्रश्न विचारला असता त्यांना पोलिसांनी गुन्हेगारांसारखे ताब्यात घेऊन पोलिस ठाण्यात नेले, त्यांना समज देऊन माफी मागायला सांगितल्याचे वृत्त वाचून सखेद आश्चर्य वाटले.

मात्र माधवी जाधव यांनी मी काहीही चूक केली नाही, फक्त प्रश्न विचारला त्यामुळे माफी मागण्याचा प्रश्नच नाही. याउलट पालक मंत्र्यांनी फार मोठी चूक केली असून त्यांनी माफी मागावी अशी स्पष्ट भूमिका घेऊन मी लोकशाहीला मानते आणि प्रजासत्ताक दिन कार्यक्रमात ज्यांच्यामुळे प्रजासत्ताक दिन आहे, त्यांचे नाव कां घेतले नाही असा रास्त प्रश्न मी पालकमंत्र्यांना विचारला, कोणताही गोंधळ केला नसून कोणाचाही अवमान किंवा कोणताही गुन्हा केला नाही. तरीही जर प्रशासनाने मला निलंबित केले तरी चालेल पण मी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव पुसू देणार नाही, असा आक्रमक पवित्रा घेऊन फार मोठी हिंमत दाखविली. सरकारी सेवेत असतांनाही मंत्र्याची चूक दाखविण्याची हिंमत करणे ही फार मोठी धैर्याची, कौतुकाची आणि अभिनंदनीय बाब आहे. म्हणून माधवी जाधव यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव न घेणे कृतघ्नपणा:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मोठ्या कष्टाने, रात्रंदिवस मेहनत करून आपल्या अफाट बुद्धीसामर्थ्याने, सखोल अभ्यासातून व प्रचंड विद्वत्तेने भारतीय संविधानाची निर्मिती केली. म्हणूनच त्यांना संविधानाचे(पान ५ वर...)

# निरूपद्रवी समाज निर्मितीचे कारखानदार: जोग महाराज

## अध्यात्म


ज्ञानेश्वर महाराज वाघ



पारंपारिक वर्णाश्रमाच्या भिंती पुरत्या पाडून टाकत सर्वप्रथम मराठी संत साहित्य सार्थ करून, श्रीमद्भगतगीतेसहीत संस्कृत वांङ्मयाचे दरवाजे सर्वांकरिता सताड उघडे करून देत , भगवान श्री ज्ञानोबारायानंतर आपल्या मातृत्वाचा प्रेमपान्हा अठरापगड जातीच्या आबारवृद्धांना आकंठ पाजून , त्या सर्वांना आपण एका ईश्वराचे लेकरे असल्याने गुण्या गोविंदाने नांदण्याचे बाळकडू पाजून, वारकरी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांना अध्यात्मिक दृष्ट्या सुदृढ व सक्षम बनविणारे निरुपद्रवी समाज निर्मितीचे कारखानदार स्वानंद सुख निवासी सद्गुरु विष्णु महाराज जोग हे होत. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे थोडे तात्विक चिंतन.

आपली भारत माता पारतंत्र्याच्या शृंखलेमध्ये शेकडो वर्षापासून जखडली होती. अशा भीषण कालखंडात आध्यात्मिक शिक्षणाची तीव्र जिज्ञासा असलेल्या साधकांच्या सोयीच्या दृष्टीने २४.३.१९१७ चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १८३९ रोजी भगवान श्री ज्ञानोबारायांच्या जन्म , कर्म , लीला व समाधिरुपाने अखंड वास्तव्याने पुनित झालेल्या श्रीक्षेत्र आळंदी भूमीत माता इंद्रायणीच्या पवित्रतम् तटावर ज्या ठिकाणी विद्यार्थ्याला कुठलेही शैक्षणिक शुल्क आकारल्या जाणार नाही व शिक्षकाला सुद्धा मानधन दिल्या जाणार नाही अशा प्रकारची घटना निर्माण करून, वारकरी शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्यावेळी त्यांचा हेतू हाच होता की, शिक्षण हा सर्व चळवळीचा पाया असून; धार्मिक शिक्षण हे त्या चळवळीचे रहस्य आहे. कुठल्याही देशाच्या उन्नतीसाठी फक्त अचाट बुद्धीच्या माणसांचा फारसा उपयोग होत नाही. तर त्या अचाट बुद्धीला शुद्ध आचरणाची व मनाच्या सुसंस्कृततेची नितांत आवश्यकता असते. मनाचा सुसंस्कृतपणा तसेच व उत्तम चारित्र्यची निर्मिती हे कार्य कायद्याच्या धाकापेक्षा धर्माच्या प्रेमानीच होते. ते घडण्याच्या दृष्टीने सोयीचे व्हावे याकरिता संस्थेची पायाभरणी करून, सर्वश्री श्रीगुरु बंकटस्वामी महाराज, मारुती महाराज गुरव, लक्ष्मण महाराज इगतपुरीकर , प्रा. मामासाहेब दांडेकर या चार भरभक्कम स्तंभावर ही इमारत त्यांनी उभी केली . श्रीक्षेत्र आळंदी येथे शतकोत्तर कार्यरत असणाऱ्या या संस्थेने तेव्हापासून आजतागायत सामाजिक हिताचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून, त्यांना योग्य मार्गदर्शन करणारे व प्रबोधनासह परिवर्तनाची क्षमता असलेले अनेकिनेक नामवंत प्रबोधनकार निर्माण केले. त्या अग्रण्यांपैकी एक विदर्भातल वारकरी संप्रदायाचे थोर प्रवर्तक संतश्री वासुदेव महाराज अडगावकर हे होत. ज्यांनी स्वतः चे संपूर्ण जीवन व संपत्ती आमजनतेला सुसंस्कृत बनविण्याकरिताच खर्ची घालून, आषाढ शुद्ध एकादशीच्या पर्वकाळावर २.७.२००९ भूवैकुंठ पंढरीक्षेत्रात स्वतःचा देह सुद्धा भगवान पंढरीशांच्या चरणी विलिन केला.

या थोर युगद्रष्ट्या महापुरुषानी आजन्म अहोरात्र आमजनतेकरीता अपार कष्ट करून स्थापन केलेली ही संस्था यावच्चंद्रदिवाकरौ चालावी याकरिता सर्व प्रकारची व्यवस्था लावून, माघ वैद्य प्रतिपदा शके १८४१ गुरुवार ५ .२.१९२० या शुभदिनी आपले उपाश्यदैवत असणाऱ्या भगवान श्रीज्ञानेशांच्या आळंदी क्षेत्रात सकाळी नऊ वाजता उत्तराभिमुख बसून " का झांकलिये घटींचा दिवा नेणिजे काय जहाला केव्हां या रीती जो पांडवा देह ठेवी " या ज्ञानेशांच्यानाप्रमाणे आपल्या भौतिक शरीराचा त्याग करून माता इंद्रायणीच्या तीरावर अनंतात विलीन झाले. त्या स्वानंद सुख निवासी सद्गुरु जोग महाराजांच्या चरणी हे वाक्पुष्प समर्पित.




## समीक्षण

दीपक शिव
मो. नं. 9822240012

# नातेसंबधाच्या रूढ चौकटीपलीकडचे प्रेम : LOVE IS LOVE

परिवर्तन हवं असेल तर निर्णय घ्यावे लागतात पृष्ठ क्रमांक ७ हे वाक्य ***LOVE IS LOVE*** या पुस्तकाची विण घट्ट पकडून ठेवते.पुस्तकाचं शिर्षक इंग्लिश असलं तरी ते मराठी भाषेतून आशा नेगी यांनी लिहीले आहे. त्या म्हणतात मला व्यक्ती सापेक्ष भावना पोहचायला तंतोतंत दुसरा शब्द रूचत नव्हता, त्यांच्या कादंबरीत आपल्याला दोन व्यक्तिरेखा नयन आणि प्रज्ञा भेटतात,या दोघींचे भावविश्व व अंत:करणातली अस्वस्थता साकारताना लेखिकेचा पुरोगामी विचारप्रवाह विषयाशी एकरूप होतो म्हणून परंपरा आणि जुन्या रूढीवादी दृष्टिकोन पुढे ठेऊन लिखाण केले आहे. तर्कशुध्द वैचारिक पातळीवर कथानक नेताना आपल्या भारतीय संस्कारांना तडा दिलाय जातो का ?.. तर तसे नाही भावनांच्या मुल्यांकनाला महत्व प्राप्त करून दिले. हे वाचताना जाणवतं "लव्ह इज लव्ह" वाचताना भावनिक मुल्य जपलेली प्रकर्षाने जाणवतात.कादंबरीतील विविध प्रसंगात ललित लेखनाची एक तरल कांती रोमँटिक मुड निर्माण करते.एका वेगळ्या नात्याचा वेध सुरू होतो. "लव्ह इज लव्ह" या कादंबरीची अर्पण पत्रिकाच आयुष्यात प्रेमाची अनुभूती अनुभवलेल्या प्रत्येकास समर्पित... अशी आहे. इथे सापडतो सहवासातील सहवेदनेचा गर्भ आणि लेखिकेने तोच धागा ज्या नात्याला नावच देता येत नाही त्याच्या मूळाशी जाऊन केलेलं शब्दाच सिंचन हे नवसंजीवन म्हणून आपल्यापुढे प्रगट होतं..ते वाचक म्हणून समजून घेताना अनुत्तरित प्रश्नांचे काहूर माजवते आणि मुल्यांचा विवेक पुन्हा पुन्हा तेजोमय होत जातो. सौंदर्याचा दरारा हा शब्द प्रयोग प्रथमच वाचनात येतो. प्रज्ञा ही व्यक्तीरेखा या कादंबरीत अधिकच महत्वाची आहे.ती नखशिखांत सुंदर आहे. मग ती लग्न करायला नकार का देते .या सगळ्या प्रश्नांची उत्तरे कादंबरीच्या दुस-या प्रकरणाच्या शेवटच्या सारांशामध्ये उलगडत जातात...मलपृष्ठावरील डॉ. सबिहा सेक्स आणि रिलेशनशिप कोच यांच्या अभिप्रायचा खरा अर्थ इथे कळतो, प्रेम ही एकमेव अशी कृती आहे. जी माणसाला माणूस बनवते, ती कधीही, कुठेही, कोणालाही, कोणासोबतही, कुठल्याही वयोगटात होऊ शकते, प्रेमात माणूस हा माणूस बनतो, प्रेम ही कृतीत दिसणारी, व्यक्त होणारी आणि अनुभवता येणारी अशी एक भावना आहे. प्रेम ही सुंदर फिलिंग आहे. त्याला कुठलेच बंधन नाही की कुठली चौकट नाही ते मुक्तच असतं....हा सारांशं या कादंबरीचा मर्म सांगणारा आहे.कादंबरीची सुरुवात नदीच्या उगमासारखी वेगळे भावविश्व घेऊन रूंजी घालायला सुरूवात करते पुढे नदीच्या प्रवाहातील एक भोवरा म्हणजे...पार्टीतील प्रज्ञाच्या वडीलांनी वाक्य " मित्रहो आजचा दिवस आमच्या आयुष्यातील खूप महत्वाचा आहे. माझ्या लाडक्या मुलीच्या आयुष्यात एक नवीन पर्व सुरू होणार आहे. प्रज्ञाचा साखरपुडा आपल्यासमोर जाहीर करतो. त्याच वेळी आनंदने तिच्या बोटात अंगठी सरकवली टाळ्याचा कडकडाट.....प्रज्ञा स्थिर होती तिच्या पायाखालची रेती सरकली भ्रमनिराश या शब्दाचा अर्थ तिने अनुभवला ती भांबावून गेली... प्रज्ञाने अंगठी बाहेर काढत, मम्मी डॅडीकडे वळत ..नयनचा हात पकडून सर्वांसमोर म्हणते आज मी तुम्हाला सत्य सांगणार आहे.कदाचित ते तुम्हाला स्विकारणंही कठीण जाईल... धक्का बसेल...गेल्या चार वर्षापासून मी आणि नयन रिलेशनशिपमध्ये आहोत....आम्ही लेसबियन आहोत, जेंडर माझ्यासाठी महत्वाचं नाही.हे प्रज्ञा जाहीरपणे सर्वांना सांगते तेव्हा सगळ्यांच्या नजरा आश्चर्यचकित होतात. हे भारतीय संस्कृतीला न पचणार होतं " " लेसबियन या विषयाला धरून असणारं हे पुस्तकं लक्ष वेधून घेत माझ्या वाचण्यात आलेलं हे पहिलं पुस्तकं आहे. लेसबियन म्हणजे सामाजिक लज्जास्पद आयुष्य जगणं हा समज भारतात आज असला तरी पूर्व इतिहासातील काही ग्रंथाच्या नोंदी सापडतात असा उल्लेख लेखिकेने शेवटच्या पृष्ठावर दिला




आहे,नंतरच्या काळात मात्र लेसबियन स्त्री ही कलंकित म्हणून तिच्याकडे पाहिलं जाऊ लागले आजही तो समज दृढ झालेला आहे.या पुस्तकाने तोच समज पुसण्याचा प्रयत्न केला आहे.पण त्यांना समजून घेताना लेखिकेने लेसबियन असणं म्हणजे नेमक काय याची सायंटिफिक उत्तरे देण्याचा प्रमाणिक प्रयत्न केला आहे.पण तो वेगळ्या पध्दतीने....तो असा नयन ही या कादंबरीतील महत्वपूर्ण बिनधास्त स्वभावाची व्यक्तीरेखा डॉक्टरांकडून जाणून घेत आहे असे दाखवून त्यातील महत्वपूर्ण काही घटक पुढील प्रमाणे जन्मजात कारणे -डोळ्याचे रंग, आवाज, उंची, लैगिक आकर्षणाची प्रवृत्ती, गर्भावस्तेतले हार्मोन्स- आईच्या गर्भात बाळ विकसित होत असताना हार्मोन्सचा परिणाम विकासावर होतो, त्यामुळे आकर्षणाची दिशा नैसर्गिकरीत्या ठरते. मेंदूची रचना- गे आणि लेसबियन व्यक्तीमध्ये मेंदूतले काही भाग हे वेगळ्या पद्धतीने विकसित होतात.पर्यावरण व अनुभव - जन्मजात प्रवृत्ती असली तरी अनुभव, समाज, कुटुंबाचे वातावरण, या परिणाम होतच असतो. हेट्रोसेशुअल, बायसेक्शुअल यातला फरक वाचताना कळतो,कादंबरीतील अनुषंगाने आलेले घटनाक्रमाचे काही स्पर्श,करपलेल्या धुमा-यासारखे मनाला टोचतात ती तर आपसुक लैगिंक आकर्षण निर्माण होणं स्वतःहून वाटणं हे स्वभावधर्म असले तरी घरातील नात्यातील व्यक्तींनी बालवयात केलेला अत्याचार याला बळी पडणारी मुलं.... या पुस्तकात एक प्रसंग वाचताना येतो तो असह्य वेदनादायी वाटतो, वयाप्रमाणे वागण्यातले बदल, कपडे, खेळ, धाडसी वागणे नयनच्या वर्तनातून वर्णानत्मक लिहीली आहेत.ते समजून घेताना काही ठळक मुद्दे स्त्री इतर स्त्रियांकडे शारीरिक मानसिक,भावनिक व लैंगिकदृष्या आकर्षित होते, समलैंगिता ही एक नैसर्गिक प्रवृत्ती आहे.काही स्त्रियांना लैगिंकता बालवयातच कळते तर काहिंना उशीरा कळायला लागते .सामाजिक दबाव आणि तिरस्कार या मुळे शंभरामागे आठ अशी टक्केवारी असली तरी ती अद्याप अदृश्य स्वरुपात आहे. उघडपणे कोणी या विषया संबधित बोलत नाही. या कादंबरीत प्रज्ञाचा धाडसीपणा दाखवून लेखिकेने रिलेशनशिपची उकल केली आहे.या विषयावर प्रगल्भ चिंतन कुठेच आढळून येत नाही आताशा ती सुरूवात झालेली आहे. सोशल मिडीयावर काही ग्रुप्स एक्टिव्ह दिसतात...कादंबरी वास्तवदर्शी असली तरी काही वळणावर ती रहस्यमयी वाटते. यात जी वर्णने आलीत ती जशीच्या तशी डोळ्यातून दिसायला लागतात हे वैशिष्ट्ये लेखनातून लेखिकेने जपले आहे.या कादंबरीतील एक घटना प्रकर्षाने लक्षात रहाते प्रज्ञाच्या आईला नकारात्मक पडलेलं स्वप्न त्यातून बाहेर पडल्यानंतर होकारात्मक होणारा बदल हेच वास्तव आहे. स्विकारण्याची प्रक्रिया लेखिकेने वेगळ्या पध्दतीने मांडली आहे. ही कांदबरी वाचताना अनुषंगाने आलेली काही प्रसिध्द व्यक्तिंच्या नावांचा उल्लेख येतो.प्रभावी दिग्दर्शक करण जोहर,रितुपर्णे घोष,श्यामली अमोल पालेकर,अभिनेत्री अर्पिता घोष या शिवाय भारताबाहेरील आंतरराष्ट्रीय किर्तीच्या लोकांचा उल्लेख आढळतो (पान ५ वर...)

**महत्त्वाचे**

## अखिल भारतीय मराठा महासंघातर्फे अजित दादांना श्रद्धांजली

**अकोला:** महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना अखिल भारतीय मराठा महासंघ जिल्हा शाखेचे वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा मराठा महासंघाचे विभागीय अध्यक्ष कृष्णा अंधारे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या शोकसभेत महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष विनायकराव पवार, लोक स्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय देशमुख, प्रा. प्रकाश डवले, प्रदीप खाडे, पत्रकार पंजाबराव वर, डॉ. श्रीकांत काळे, महिला विभागीय अध्यक्ष कल्पनाताई बिडवे, बुढण गाडेकर, अजय मते, मधुकरराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अजित दादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. अजित दादांची काम करण्याची शैली, धडाडी तसेच सामाजिक, राजकीय इतर क्षेत्रात त्यांचं योगदान या संदर्भात मान्यवरांनी आपलं मनोगत व्यक्त केले. यावेळी योगेश थोरात, माधुरी वाघमारे,संजय सूर्यवंशी श्रीकांत सरोदे अरुण खोटरे, विठ्ठलराव वाघ काशिनाथ पटेकर, प्रदीप लुगडे, विक्रम वाघमारे, उज्वला बावस्कर, छाया पवार, सीमा लोणकर, सविता राऊत, नरेश सूर्यवंशी, दीपक नाकट, राजू पाटील वाहिले, डॉ. प्रकाश गोंड, रामा पाटील, साखरकर गुरुजी, दीपक गावंडे, शुभम झांबरे आदी उपस्थित होते.

## नरनाळा महोत्सव आता १५ ते १७ फेब्रुवारीदरम्यान

**अकोला :** नरनाळा महोत्सवासाठी आता दि. १५ ते १७ फेब्रुवारी या तारखा निश्चित करण्यात आल्या असून, जंगल सफारी, साहसी खेळ व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या समावेशासह महोत्सव घेण्यात येईल, असे जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे सांगितले.

महोत्सवातून सातपुड्यात वसलेल्या मेळघाटचे वनवैभव, आदिम संस्कृतीचे दर्शन घडणार आहे. उत्सवात नौकाविहार, सफारी, आदिवासी नृत्यकला सादरीकरण, पक्षीनिरीक्षण, गड भटकंती, साहसी खेळ, छायाचित्र प्रदर्शन याबरोबरच अनेकविध सांस्कृतिक महोत्सवांचे आयोजन केले जाणार आहे.महोत्सवात प्रत्येक दिवशी सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. 'चला हवा येऊ द्या', 'शिवशंभू गर्जना', तसेच प्रसिद्ध गायक कैलास खेर यांची 'लाईव्ह कॉन्सर्ट' असे नामवंत कलावंतांचा समावेश असलेले कार्यक्रम महोत्सवाचे खास आकर्षण ठरणार आहे.

## मुलाचे हातपाय बांधून लाखोंची रोकड लंपास

**नागपूर :** समता नगरात एका घरात शिरलेल्या दोन चोरांनी एकटाच बसलेल्या अवघ्या नऊ वर्षीय मुलाला हातपाय बांधून दुसऱ्या खोलीत कोंडले. त्यानंतर कपाटीतील लाखाहून अधिकची रोख लंपास केली. कपिलनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील समतानगर येथे रविवारी ही धक्कादायक घटना समोर आली.

खासगी कंत्राटदार असलेले कमलेश मासूरकर (३५) हे समतानगरात राहतात. त्यांना दोन मुले व एक मुलगी आहे. शनिवारी सकाळी ते रोजी ते नेहमीप्रमाणे कामावर गेले. त्यांचा मोठा मुलगादेखील शाळेत गेला होता. दुपारी नऊ वर्षीय मुलगा व मुलगी दुपारी शाळेतून घरी परत आले. लहान मुलगा घरी एकटाच होता. दुपारनंतर दोन चोर तोंडावर मास्क बांधून आत शिरले व त्यांनी लहान मुलाचे हातपाय बांधून त्याला एका खोलीत कोंडले. त्यानंतर चोरट्यांनी दुसऱ्या खोलीतील १ कपाटात ठेवलेले लाख ०५ हजारांची रोख रक्कम लंपास केली. काही वेळाने कमलेश घरी पोहोचले असता त्यांना मुलगा कोंडून बांधलेल्या अवस्थेत दिसला. त्यांनी तातडीने पोलिसांना फोन करून माहिती दिली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# 'ग्रोथ हब'साठी मिळणाऱ्या निधीचा नागपूरलाही फायदा :मुख्यमंत्री

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**नागपूर, दि. २ :**अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी रविवारी सादर केलेल्या अर्थसंकल्पात 'ग्रोथहब'साठी पाच वर्षात पाच हजार कोटी रुपये मिळणार असून त्याचा फायदा मुंबई, पुण्यासह नागपूर महानगरालाही होईल, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला काय मिळाले याचे विवरण रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले होते. त्यानुसार केंद्र सरकारकडून प्रत्येक वर्षी पाच हजार रुपये असे पाच वर्षात मिळणार आहे. याचा फायदा मुंबई महानगर विकास प्राधिकरण (एमएमआर), पुणे महानगर विकास प्राधिकरण आणि नागपूर महानगर विकास प्राधिकरणालाही होणार आहे, असा दावा करण्यात आला आहे.

या शिवाय पायाभूत सुविधा क्षेत्रात होणारीन १२ लाख कोटींची गुंतवणूक, शेती, पशुपालन, मत्सव्यवसाय आणि सिंचनासाठी केलेली भरीव तरतुदीचाही फायदा राज्यासह विदर्भाला होण्याची शक्यता आहे. महिला बचत गटासाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी तयार करण्याची योजना अत्यंत महत्वाची आहे.

प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतिगृहाची योजना तयार करण्यात आली आहे. जिल्हा रुग्आलयात आताप चिकित्सा व्यवस्था उभी करण्यासाठी घेतलेला निर्मय आरोग्य क्षेत्रात महत्वाचा ठरणारा आहे. अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा, उद्योग रोजगारनिर्मिती वाहतूक, लॉजेस्टिक आणि शहरी विकासावर अधिक भर देण्यात आला आहे. या निधीमुळे विदर्भात आर्थिक केंद विकसीत होईल. यामुळे आगामी काळात रोजगारनिर्मिती होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

नागपूरला विकासाच्या नव्या उंचीवर नेणारा हा निर्णय असल्याचे मत एक्सएसआयओ डंडस्ट्रियल पार्कचे संचालक आशीष अग्रवाल यांनी व्यक्त केले. मेट्रोसाठी अर्थसंकल्पात ५२० कोटी रुपये मिळाले आहे. यामुळे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामाला चालना मिळण्याची शक्यता आहे.

# चंद्रपुरात शिवसेना ठाकरे, वंचितची गटनोंदणी: महापौरपदावर दावा

अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**चंद्रपूर, दि. २ :**चंद्रपूर महापालिकेत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना आणि वंचित बहुजन आघाडी मिळून आठ सदस्यांचा गट स्थापन करण्यात आला असून आज नागपुरातील विभागीय आयुक्त कार्यालयात राहुल दुरुगकर गट यांच्या नेतृत्वात गटनोंदणी करण्यात आली आहे. चंद्रपूर महापालिकेत ठाकरे सनेचे सहा आणि वंचित बहुजन आघाडीचे दोन सदस्य आहेत.

चंद्रपूरचे आमदार किशोर जोरगेवार आणि चिमूरचे आमदार बंटी भांगडीया यांनी तसेच काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी संपर्क साधला आहे. जो पक्ष आमच्या आघाडीला महापौरपद देईल त्या पक्षाला पाठिंबा देऊ, असे शिवसेनेचे (ठाकरे) संदीप गिऱ्हे यांनी सांगितले. चंद्रपूर महापालिका महापौरपदासाठी आवश्यक संख्याबळ भाजप आणि भाजप या दोन प्रमुख पक्षाकडे नसल्याने सत्ता स्थापनेचा तिढा कायम आहे, तर दुसरीकडे काँग्रेस आणि भाजप या दोन्ही प्रमुख पक्षांमधील अंतर्गत वाद उघडपणे समोर आले आहेत.

चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसचे २७ नगरसेवक निवडून आले असून त्यांच्या सोबत आघाडीत लढलेल्या जनविकास पक्षाचे तीन नगरसेवक आहेत. अशा प्रकारे काँग्रेस आघाडीचे एकूण संख्याबळ ३० आहे. महापौरपदासाठी बहुमत सिद्ध करण्यासाठी काँग्रेसला आणखी चार नगरसेवकांची गरज आहे. दुसरीकडे भाजपचे २३ नगरसेवक असून त्यांच्या युतीतील शिंदे शिवसेनेचा एक नगरसेवक आहे. भाजप-शिवसेना युतीचे एकूण संख्याबळ २४ असून सत्ता स्थापनेसाठी त्यांना अजून दहा नगरसेवकांची आवश्यकता आहे. त्यामुळे दोन्ही आघाड्यांकडे स्पष्ट बहुमत नसल्याने अपक्ष आणि छोट्या पक्षांचे नगरसेवक निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

भाजपमधील अंतर्गत वादाने पक्षाची डोकेदुखी वाढवली आहे. माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि आमदार किशोर जोरगेवार यांच्यातील मतभेद चर्चेत आले आहेत. जोरगेवार यांच्या भाजप प्रवेशापासूनच या वादाची ठिणगी पडली होती. विविध पक्षांमध्ये फिरून आलेल्या जोरगेवार यांना भाजपकडून चंद्रपूर विधानसभेची उमेदवारी देण्यास मुनगंटीवार यांचा ठाम विरोध होता.

## केंद्र सरकारने राजपत्रात ओबीसींचा स्पष्ट उल्लेख टाळणे ही गंभीर बाब

**चंद्रपूर :** केंद्र सरकारने जाहीर केलेल्या जातनिहाय जनगणनेच्या प्रक्रियेत ओबीसी समाजाचा स्पष्ट उल्लेख टाळण्यात आल्याने मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचा उल्लेख असताना ओबीसींसाठी केवळ 'अन्य' असा शब्दप्रयोग केल्याचा आक्षेप घेत राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजुरकर यांनी केंद्र सरकारवर दगाबाजीचा आरोप केला आहे. यासंदर्भात सोमवारी (दि. २) त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयात अप्पर जिल्हाधिकारी नितीन व्यवहारे यांना निवेदन सादर करण्यात आले.

देशभरात जातनिहाय जनगणना व्हावी, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत आहे. समाजातील विविध घटकांची लोकसंख्या, त्यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा अचूक आढावा घेण्यासाठी जातनिहाय जनगणना अत्यावश्यक असल्याचे मत अनेकदा मांडले गेले. संसदेतील विरोधी पक्षनेत्यांनीही हा मुद्दा ठामपणे उपस्थित करत देशाच्या विकासात कुणाचे किती योगदान आहे, हे समजून घेण्यासाठी प्रत्येक समाजघटकाची संख्या समोर येणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले होते.

या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या ३० मे २०२५ रोजी झालेल्या बैठकीत देशात जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्रीय रेल्वे तसेच माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर ही माहिती जाहीर केली होती. त्यानुसार ऑक्टोबर २०२६ पासून जम्मू-काश्मीर, हिमाचल

## जातीनिहाय जनगणनेत नवा 'पेच': सर्वोच्च न्यायालयाकडून केंद्र सरकारला महत्वाची सूचना

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. २ :** जातिनिहाय जनगणना ही देशातील विविध सामाजिक गटांची संख्यात्मक व सामाजिक स्थिती समजून घेण्यासाठी राबवली जाणारी प्रक्रिया आहे. जनगणनेदरम्यान व्यक्तींची जात, सामाजिक वर्ग आणि संबंधित तपशील नोंदवले जातात, ज्याचा उपयोग सामाजिक व आर्थिक धोरणे ठरवण्यासाठी केला जातो. आतापर्यंत भारतात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींची माहिती नियमितपणे जनगणनेत घेतली जात होती, तर इतर मागासवर्गीयांची स्वतंत्र जातनिहाय आकडेवारी उपलब्ध नव्हती. केंद्र सरकारकडून जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, पुढील सर्वसमावेशक जनगणना २०२७ साली होणार असून, त्यामध्ये जातिनिहाय माहिती संकलनाचा



समावेश असणार आहे. या जनगणनेतून मिळणारी आकडेवारी आरक्षण धोरण, कल्याणकारी योजना तसेच शैक्षणिक आणि रोजगारविषयक निर्णयांसाठी महत्त्वाचा आधार ठरणार आहे. मात्र, आता या जनगणनेच्या प्रक्रियेत नवा पेच निर्माण झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने याबाबत केंद्र शासनाला महत्वपूर्ण सूचना दिली.

**नेमका मुद्दा काय?**

सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका आकाश गोयल यांनी दाखल केली असून, जनगणना २०२७ मध्ये प्रस्तावित जातीनिहाय गणनेत फक्त स्वघोषणेला मान्यता देण्यात येत असल्याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमल्या बागची यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांच्या वतीने बाजू मांडताना वकिलांनी स्पष्ट केले की, जातीनिहाय जनगणनेला कोणताही विरोध नाही, मात्र ही प्रक्रिया केवळ स्वघोषणांवर आधारित असू नये. जातविषयक माहिती ही दीर्घकाळ परिणाम करणारी असून, कोणतीही पडताळणी न करता ती गोळा करणे धोकादायक ठरू शकते, असा युक्तिवाद करण्यात आला. याचिका दाखल झाल्यानंतर केवळ स्वघोषणेला परवानगी देणारी अधिसूचना जारी करण्यात आल्याकडेही लक्ष वेधण्यात आले. विशेषतः, अनुसूचित जाती व जमातींपलीकडे जाऊन प्रथमच इतर मागासवर्गीयांचा (ओबीसी) समावेश या जनगणनेत करण्यात येत असल्याने, जात ओळख ठरवण्यासाठी कोणते निकष वापरण्यात येणार, हेही स्पष्ट करण्यात आलेले नसल्याकडे न्यायालयाचे लक्ष वेधण्यात आले. वकिलांनी पुढे सांगितले की, जातीनिहाय जनगणनेवर १३,५०० कोटी रुपयांहून अधिक खर्च अपेक्षित असून, त्याचा कल्याणकारी योजनांवर थेट परिणाम होणार आहे.

### न्यायालयाची सूचना काय?

येत्या जनगणना २०२७ मध्ये जातीनिहाय गणना केवळ स्वघोषणेद्वारे न करता तपासणीयोग्य यंत्रणेद्वारे करण्यात यावी, अशी सूचना मांडणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केंद्र सरकार व जनगणना संचालनालयाला त्या सूचनेचा विचार करण्याचे निर्देश दिले. याचिकाकर्त्याने ''महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे,'' असे नमूद करताना, मात्र या बाबतीत न्यायालयीन हस्तक्षेप टाळला. जनगणना कशी करायची, हा विषय जनगणना अधिनियम, १९५८ अंतर्गत संबंधित प्राधिकरणांच्या अखत्यारीतील असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

## समाज कार्यासाठी वाहून घ्या- ॲड. अनंत खेळकर

### मराठा महासंघाच्या सभेत प्रतिपादन

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २ :** दि. २६ जानेवारी रोजी अखिल भारतीय मराठा महासंघ जिल्हा शाखा, अकोला ची सभा प्रसिद्ध कवी, हास्यसम्राट अनंत खेळकर यांचे व देवराव पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत व मराठा महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष राम मुळे यांच्या अध्यक्षतेखाली मराठा महासंघाच्या जिल्हा कार्यालयात संपन्न झाली. सभेमध्ये मराठा महासंघाचे कार्य जिल्हाभर गतिमान करण्याच्या दृष्टीने अमरावती विभागीय अध्यक्षपदी सुरेश ठाकरे, अकोला जिल्हाध्यक्षपदी निळोबा ढोरे, युवक जिल्हाध्यक्षपदी महेश शिंदे, जिल्हा उपाध्यक्षपदी सतीश सुर्वे, बार्शीटाकळी तालुका अध्यक्षपदी भरत चांभारे व पातुर तालुका अध्यक्षपदी दिनेश पाचपोर यांची नियुक्ती अनंतरावजी खेळकर यांचे हस्ते नियुक्तीपत्र देऊन करण्यात आली. अनंत खेळकर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सर्वांनी समाज कार्यासाठी योगदान देऊन मराठा महासंघ अकोला जिल्ह्यात वाढवावा असे आवाहन केले. समाज कार्यासाठी झोकुन देऊन कार्य करण्याचे आवाहन याप्रसंगी त्यांनी केले. देवराव पाटील यांनी मराठी शाळा बंद करण्याचे षडयंत्र चालू आहे त्या शाळा बंद होऊ देऊ नका समाज अधिक शिक्षित करण्याची गरज असून गावागावात मराठा महासंघाचे कार्य पोहोचवा असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. सभेचे अध्यक्ष व महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष राम मुळे यांनी संघटनेचे महत्त्व विशद केले व मराठा महासंघ हे ट्रेनिंग सेंटर असून या संघटनेमधून अनेक कार्यकर्ते आपल्या जीवनामध्ये शैक्षणिक, राजकीय व व्यवसायात यशस्वी झाले व समाजात नावलौकिक मिळविल्याचे प्रतिपादन केले . ''संघटने शिवाय मराठ्यांना पर्याय नाही आणि संघटित मराठ्यांना शत्रू नाही.'' त्यामुळे संघटित होऊन आपली शक्ती वाढविण्याचे आवाहन याप्रसंगी केले. जिल्हाध्यक्ष सुरेश ठाकरे यांनी जिल्ह्यातील कार्याचा आढावा सादर करून दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी होणारी शिवजयंती ही घरोघरी साजरी करण्याचे आवाहन केले तसेच जिल्हा युवक अध्यक्ष सतीश सुर्वे यांनी संघटना वाढीसाठी विचार मंथन अभियानाचे नियोजन सांगून प्रत्येक गावात जाऊन लोकांच्या अडचणी समजून घ्यायच्या व त्या सोडवण्याचा प्रयत्न करावा तसेच राष्ट्रसंतांनी सांगितल्या प्रमाणे ग्रामगीतेचा अभ्यास करून कार्य केल्यास गाव शहर व समाज प्रगती केल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन त्यांनी केले.

## विदेश दौऱ्यात लगट, नोकरीच्या बदल्यात शरीरसुखाची मागणी

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. ३१ :**नामांकित विमा कंपनीच्या प्रमुखाकडून महिला कर्मचाऱ्याला बडतर्फीची भिती दाखवत शरीरसुखाची मागणी करण्यात आली. त्याने वर्षभराअगोदर विमानात तसेच विदेश दौऱ्यातदेखील लगट करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणात महिलेने दिलेल्या तक्रारीवरून अजनी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

अवीवा लाइफ इन्शुरन्स कंपनीतील प्रमुख असलेल्या चयन गुप्ता (५०) हा. गुरुग्राम असे आरोपीचे नाव आहे. संबंधित महिला कर्मचारी कार्यालयीन कामामुळे चयन गुप्ताच्या संपर्कात आली. डिसेंबर २०२४ मध्ये ती इतर सहकाऱ्यांसोबत पोर्तुगाल येथे गेली. या दौऱ्यात गुप्ता देखील विमानात तिला शेजारी बसण्यासाठी दबाव टाकत होता. ८ डिसेंबर २०२४ ला लिस्बन येथील हॉटेलमध्ये पोहोचल्यावर गुप्ता याने तिला हॉटेलच्या रूमवर बोलविले. मात्र, एकटीने जाणे योग्य न वाटल्याने तिने तेथे जाणे टाळले.

## आता सर्व सीबीएसई शाळांना शैक्षणिक वर्षाच्या सट्ट्या अनिवार्य

अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**नागपूर, दि. २:** राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यातील शिक्षणाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार चालू शैक्षणिक वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या शैक्षणिक सुट्ट्या सर्व व्यवस्थापन, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) तसेच सर्व प्रकारच्या अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, महापालिका, अल्पसंख्यांक शाळांना लागू असतात.

शासनाचे तसे निर्देश असतानाही अनेक सीबीएसई शाळा सुट्ट्या देत नसल्याचे आढळून येते. त्यामुळे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी सीबीएसई स्कूल स्टाफ वेल्फेअर असोसिएशनने (सिस्वा) नुकतेच शासनाला निवेदन दिले असून नुकत्याच झालेल्या बैठकीत सीबीएसई शाळांसाठी राज्याच्या शैक्षणिक वर्षाच्या सुट्ट्या अनिवार्य करण्यात आल्या आहेत. सीबीएसई शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या न्यायिक अधिकारासाठी लढणाऱ्या सीबीएसई स्कूल स्टाफ वेल्फेअर असोसिएशनने (सिस्वा) शिक्षणाधिकाऱ्यांतर्फे निर्देशित करण्यात येणाऱ्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या सर्वच प्रकारच्या सुट्ट्या सीबीएसई शाळा संचालक लागू करत नसल्याचे निवेदन दिले होते. हे निवेदन पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय शिक्षण मंडळ आणि केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनाही पाठवण्यात आले होते. याची दखल घेत 'सिस्वा'च्या अध्यक्षा दिपाली डबली यांची शिक्षणाधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात आली. या बैठकीनंतर सर्व शाळांना शासनाच्या निर्देशानुसार सुट्ट्या देण्याचा निर्णय घेण्यात आला.

जिल्ह्यातील सर्व सीबीएसई शाळेचे २०२६-२७ वर्षाचे त्या-त्या शाळेचे शैक्षणिक नियोजन शिक्षणाधिकाऱ्यांतर्फे ठरवले जाते. राज्याच्या प्रत्येक भागातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करून उन्हाळा, दिवाळी आणि नाताळ्याच्या सुट्ट्यांचे नियोजन केले जाते. या वर्षी येणाऱ्या दिवाळी व नाताळाच्या प्रत्येकी १० दिवस सुट्ट्या निश्चित करण्यात आल्या आहेत.

या सुट्ट्यांमध्ये एकसमानता राहावी अशी मागणी सिस्वाच्या वतीने करण्यात आली होती. या सुट्ट्यांव्यतिरिक्त वर्षभरात जिल्हाधिकारी यांच्यातर्फे आणि अन्य सणांसाठी देण्यात येणाऱ्या सुट्ट्या देण्यास सीबीएसई शाळा संचालकांकडून नकार दिला जातो. अन्य सर्व शाळांना सुट्ट्या असतानाही सीबीएसई शाळा या सुट्ट्या देण्यास अनेकदा टाळाटाळ करत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याविरोधात सिस्वाने दिलेल्या लढ्याला यश आले असून जिल्ह्यातील शिक्षणाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार चालू शैक्षणिक वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या सुट्ट्या सर्व व्यवस्थापन, सर्व मंडळ (सीबीएसई) यांना लागू राहणार असे निर्देश देण्यात आले आहेत.

**आढावा** — जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेत आरोग्य विभागाच्या विविध बैठका

# नियमित लसीकरणाचे उद्दिष्ट १०० टक्के पूर्ण करा : जिल्हाधिकारी

अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला, दि. २ :** नियमित लसीकरणाचे उद्दिष्ट मार्चअखेरपर्यंत १०० टक्के पूर्ण करावे, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.

जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत जिल्हा लसीकरण टास्क फोर्स, जिल्हास्तरीय लोकसंख्या धोरण समन्वय समिती, जन्ममृत्यू नोंदणी जिल्हास्तरीय समन्वय समिती आदी विविध बैठका आज झाल्या, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, शिक्षणाधिकारी रतनसिंह पवार, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. विनोद करंजीकर, महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर, तसेच तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

लसीकरण कार्यक्रमात बीसीजी, पोलिओ, हिपॅटायटिस बी, रोटाव्हायरस, पेन्टाव्हॅलेंट, पीसीव्ही, एमआर, डीपीटी आदी ८ लसी दिल्या जातात. लसीकरण कार्यक्रमानुसार जिल्ह्यात ३१ हजार ३६८ उद्दिष्टापैकी २३ हजार ३६८ लसीकरण डिसेंबरअखेरपर्यंत पूर्ण झाले आहे. उर्वरित लसीकरण विहित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी दिले. रोटाव्हायरस, टीटी लसीकरणाचे प्रमाण वाढवावे. शाळांतील मुलांचे लसीकरण होण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

जिल्हास्तरीय लोकसंख्या धोरण समन्वय समितीची बैठकही जिल्हाधिका-यांनी घेतली. कुटुंबनियोजन शस्त्रक्रियांचे प्रमाण तुलनेने कमी आहे. तालुका स्तरावर लॅप्रोस्कोपी शिबिरे घेण्यात येत आहेत, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिका-यांनी दिली. जनजागृती वाढविण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले. जिल्ह्यात जन्म-मृत्यू, अर्भकमृत्यू आदी नोंदी १०० टक्के व्हाव्यात. मूल जन्माला आले की ३० दिवसांत नोंदणी होणे आवश्यक आहे. विलंब झालेल्या नोंदणी विहित मार्गाने आदेश मिळवून व्हाव्यात, असेही निर्देश त्यांनी दिले.

## अजित पवार यांचा अस्थी कलश दर्शनासाठी यवतमाळात

### ३ व ४ फेब्रुवारीला सार्वजनिक दर्शन

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ , दि. २ :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांचा अस्थी कलश आज अमरावतीवरून यवतमाळमध्ये दाखल होत आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी दारव्हा रोडवरील हाऊसिंग फायनान्स कार्यालयात सार्वजनिक दर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कामारकर पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, आज सायंकाळी ७ वाजता कलशाचे आगमन होईल आणि नागरिकांना दर्शन घेता येईल.

अजित पवार यांच्या अस्थी कलशाचे आज, २ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता हाऊसिंग फायनान्स कार्यालय, दारव्हा रोड येथे आगमन होणार आहे. त्यानंतर मंगळवार, ३ फेब्रुवारी आणि बुधवार, ४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ७ या वेळेत हा कलश सर्वसामान्य नागरिक आणि कार्यकर्त्यांच्या दर्शनासाठी ठेवण्यात येईल. महाराष्ट्राच्या विकासात योगदान देणाऱ्या अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बाळासाहेब कामारकर पाटील यांनी केले आहे. या कार्यक्रमासाठी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे.

महत्त्वाचे

## सरफराज अहमदकडून चालू सामन्यात चिटिंग!

२०२६ च्या १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेतील भारत-पाकिस्तान सामना काल क्वीन्स स्पोर्ट्स क्लब, बुलावेयो येथे खेळला गेला. या सामन्यात भारताने ५८ धावांनी विजय मिळवला. या सामन्यादरम्यान पाकिस्तान अंडर १९ मार्गदर्शक सरफराज अहमद डगआउटमध्ये मोबाईल फोन वापरताना दिसून आला. त्यामुळे आता वाद निर्माण झाला आहे. ऑनलाइन फिरणाऱ्या स्क्रीनशॉट आणि क्लिप्समध्ये सरफराज खेळाडूंच्या परिसरात बसून मोबाईल फोनकडे पाहत असल्याचे दिसत आहे. हे फोटो मोठ्या प्रमाणात आता सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. या फोटोंवर वापरकर्ते प्रश्न विचारत आहेत की सरफराज अहमदकडून आयसीसीच्या नियमांचे उल्लंघन करण्यात आले आहे का?तथापि, सोशल मीडियावरील गोंधळ उडाल्यानंतर, आयसीसीकडून या प्रकरणावर प्रतिक्रिया देण्यात आली आहे.

## शून्यावर आऊट होऊनही मुंबईचा आयुष म्हात्रे मॅचविनर

**नवी दिल्ली:** आयसीसी अंडर १९ च्या वर्ल्ड कप सामन्यात भारताने दिलेल्या २५२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तान १९४ धावांवर ऑलआऊट झाला होता.त्यामुळे भारताने हा सामना ५८ धावांनी जिंकला आहे.या सामन्यात टीम इंडियाचा कर्णधार आयुश म्हात्रे शुन्यावर बाद झाला असला तरी त्याने गोलंदाजीत कमाल करून दाखवत भारताचा सामना जिंकून दिला आहे. खरं तर हा सामना भारताने ३४ ओव्हरलाच भारताने जिंकला होता, पण औपचारीकता म्हणून पूर्ण सामना खेळवला ज्यात भारताने विजय मिळवत सेमी फायनलमध्ये धडक मारली आहे. तर पाकिस्तान स्पर्धे तून बाहेर झाला आहे.

भारताने पाकिस्तानसमोर २५२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. त्यामुळे सेमी फायनलमध्ये पोहोचण्यासाठी पाकिस्तानला हे लक्ष्य ५० ओव्हर ऐवजी ३३.३ ओव्हरमध्ये गाठणे आवश्यक होते.पाकिस्तान ३४ ओव्हरपर्यंत फक्त १६७ धावा करू शकल्याने भारताने सेमी फायनल गाठली होती आणि पाकिस्तान वर्ल्डकपमधून बाहेर झाला होता.

# पाकिस्तानचा भारताविरुद्ध सामन्यावर बहिष्कार!

## टी-२० वर्ल्ड कप: तरीही टीम इंडिया १५ तारखेला श्रीलंकेमध्ये

**नवी दिल्ली: दि.२ वृत्तसंस्था**



टी-२० वर्ल्ड कप २०२६ सुरु होण्याआधी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या भूमिकेमुळे नवीन वाद निर्माण झाला आहे. पाकिस्तान सरकारने कालच घोषणा केली की, वर्ल्ड कपमध्ये त्यांची टीम भारताविरुद्ध मॅच खेळणार नाही. १५ तारखेला कोलंबोत भारत-पाकिस्तान सामना होणार होता. पाकिस्तान टीम श्रीलंकेत त्यांचे उर्वरित सामने खेळेल. पण भारताविरुद्ध खेळणार नाही. याचा अर्थ असा आहे की, टीम इंडियाला वॉकओवर मिळेल. भारताच्या खात्यात न खेळताच २ पॉइंट जमा होतील. पाकिस्तानने जाहीर केलय की, ते भारताविरुद्ध खेळणार नाहीत. पण टीम इंडिया या सामन्यासाठी श्रीलंकेला नक्की जाणार.पाकिस्तानने भले भारताविरुद्ध न खेळण्याचा निर्णय घेतला असेल. पण टुर्नामेंट दरम्यान टीम इंडिया आयसीसीचे प्रोटोकॉल फॉलो करेल. आयसीसीच्या प्रोटोकॉलनुसार टीम इंडिया या मॅचसाठी श्रीलंकेला जाईल. रिपोर्ट्सनुसार भारतीय टीम १५ फेब्रुवारीला श्रीलंकेत दाखल होईल. टीम तिथे ठरलेल्या शेड्युलनुसार प्रॅक्टिस करेल. प्रेस कॉन्फरन्सही करणार आणि मॅचच्यावेळी स्टेडियममध्ये सुद्धा जाणार. पाकिस्तानी टीम मैदानावर उतरली नाही, तर मॅच रेफरी मॅच रद्द झाल्याचा निर्णय जाहीर करतील. भारतीय टीम या संपूर्ण प्रोसेसची प्रतिक्षा करेल आणि वॉकओवर मिळाल्यानंतर मैदानातून काढता पाय घेईल.यंदाचा टी २० वर्ल्ड कप भारत आणि श्रीलंकेने संयुक्तरित्या आयोजित केला आहे. भारताचे बहुतांश सामने भारतात तर पाकिस्तानचे सामने श्रीलंकेत होतील. पाकिस्तानने राजकीय कारणांमुळे भारतात खेळायला नकार दिला आहे. आयसीसीने त्यांचे सामने न्यूट्रल वेन्यूवर शिफ्ट केले. भारत-पाकिस्तान सामना कोलंबोच्या प्रेमदासा इंटरनॅशनल स्टेडियममध्ये होणार आहे. पाकिस्तानचा बहिष्काराचा निर्णय एकतर्फी आहे. याला मॅच फॉरफिट मानलं जातं. भारताला २ पॉइंट मिळणं निश्चित आहे.पाकिस्तानच्या या निर्णयानंतर आयसीसीचं स्टेटमेंट सुद्धा समोर आलं आहे. आयसीसीने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला या निर्णयावर फेरविचार करण्यास आणि आपसात मिळून काही तोडगा काढण्याचा सल्ला दिला आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या अधिकृत सूचनेची आम्ही वाट पाहतोय. आयसीसी टुर्नामेंट स्पोर्टिंग प्रामाणिकता, कॉम्पिटिशन आणि निष्पक्षतेवर आधारित असते.

## ऑस्ट्रेलियाला झटका; दोन वेगवान गोलंदाज वर्ल्डकपमधून बाहेर



**सिडनी : दि.२ वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक २०२६ च्या रणसंग्रामापूर्वी ऑस्ट्रेलियन संघाच्या अडचणीत वाढ झाली आहे.

कर्णधार पॅट कमिन्स दुखापतीमुळे आधीच स्पर्धेबाहेर गेलेला असताना, आता अनुभवी वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड याच्या रूपाने कांगारूंना आणखी एक मोठा धक्का बसला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जोश हेझलवूड टाचेच्या दुखापतीमुळे त्रस्त असून तो सध्या सिडनीमध्येच राहून उपचार घेणार आहे. त्यामुळे विश्वचषकाच्या सुरुवातीच्या सामन्यांना तो मुकण्याची शक्यता आहे. हेझलवूडच्या जागी खबरदारीचा उपाय म्हणून सीन एबॉट याचा ट्रॅव्हलिंग रिझर्व्ह (राखीव खेळाडू) म्हणून संघात समावेश करण्यात आला आहे.यासंदर्भात ऑस्ट्रेलियन निवड समितीचे सदस्य टोनी डोडमेडे म्हणाले, ''जोशने ऑस्ट्रेलियात ओळखीच्या वातावरणात पुनर्वसन (रिहॅब) प्रक्रिया पूर्ण करणे अधिक फायद्याचे ठरेल, असे आम्हाला वाटते. तो श्रीलंकेतील सामन्यावेळी संघात कधी सामील होईल, हे सध्या निश्चित सांगता येणार नाही.''दुसरीकडे, पाकिस्तान दौऱ्यातून विश्रांती घेतलेले ग्लेन मॅक्सवेल, नॅथन एलिस आणि टिम डेव्हिड ३ फेब्रुवारीला कोलंबोमध्ये संघाशी जोडले जातील. विश्वचषकात ११ फेब्रुवारी रोजी आयर्लंडविरुद्धच्या पहिल्या सामन्यापूर्वी, ५ फेब्रुवारीला ऑस्ट्रेलिया नेदरलँड्सविरुद्ध सराव सामना खेळणार आहे.पॅट कमिन्सच्या पाठीच्या दुखापतीमुळे बेन ड्वार्शुइस याला १५ सदस्यीय मुख्य संघात स्थान मिळाले आहे. तसेच, मॅथ्यू शॉर्टला संघातून वगळण्यात आले असून त्याच्या जागी मॅट रेनशॉ याचा समावेश करण्यात आला आहे.

## युपीचा धुव्वा उडवित दिल्ली सलग चौथ्यांदा प्लेऑफमध्ये



**नवी दिल्ली: दि.२ वृत्तसंस्था**

जेमिमाह रॉड्रिग्स हीच्या नेतृत्वात दिल्ली कॅपिट्ल्सने डब्ल्यूपीएलच्या चौथ्या मोसमात प्लेऑफमध्ये धडक दिली आहे. दिल्ली कॅपिट्ल्सची जेमिमाहच्या नेतृत्वात वूमन्स प्रीमियर लीग स्पर्धेत प्लेऑफमध्ये पोहचण्याची पहिली तसेच एकूण आणि सलग चौथी वेळ ठरली. दिल्लीने बडोद्यातील कोतांबी येथील बीसीए स्टेडियममध्ये झालेल्या या सामन्यात युपी वॉरियर्सजचा धुव्वा उडवला. युपीने दिल्लीसमोर विजयासाठी १२३ धावांचं माफक आव्हान ठेवलं होतं. दिल्लीने हे आव्हान ८ बॉलआधी ५ विकेट्सच्या मोबदल्यात पूर्ण केलं. दिल्लीने १८.४ ओव्हरमध्ये ५ विकेट्स गमावून १२६ धावा केल्या. दिल्लीने यासह प्लेऑफचं तिकीट मिळवलं. तर युपीच्या पराभवामुळे गतविजेत्या मुंबई इंडियन्सचं स्पर्धेतून पॅकअप झालं. युपीने हा सामना जिंकला असता तर मुंबई प्लेऑफमध्ये पोहचली असती. मात्र दिल्लीने स्वत:च्या जोरावर प्लेऑफमध्ये धडक दिली.दिल्लीने टॉस जिंकून युपीला बॅटिंगसाठी भाग पाडलं. दिल्लीच्या गोलंदाजांसमोर युपी टीम पूर्ण २० ओव्हर खेळली. मात्र दिल्लीच्या गोलंदाजांनी युपीला मोठी धावसंख्या करण्यापासून यशस्वीरित्या रोखलं. युपीने ८ विकेट्स गमावून १२२ धावा केल्या. युपीसाठी दीप्ती शर्मा हीने सर्वाधिक २४ धावा केल्या. सिमरन शेख हीने २२ तर चार्ली क्नॉट हीने १२ धावांचं योगदान दिलं.

## बाबर आझमने किंग कोहलीचाच रेकॉर्ड मोडला

**नवी दिल्ली: दि.२ वृत्तसंस्था**

टी वर्ल्ड कप सूरू व्हायला आता अवघे काही दिवस उरले असताना पाकिस्तान खतरनाक फॉर्ममध्ये आहे. कारण पाकिस्तानने बलाढ्य ऑस्ट्रेलियाचा सलग दुसऱ्या सामन्यात पराभव केला आहे.या सामन्यात पाकिस्तानच्या बाबर आझमने मोठा रेकॉर्ड केला आहे.

बाबर आझमने ऑस्ट्रेलिया विरूद्ध ३६ बॉलमध्ये ५० धावांची अर्धशतकीय खेळी केली होती.बाबरने ही अर्धशतकीय खेळी करून विराट कोहली आणि रोहित शर्माचा रेकॉर्ड मोडला आहे.खरं तर विराट कोहलीने टी क्रिकेटमध्ये ३८ अर्धशतक ठोकली होती,बाबरच्या नावावर देखील तितकेच अर्धशतक होती. पण ऑस्ट्रेलिया विरूद्ध अर्धशतक ठोकून त्याने

## श्रीलंकेला घरच्या मैदानावर इंग्लडसमोर टेकावे लागले गुडघे

### इंग्लंडने टी-२० मालिकेतील पहिले दोन सामने जिंकले

**नवी दिल्ली: दि.२ वृत्तसंस्था**

यावेळी २०२६ चा टी विश्वचषक भारत आणि श्रीलंका येथे होणार आहे. विश्वचषक सुरू होण्यापूर्वी यजमान श्रीलंकेची अवस्था वाईट आहे. संघाने इंग्लंडविरुद्ध टी मालिका गमावली. एकदिवसीय मालिका जिंकल्यानंतर इंग्लंडने टी मालिकेतील पहिले दोन सामने जिंकले. पावसामुळे व्यत्यय आलेल्या दुसऱ्या टी सामन्यात इंग्लंड संघाने ६ विकेट्सने विजय मिळवला. यासह, इंग्लंडने मालिकेत २-० अशी अजिंक्य आघाडी घेतली आहे. प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने २० षटकांत १८९ धावा केल्या. प्रत्युत्तरात, इंग्लंडला १७ षटकांत १६८ धावांचे लक्ष्य देण्यात आले होते, जे संघाने केवळ १६.४ षटकांत पूर्ण केले. इंग्लंडकडून स्फोटक फलंदाजी करणाऱ्या टॉम बँटनने ३३ चेंडूत ५४ धावा केल्या. त्याने १६३.६४ च्या



स्ट्राईक रेटने चार चौकार आणि सहा उत्तुंग षटकार मारले. या उल्लेखनीय खेळीसाठी त्याला सामनावीराचा पुरस्कारही देण्यात आला.

याशिवाय, संघाचा कर्णधार हॅरी ब्रूकने १२ चेंडूत ३६ धावांची धमाकेदार खेळी करत संघाला पावसाने व्यत्यय आणलेल्या सामन्यात विजय मिळवून दिला.या सामन्यात श्रीलंकेची सुरुवात चांगली झाली, पण शेवटचा सामना त्यांच्याइतका यशस्वी झाला नाही. संघाने ५.३ षटकांत ५६ धावांवर पहिली विकेट गमावली. संघाकडून पवन रत्नायकेने २२ चेंडूत ४० धावा केल्या. पथुम निस्सांका आणि कामिल मिश्रा यांनीही अनुक्रमे ३४ आणि ३६ धावांचे उत्कृष्ट योगदान दिले. यष्टीरक्षक-फलंदाज कुसल मेंडिसने १७ चेंडूत ३२ धावा केल्या. डावाच्या शेवटच्या षटकांमध्ये, जेव्हा संघाला वेग वाढवायचा होता, तेव्हा विकेट पडू लागल्या आणि इंग्लिश गोलंदाजांनी जबाबदारी घेतली.

## बांगलादेशचा कापड उद्योग भारताच्या पुढे


**नवी दिल्ली:** २०२६-२६७ च्या अर्थसंकल्पात टेक्सटाईल उद्योगासाठी महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आल्या आहेत. भारताने आता बांगलादेशच्या टेक्सटाईल उद्योगाविरुद्ध आपला टेक्सटाईल बाजार स्पर्धात्मक बनवण्याची वचनबद्धता जाहीर केली असून बांगलादेशविरुद्ध भारताच्या टेक्सटाईल उद्योगाची स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी केंद्र सरकारने रेशीम उत्पादन, यंत्रसामग्री समर्थन, हातमाग आणि हस्तकला कार्यक्रम आणि टेक्सटाईल क्षेत्रातील कौशल्य विकासासाठी कार्यक्रम जाहीर केले आहेत.या अर्थसंकल्पात कामगार-केंद्रित वस्त्रोद्योग क्षेत्रासाठी एक मजबूत धोरणात्मक चौकट तयार करण्यावर भर देण्यात आला आहे ज्याचा उद्देश स्वावलंबन, रोजगार, नवोन्मेष आणि जागतिक स्पर्धात्मकतेला प्रोत्साहन देण्याचा आहे. सरकारचे उपाय समावेशक वाढ, ग्रामीण विकास आणि निर्यात प्रोत्साहन यावर लक्ष केंद्रित करतात, ज्यामुळे वस्त्रोद्योग भारताच्या आर्थिक आणि सामाजिक अजेंडाचा एक प्रमुख चालक बनतो.भारताच्या शेजारी वसलेल्या बांगलादेशच्या कापड उद्योगाने नेहमीच भारताच्या देशांतर्गत कापड उद्योगासमोर आव्हान उभे केले आहे. याशिवाय जोपर्यंत बांगलादेशात भारत समर्थित सरकार होते, तोपर्यंत भारताने शेजारी म्हणून नुकसान सहन केले, पण बांगलादेशने नमक हरामी केली आणि बांगलादेशातील लोकशाही सरकार गेल्यानंतर तेथील युनूस सरकार भारताशी संबंधांना टोकावर नेत आहे.

# चीन-अमेरिका पुन्हा आमनेसामने: डॉलर चिरडणार, ड्रॅगन करणार चेकमेट

**नवी दिल्ली: दि.२ वृत्तसंस्था**

अमेरिकी डॉलरच्या वर्चस्वावरील धोका दिवसेंदिवस वाढत आहे. ब्रिक्स समूह एकीकडे व्यापारासाठी आपलं वेगळं चलन जारी करणार असल्याचं बोललं जात असताना चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील डॉलरच्या वर्चस्वाला उघडपणे आव्हान दिले आहे. याशिवाय चीनचे चलन युआनला 'सशक्त चलन' बनवण्याचे आवाहन त्यांनी केले.

जिनपिंग म्हणाले की युआन इतके मजबूत केले पाहिजे की इतर देश 'आंतरराष्ट्रीय राखीव' म्हणून जमा करतील, जे सध्या डॉलरच्या बाबत घडत आहे. अशा



शब्दात जिनपिंग यांनी थेट डॉलरच्या वर्चस्वाला आव्हान दिल्याचे मानले जात आहे. अशाप्रकारे, चलन हा जगातील पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थांमधील संघर्ष जगासाठी खूप महत्त्वाचा असेलअमेरिकेनंतर जगातील दुसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था, चीन, डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापारात युआनचा वापर वाढवत आहे. गेल्या वर्षी, ड्रॅगनने आपल्या स्थानिक चलनात ६.२ ट्रिलियन अमेरिकी डॉलरच्या विदेशी व्यापारापैकी जवळजवळ एक तृतीयांश व्यवहार केला होता.त्याचवेळी, चीनमध्ये सत्ताधारी कम्युनिस्ट पक्षाचे मुख्य वैचारिक जर्नल किउशी येथे प्रकाशित एका लेखात शी म्हणाले की, चीनला आंतरराष्ट्रीय व्यापार, गुंतवणूक आणि परकीय चलन बाजारात मोठ्या प्रमाणात वापरता येईल आणि जागतिक राखीव स्थिती प्राप्त करू शकेल असे 'मजबूत चलन' तयार करणे आवश्यक आहे.




जागतिक गंगाजळी म्हणजे अशी चलने आहेत जी जगभरातील सरकारे, केंद्रीय बँका आणि जागतिक वित्तीय संस्था त्यांच्या परकीय चलनाच्या साठ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर ठेवतात. ही चलने आंतरराष्ट्रीय व्यापार, गुंतवणूक, कर्ज परतफेड आणि जागतिक व्यवहारासाठी वापरले जाते.दुसऱ्या महायुद्धापासून अमेरिकन डॉलर जगातील प्रमुख जागतिक राखीव चलन बनले असून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या माहितीनुसार जागतिक परकीय चलनाच्या साठ्यामध्ये डॉलरचा वाटा अजूनही ५८-६०% च्या आसपास आहे. तसेच शी यांनी स्पष्टपणे यूएस डॉलरचा उल्लेख केला नसला तरी २०१२ मध्ये सत्तेवर आल्यापासून त्यांनी सातत्याने युआन, ज्याला रॅन्मिन्बी () देखील म्हटले जाते, जागतिक चलन प्रतिस्पर्धी बनवण्याचा प्रयत्न करत आहेत.चीन, रशियासह, आंतरराष्ट्रीय बँकिंग नेटवर्कला पर्याय म्हणून क्रॉस-बॉर्डर इंटरबँक पेमेंट सिस्टम म्हणजे ला प्रोत्साहन देत आहे.

## पान मसाला भरणार सरकारची तिजोरी

**नवी दिल्ली: दि.२ वृत्तसंस्था**

आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये पान मसाला उत्पादनावर आकारण्यात आलेल्या आरोग्य आणि राष्ट्रीय सुरक्षा उपकरातून सरकारला १४,००० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे. पान मसाल्यावर १ फेब्रुवारीपासून आरोग्य आणि राष्ट्रीय सुरक्षा उपकर लागू करण्यात आला आहे, जो ४० टक्के व्यतिरिक्त आहे. पान मसाला उत्पादन युनिटच्या उत्पादन क्षमतेच्या आधारे या उपकराची गणना केली जाईल. ४० टक्के लावल्यानंतर पान मसाल्यावरील एकूण कराचा बोजा ८८ टक्के राहील. अर्थसंकल्पाच्या कागदपत्रांनुसार, सरकारला चालू आर्थिक वर्षाच्या उर्वरित दोन महिन्यांत (फेब्रुवारी आणि



मार्च) आरोग्य आणि राष्ट्रीय सुरक्षा उपकरातून २,३३० कोटी रुपये आणि २०२६-२७ मध्ये १४,००० कोटी रुपये उभारण्याची अपेक्षा आहे. राजस्थानची राजधानी जयपूर येथील सवाई मानसिंग रुग्णालयातील कान, नाक आणि घसा विभाग प्रमुख डॉ. पवन सिंघल यांनी संसदेत सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये सिगारेट आणि तंबाखूजन्य उत्पादनांवरील उत्पादन शुल्क आणि कर रचनेत वाढ केल्याबद्दल स्वागत केले आहे.सिंघल यांनी केंद्रीय अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया व्यक्त करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांचे आभार मानले आणि सांगितले की, सरकारने तंबाखूजन्य उत्पादनांवरील उत्पादन शुल्क आणि कर रचनेत वाढ केल्यामुळे या उत्पादनांचा वापर कमी होईल आणि यामुळे या उत्पादनांचा वापर करणाऱ्यांची संख्याही कमी होईल. त्यांनी सरकारच्या या निर्णयाचे कौतुक केले आणि सांगितले की यामुळे केवळ वापराचे दुष्परिणाम कमी होणार नाहीत तर यामुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण देखील कमी होईल.

## बजेटनंतर बँकिंग क्षेत्राला मोठा फटका!

### बँकेतुन सरकार विक्रमी १७.२ लाख कोटी कर्ज घेणार

**नवी दिल्ली: दि.२ वृत्तसंस्था**

२०२६ च्या अर्थसंकल्पात सरकारने विक्रमी १७.२ लाख कोटी म्हणजेच १७.२ ट्रिलियन रुपये कर्ज घेण्याची घोषणा केल्याने बँकिंग क्षेत्र गोंधळात पडले आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचे कर्ज घेण्याचे लक्ष्य, बाजाराच्या अपेक्षांपेक्षा खूपच जास्त, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांसाठी ( बँका) एक मोठे आव्हान आहे. जेव्हा सरकार बाजारातून इतक्या मोठ्या प्रमाणात रोख रक्कम काढून घेते तेव्हा त्याचा थेट परिणाम बाँड बाजारावर आणि बँकांच्या ट्रेझरी व्यवस्थापनावर होतो, ज्यामुळे त्यांच्या नफ्यात लक्षणीय घट होते.या मोठ्या कर्जाच्या ओझ्याव्यतिरिक्त, अर्थमंत्र्यांनी शेअर बाजारातील लहान गुंतवणूकदारांचे संरक्षण करण्यासाठी सट्टेबाजीलाही आळा घातला आहे. फ्युचर्स अँड ऑप्शन्स (एफ अँड ओ) वर कर वाढवून, सरकारने स्पष्ट संदेश दिला आहे की ते किरकोळ गुंतवणूकदारांना जास्त जोखमीपासून वाचवू इच्छिते. तथापि, बाजाराचे प्राथमिक लक्ष सध्या सरकारच्या कर्ज घेण्याच्या धोरणावर आहे, कारण बाँड उत्पन्नात वाढ झाल्यामुळे बँकांच्या ताळेबंदांवर थेट परिणाम होईल. सरकारने जाहीर केलेल्या या विक्रमी कर्जामुळे बँकांसाठी अनेक आघाड्यांवर आव्हाने निर्माण होण्याची शक्यता आहे. बँकांना सरकारी बाँड (जी-सेक) धारण करण्याचे बंधन आहे. जेव्हा सरकार मोठ्या कर्जासाठी निधी देण्यासाठी बाजारात नवीन बाँड आणते तेव्हा वाढत्या पुरवठ्यामुळे बाँडचे उत्पन्न (व्याजदर) वाढते. वाढत्या उत्पन्नामुळे जुन्या बाँडच्या किमतीही घसरतात. बँकांना या जुन्या बाँडचे घटते मूल्य त्यांच्या बॅलन्स शीटवर मार्क-टू-मार्केट (एमटीएम) तोटा म्हणून प्रतिबिंबित करावे लागेल, ज्यामुळे त्यांचा तिमाही नफा थेट कमी होईल.बँकांना अनेकदा बाँडच्या खरेदी-विक्रीतून ट्रेझरी नफा मिळतो, जो त्यांच्या निव्वळ नफ्याचा एक महत्त्वाचा भाग आहे. बाँड बाजारातील अस्थिरता आणि घसरत्या किमतींमुळे, आता बँकांना हे नफा निर्माण करणे अत्यंत कठीण होईल, ज्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या शेअर्सवरही दबाव येत आहे. सरकारने बाजारातून आपला बहुतेक निधी काढून घेतल्याने खाजगी क्षेत्रासाठी निधीची कमतरता निर्माण होऊ शकते. शिवाय, वाढत्या बाँडचे उत्पन्न गुंतवणूकदारांना बँकांच्या मुदत ठेवींऐवजी थेट सरकारी बाँडमध्ये गुंतवणूक करण्यास प्राधान्य देईल. बँकांना ठेवींचे संरक्षण करण्यासाठी व्याजदर वाढवावे लागतील, ज्यामुळे त्यांचा खर्च वाढेल आणि त्यांचा नफा () कमी होईल.बँकिंग संकटादरम्यान, अर्थमंत्र्यांनी डेरिव्हेटिव्ह व्यापाऱ्यांना मोठा धक्का दिला आहे. ते म्हणाले, ''आम्ही फ्युचर्स आणि ऑप्शन्सच्या विरोधात नाही, परंतु आम्ही लहान गुंतवणूकदारांना त्यांच्या व्यापारापासून परावृत्त करू इच्छितो कारण त्यांना मोठे नुकसान सहन करावे लागते.

## थोडक्यात

### सोन्याच्या बांगड्या हातोहात लांबविल्या

**नागपूर :** तब्बल ४ लाख २९ हजार रुपये किमतीच्या सोन्याच्या बांगड्या हातोहात लांबविल्याची घटना घडली नारा रोड, जरीपटका येथील फिर्यादी इंदिरा बोरकर (६८) या दातांच्या उपचारासाठी शनिवारी दुपारी दोन वाजताच्या सुमारास मॅक्सी गाडीने दवाखान्यात जात होत्या. त्यांच्यासोबत गाडीत दोन मुली आणि एक महिला अशा तिघी बसल्या होत्या. गर्दीचा फायदा घेऊन कुणी तरी त्यांच्या हँडबॅगची चेन उघडून रुमालात बांधून ठेवलेल्या ४ लाख २९ हजार रुपये किमतीच्या दोन सोन्याच्या बांगड्या लंपास केल्या. तक्रारीवरून पीएसआय ठाकरे अधिक तपास करत आहेत.

### सहा लाखांची फसवणूक

**नागपूर :** व्यवसायात गुंतवणुकीच्या बहाण्याने सुमारे सहा लाखांची फसवणूक करण्यात आली ही घटना मोमीनपुरा, तहसील ठाण्याच्या हद्दीत घडली आरोपी साकीब अन्सारी याने फिर्यादी मोहम्मद अयाज अन्सारी यांना 'जोडे-चपलांच्या व्यवसायात २ लाख गुंतवा आणि दरमहा ३५ हजार नफा मिळवा' असे आमिष दाखवले. सुरुवातीला नफा देऊन विश्वास संपादन केला आणि नंतर ३१ ऑक्टोबर २०२५ ते ३१ जानेवारी २०२६ दरम्यान एकूण सहा लाख रुपये घेऊन कोणताही परतावा न देता फसवणूक केली. ही बाब लक्षात येताच तक्रार नोंदविण्यात आली आरोपी सध्या फरार असून, पीएसआय शिरसाट या प्रकरणाचा तपास करत आहेत.

### महिला गंभीर जखमी

**नागपूर :** मानकापुरात भरधाव दुचाकीने धडक दिल्याने महिला गंभीर जखमी झाली ही घटना शनिवारी दुपारी घडली सीता वर्मा (४३) शनिवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास औषध घेण्यासाठी पायी जात असताना कल्पना टॉकीज समोर अज्ञात दुचाकीस्वाराने त्यांना मागून जोरात धडक दिली. या अपघातात सीता वर्मा गंभीर जखमी झाल्या. यानंतर त्यांना मेयो हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले दरम्यान, दुचाकीस्वार घटनास्थळावरून पळून गेला असून, पीएसआय प्रांजली आंबेडकर शोध घेत आहे

### मालेगावातील व्यक्ती बेपत्ता

**नागपूर :** मालेगावातील व्यक्ती बेपत्ता झाला असून, सक्करदरा पोलिस शोध घेत आहेत माहितीनुसार, मालेगाव (नाशिक) येथील रहिवासी असलेले साजीद खान मन्नवर खान (वय ४४) हे २६ जानेवारीपासून मोठा ताजबाग परिसरातून बेपत्ता झाले आहेत. त्यांचा शरीर रंग सावळा रंग, उंची ५ फूट ७ इंच, मजबूत बांधा असून,पांढरा शर्ट आणि निळी जीन्स घातलेली आहे तसेच, छातीवर उर्दू भाषेत गोंदलेले आहे. सदर व्यक्तीबाबत माहिती असल्यास सक्करदरा पोलिसांशी संपर्क साधावा.

# नागपूर मनपावर भाजपचे 'महिलाराज'

## नीता ठाकरे महापौर, तर 'तिजोरी'च्या चाव्या शिवानींकडे!, इतिहासात प्रथमच तिन्ही प्रमुख पदे महिलांकडे

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २ : नागपूर महानगरपालिकेच्या सत्तेच्या चाव्या आता पूर्णपणे 'नारीशक्ती'च्या हाती आल्या आहेत. भाजपने सोमवारी महापौरपदी ज्येष्ठ नगरसेविका नीता ठाकरे, उपमहापौरपदी लीला हातीबेड आणि स्थायी समिती सभापतिपदी शिवानी दाणी यांची अधिकृत घोषणा केली. शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी ही नावे जाहीर करताच गेल्या पंधरवड्यापासून सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम मिळाला असून, मनपाच्या इतिहासात प्रथमच तिन्ही सर्वोच्च पदे महिलांकडे सोपवून भाजपने नवा आदर्श निर्माण केला आहे.**





भारतीय जनता पक्षाचा बालेकिल्ला असलेल्या नागपूर महानगरपालिकेत १०२ नगरसेवकांचे संख्याबळ असलेल्या भाजपने पदाधिकाऱ्यांच्या निवडीत धक्कातंत्राचा वापर केला आहे. शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी जाहीर केलेल्या यादीनुसार, नागपूरची सत्ता आता पूर्णपणे महिलांच्या हाती केंद्रित झाली आहे. महापौरपद हे महिलेसाठी राखीव होतेच, परंतु उपमहापौर आणि अत्यंत महत्त्वाचे मानले जाणारे स्थायी समिती सभापतिपदही महिलांकडे सोपवून भाजपने महिला सक्षमीकरणाचा मोठा संदेश दिला आहे. महापौरपदासाठी पक्षात अनेक नावे चर्चेत होती. मात्र, दक्षिण नागपूर विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेल्या आणि प्रदीर्घ अनुभव असलेल्या ज्येष्ठ नगरसेविका नीता ठाकरे यांच्या गळ्यात अखेर महापौरपदाची माळ पडली आहे. विशेष म्हणजे, गेल्या २० वर्षांपासून दक्षिण नागपूरला महापौरपद मिळाले नव्हते. स्थानिक आमदार मोहन मते यांनी या पदासाठी लावलेली ताकद आणि नीता ठाकरे यांची पक्षनिष्ठा यामुळे त्यांची वर्णी लागल्याचे मानले जात आहे. दुसरीकडे, उपमहापौरपदाच्या शर्यतीत ज्येष्ठ नगरसेवक संजय बालपांडे यांचे नाव आघाडीवर होते. परंतु, ऐनवेळी त्यांनी पद स्वीकारण्यास नकार दिल्याने, भाजपने लीला हातीबेड यांना संधी दिली आहे. सत्तापक्ष नेतेपदी काही दिवसांपूर्वीच नरेंद्र बोरकर यांची निवड झाली होती. आता महापौर, उपमहापौर आणि स्थायी समिती सभापती ही तीनही प्रमुख पदे जाहीर झाल्याने भाजपची मनपातील नवीन टीम शहराच्या विकासासाठी सज्ज झाली आहे. या निवडीचे पक्षात आणि शहरात उत्स्फूर्त स्वागत होत आहे.

### 'अर्थ'कारण सांभाळणार तरुण नेतृत्व!

**महापालिकेची 'तिजोरी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्थायी समितीच्या सभापतिपदाची धुरा शिवानी दाणी यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. शिवानी या पहिल्यांदाच निवडून आलेल्या दक्षिण-पश्चिम नागपूरमधील नगरसेविका आहेत. विशेष म्हणजे, त्या पेशाने गुंतवणूक सल्लागार (Investment Consultant) आहेत. त्यांचे अर्थकारणाचे ज्ञान, प्रशासकीय समज आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी असलेली जवळीक पाहता, पक्षाने एका 'फ्रेश फेस'वर ही मोठी जबाबदारी टाकली आहे. एवढ्या कमी वयात आणि पहिल्याच टर्ममध्ये एवढे महत्त्वाचे पद मिळणे, ही दुर्मिळ बाब आहे.**

### वनवास संपला

**नागपूरच्या राजकारणात 'दक्षिण नागपूर' विधानसभा मतदारसंघाला गेल्या दोन दशकांपासून महापौरपदाने हुलकावणी दिली होती. भाजपमध्ये मोठे संख्याबळ असूनही या भागाला प्रतिनिधित्व मिळत नसल्याची खंत कार्यकर्त्यांमध्ये होती. आमदार मोहन मते यांनी ही बाब पक्षश्रेष्ठींच्या निदर्शनास आणून दिली. त्यांच्या आग्रही भूमिकेमुळे आणि राजकीय समतोल साधण्यासाठी तब्बल २० वर्षांनंतर दक्षिण नागपूरला नीता ठाकरे यांच्या रूपाने शहराचे प्रथम नागरिक पद मिळाले आहे.**

## CAPTION पुलाचे सौंदर्यवर्धन...



**नागपूर : अशोक चौक ते सक्करदरा चौक दरम्यानच्या उड्डाणपुलाच्या कामाला आलेला वेग... पुलाच्या खांबांना (पिलर्स) आकर्षक रंगाने रंगवून सुशोभित करताना आणि दुभाजकामध्ये लावलेल्या लहान रोपट्यांमुळे मार्गावर निर्माण झालेली हिरवळ. सिमेंटच्या बांधकामाला निसर्गाची जोड देत आणि शहराच्या सौंदर्यात भर घालत अंतिम टप्प्यात आलेले उड्डाणपुलाचे सुशोभीकरणाचे काम.**

### उपराजधानीकडे रेल्वेसंदर्भात दुर्लक्ष

**नागपूर, दि. २ :** केंद्रीय रेल्वे अर्थसंकल्पात राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूरकडे पुन्हा एकदा दुर्लक्ष करण्यात आल्याने शहरात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. नागपूरला स्वतंत्र रेल्वे झोनचा दर्जा मिळावा, नागपूर-हरिद्वार आणि नागपूर-रायबरेली या थेट गाड्या सुरू कराव्यात, तसेच कोरोनाकाळात बंद करण्यात आलेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या तिकीट सवलती पुन्हा लागू कराव्यात, यांसारख्या अनेक जुन्या व महत्त्वपूर्ण मागण्यांकडे अर्थमंत्र्यांनी पूर्णपणे कानाडोळा केला आहे. एकीकडे भविष्यातील हायस्पीड प्रकल्पांवर सरकारने भर दिला असला तरी, दुसरीकडे सर्वसामान्य प्रवाशांच्या रोजच्या हालअपष्टांकडे मात्र सोयीस्कर दुर्लक्ष झाले आहे. सध्या जनरल आणि स्लीपर डब्यांमध्ये होणारी प्रचंड गर्दी ही प्रवाशांची सर्वात मोठी डोकेदुखी ठरत आहे.

# अहिल्यानगरच्या देवव्रत रेखेचा संस्कृत विद्यापीठात आज सत्कार

## २०० वर्षांनंतर यजुर्वेदाचे दंडक्रम पारायण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २ :** अहिल्यानगर येथील १९ वर्षीय वेदमूर्ती देवव्रत महेश रेखे याने सुमारे २०० वर्षांत न झालेली यजुर्वेदाची अत्यंत कठीण 'दंडक्रम पारायण' साधना यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वतीने आज, ३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता विद्यापीठाच्या तोतडे सभागृहात कुलगुरू अतुल वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.



दंडक्रम पारायण हा वैदिक पठणाचा अत्यंत दुर्मीळ प्रकार असून गेल्या दोन शतकांत अशा पारायणाची नोंद आढळत नाही. त्यामुळे देवव्रतची ही उपलब्धी वैदिक परंपरेत अभूतपूर्व मानली जात आहे. वेदविद्या संकायाचे अधिष्ठाता हरेकृष्ण अगस्ती यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या कार्यक्रमात देवव्रत स्वतः दंडक्रम पारायणाचे प्रात्यक्षिक सादर करणार आहे. यामुळे उपस्थितांना या दुर्मीळ पठणाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येईल. या सोहळ्याला नागपूरचे वेदविद्वान् कृष्णशास्त्री आर्वीकर, देवव्रतचे पिता व गुरू महेश रेखे आणि माहूरगडचे वेदमूर्ती निलेश केदार उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्रासह देशाचे भूषण ठरलेल्या या युवा वेदमूर्तीच्या सत्कार सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन हरेकृष्ण अगस्ती यांनी केले आहे.

# नागपूर स्मार्ट सिटीत 'पॉश' कायद्यावर कार्यशाळा

## कर्मचाऱ्यांना अनुपालन प्रशिक्षणाचे धडे

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २ :** नागपूर स्मार्ट सिटीच्या वतीने कर्मचाऱ्यांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी आणि 'कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंध' (पॉश) कायद्याबाबत जागृती करण्यासाठी अनुपालन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. नागपूर स्मार्ट सिटी कार्यालयात पार पडलेल्या या कार्यक्रमात कंपनी सेक्रेटरी व प्रमाणित प्रशिक्षक दीप्ती खंडेलवाल-जोशी यांनी कर्मचाऱ्यांना कायद्यातील तरतुदी आणि वर्तणुकीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कामाच्या ठिकाणी महिला आणि पुरुषांना सन्मानाने काम करता यावे, यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी दीप्ती खंडेलवाल-जोशी यांनी विषय अत्यंत सोप्या भाषेत मांडला. त्यांनी प्रत्यक्ष जीवनातील उदाहरणांचा दाखला देत कामाच्या ठिकाणी होणाऱ्या छळाचे प्रकार, अशा प्रसंगी काय करावे आणि काय करू नये, याबाबत माहिती दिली. तसेच पॉश कायद्यातील कायदेशीर तरतुदी, शासनाची मार्गदर्शक तत्त्वे, गुन्ह्यासाठी असलेल्या दंडात्मक तरतुदी आणि तक्रारदाराचे हक्क यांचा सविस्तर आढावा घेतला. या कार्यशाळेला एनएसएससीडीसीएलअंतर्गत तक्रार समितीच्या अध्यक्षा भानुप्रिया ठाकूर, ई-गव्हर्नन्स सेलचे महाव्यवस्थापक शील घुले, पर्यावरण प्रमुख प्रणिता उमरेडकर, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, राहुल पांडे आणि ओमप्रकाश लांडे प्रामुख्याने उपस्थित होते.

# नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवर संघदान सोहळा; ७५ भिक्खू-भिक्खुणींना चिवरदान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २ :** येथील पवित्र दीक्षाभूमीवर दीक्षाभूमी स्मारक समिती, भिक्खू-भिक्खुणी संघ आणि उपासक-उपासिकांच्या संयुक्त विद्यमाने संघदान सोहळा संपन्न झाला. भगवान बुद्धांच्या काळापासून चालत आलेली ही परंपरा अविरत ठेवत आणि धम्म प्रसाराचा संकल्प करत, येथे ७५ भिक्खू-भिक्खुणींना चिवरदान व अष्टपरिष्कार दान करण्यात आले. बुद्ध वंदना आणि धम्मदेशनेने या कार्यक्रमाची सुरुवात झाली.

या प्रसंगी ७५ भिक्खू-भिक्खुणींसह ३०० ते ४०० उपासकांना भोजनदान देण्यात आले. विलास गजघाटे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमात भिक्खू



संघानंद, प्रज्ञाज्योती, प्रियदर्शी, धम्मदेश, सम्यय, धम्मप्रकाश, तसेच भिक्खुणी विशाखा, आम्रपाली, संघप्रिया आणि चंद्रशीला सहभागी झाले होते. या सोहळ्यात माया जामगडे, कविता रामटेके, ज्योती वासनिक, उज्वला मेश्राम, शोभा खोब्रागडे, शीला मेंढे, मंगला खोब्रागडे, सुषमा शेंडे, प्रतिभा मदामे, लता डांगे, अलका जोडापे, अनिता भोरखडे, विठ्ठल धोंगळे, सुनील भोसले, देवाजी रंगारी, मिलिंद थुल, अशोक शेंडे, विशाल शुक्ला, रंजीत सूर्यवंशी, सुरेश वानखेडे आणि प्रदीप सोनवणे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन शरद मेश्राम यांनी केले, तर आभार सुनील भोसले यांनी मानले.

# दीर्घकालीन विकासाची 'शिस्तबद्ध' पायाभरणी!

## अर्थतज्ज्ञ डॉ. समित माहोरे यांचे प्रतिपादन

**केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७**

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला २०२६-२७चा अर्थसंकल्प हा केवळ लोकप्रिय घोषणांचा नसून, भारताच्या दीर्घकालीन विकासाचा आणि 'क्षमतानिर्मिती'चा भक्कम पाया रचणारा आहे, असे प्रतिपादन अर्थतज्ज्ञ डॉ. समित माहोरे यांनी केले आहे. जागतिक अनिश्चिततेतही वित्तीय शिस्त पाळत पायाभूत सुविधा, बँकिंग सुधारणा आणि तंत्रज्ञानाला दिलेले प्राधान्य 'विकसित भारता'चे स्वप्न पूर्ण करणारे ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.**

सरकारची धोरणात्मक विश्वासार्हता अधोरेखित करताना डॉ. माहोरे म्हणतात की, २०२१ मध्ये दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करत वित्तीय तूट ४.४ टक्क्यांवर आणण्याचा प्रयत्न कौतुकास्पद आहे. विशेष म्हणजे, भांडवली खर्चात केलेली वाढ ही या अर्थसंकल्पाची जमेची बाजू आहे. सुमारे १२ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवलेला हा खर्च पायाभूत सुविधांचा विकास, उत्पादनक्षमता वाढवणे आणि रोजगारनिर्मितीसाठी 'बूस्टर डोस' ठरेल. १ एप्रिल २०२६ पासून लागू होणारी नवीन थेट कर प्रणाली सुलभता आणि पारदर्शकता आणणारी असून, ती मध्यमवर्ग आणि



तरुण व्यावसायिकांसाठी दिलासादायक आहे. 'विकसित भारत'च्या स्वप्नपूर्तीसाठी बँकिंग क्षेत्रालाही या अर्थसंकल्पात केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. उच्चस्तरीय समितीच्या प्रस्तावामुळे बँकिंग व्यवस्था अधिक सक्षम, विश्वासार्ह आणि कार्यक्षम होईल, ज्यामुळे उद्योग आणि स्टार्टअप्सना बळ मिळेल. तंत्रज्ञानावर आधारित विकासाला प्राधान्य देताना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि 'राष्ट्रीय संशोधन निधी'ला दिलेले प्रोत्साहन भारताला 'ज्ञानाधारित अर्थव्यवस्थे'कडे नेणारे आहे. तथापि, एआय आणि आधुनिक तंत्रज्ञानाकडे केवळ उत्पादकता वाढवणारे साधन म्हणून न पाहता, त्याचा लाभ सर्वसामान्य शेतकरी आणि छोट्या उद्योजकांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. त्यासाठी डिजिटल साक्षरता आणि पायाभूत सुविधांचा विकास समांतर वेगाने होणे आवश्यक असल्याचे निरीक्षणही डॉ. माहोरे यांनी नोंदवले आहे

# नागपूर विद्यापीठात आता गिरवले जाणार 'कथ्थक'चे धडे!

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत ललित कला विभागाचा अभिनव उपक्रम; तीन दिवसीय कार्यशाळेला उत्साहात प्रारंभ

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २ :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या गुरुनानक भवन येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत (NEP) विद्यार्थ्यांना आंतरविद्याशाखीय ज्ञान मिळावे, या उद्देशाने तीन दिवसीय कथ्थक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाचा आयक्यूएसी विभाग, पीएम उषा आणि ललित कला विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू झालेल्या या उपक्रमाचे उद्घाटन करताना संचालक डॉ. नंदकिशोर करंडे यांनी कलेच्या माध्यमातून मिळणारे अनुभव शिक्षण हेच भारतीय ज्ञान परंपरेचे मूळ असल्याचे प्रतिपादन केले.




केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता, विद्यार्थ्यांनी कला, इतिहास आणि संस्कृतीचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा, या उद्देशाने नागपूर विद्यापीठाने एक पाऊल पुढे टाकले आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (NEP) शिक्षणात लवचिकता आणि बहुविद्याशाखीय दृष्टिकोन रुजविण्यासाठी विद्यापीठात 'कथ्थक' नृत्यावर आधारित विशेष कार्यशाळा सुरू झाली आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ नृत्याचे धडे मिळणार नाहीत, तर भारतीय संस्कृती आणि इतिहासाचा सखोल अभ्यास करण्याची संधीही उपलब्ध झाली आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना आयक्यूएसीचे संचालक डॉ. नंदकिशोर करंडे यांनी नृत्याला केवळ मनोरंजन न मानता ते एक शास्त्र असल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, "नृत्य हे इतिहास, कला आणि संगीत यांचा त्रिवेणी संगम आहे. एनईपीमध्ये ज्या 'इंडियन नॉलेज सिस्टीम'वर भर देण्यात आला आहे, त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे ही कार्यशाळा आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या मुख्य विषयांसोबतच अशा आंतरविद्याशाखीय (Interdisciplinary) विषयांचे ज्ञान मिळाल्यास त्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल." या तीन दिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यासाठी मुंबई विद्यापीठातील प्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना गौरी जथे आणि तबला वादक ब्रिजेश पंत विशेषरीत्या उपस्थित आहेत. हे तज्ज्ञ विद्यार्थ्यांना नृत्यातील बारकावे आणि तालाची समज प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे शिकवणार आहेत. ललित कला विभागाच्या प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांनी आपल्या प्रास्ताविकात या उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली, तर विशाखा पवार यांनी सूत्रसंचालन केले. या उपक्रमामुळे विद्यापीठाच्या आवारात एक चैतन्यमय वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांचा याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

### नृत्याला मिळणार 'भौतिकशास्त्रा'ची जोड

**या कार्यशाळेत एका अत्यंत वेगळ्या आणि संशोधनात्मक विषयावर प्रकाश टाकण्यात आला. नृत्याकडे केवळ कला म्हणून न पाहता, त्यातील हालचालींचा संबंध थेट विज्ञानाशी जोडला जाऊ शकतो. 'नृत्यकलेतील विविध आयाम आणि भौतिकशास्त्राचे (Physics) नियम' यावर विद्यापीठात आगामी काळात संशोधन केले जाणार आहे. नृत्यातील तोल, गती आणि ऊर्जा यांचा विज्ञानाशी असलेला संबंध उलगडल्यास, इतर विद्याशाखेतील विद्यार्थ्यांनाही या क्षेत्राकडे आकर्षित करता येईल. यामुळे शारीरिक आणि मानसिक व्यायामासोबतच एका नवीन संशोधनाचे दालन खुले होणार आहे.**

अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ www.ajinkyabharat.com

## कुख्यात गुंड जयराज पांडे एक वर्षासाठी स्थानबद्ध

**अकोला**: अकोला शहरातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आणणाऱ्या कुख्यात गुंडावर मोठी कारवाई करत एमपीडीए कायद्याअंतर्गत जयराज सतिष पांडे (२८) रा. रघुवंशी मंगल कार्यालयासमोर, नेकलेस रोड, रतनलाल प्लॉट, अकोला) याला एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले आहे. जिल्हादंडाधिकारी वर्षा मीना यांनी २ फेब्रुवारी २०२६ रोजी हा आदेश पारित केला असून त्याची तात्काळ अंमलबजावणी करत जयराज पांडे याला अकोला जिल्हा कारागृहात दाखल करण्यात आले. जयराज पांडे याच्यावर यापूर्वी जबरी चोरी, दुखापत करण्याचा प्रयत्न, गैरनिरोधासाठी पूर्वतयारी करून घरात घुसखोरी, आगळीक, शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान, फौजदारी स्वरूपाची धमकी, बेकायदेशीररीत्या शस्त्र बाळगणे, हद्दपारी आदेशाचे उल्लंघन, रात्री घरफोडी, इतरांच्या जीवित व वैयक्तिक सुरक्षिततेस धोका पोहोचविणे, घातक हत्यारांनी जाणूनबुजून दुखापत करणे अशा अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्याच्यावर यापूर्वी विविध प्रतिबंधक कारवाया करण्यात आल्या होत्या, मात्र त्याचा कोणताही परिणाम न होता तो पुन्हा गुन्हेगारी कृत्यांमध्ये सक्रिय असल्याचे निदर्शनास आले.

## महत्त्वाचे

### स्व. तुकाराम बिडकर त्रिसूत्री पुरस्कार करिता प्रस्ताव आमंत्रित

**अकोला :** स्व. तुकाराम बिडकर यांनी ज्ञान, कला, क्रीडा ही त्रिसूत्री घेऊन महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात जनजागृती केली. त्या अनुषंगाने विविध शाळा व व्यायाम शाळा यांच्या स्थापना केल्या व ग्रामीण तरुणांना ग्रामीण युवकांना राष्ट्र निर्मितीच्या मुख्य प्रवाहात आणले. त्यांच्या या कार्याला जनमानसात पोहोचवण्यासाठी तुकाराम बिडकर ग्रामविकास प्रतिष्ठानने या वर्षीपासून त्यांच्या स्मरणार्थ ज्ञान कला व क्रीडा या तीन क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या त्रिसूत्री (तीन वेगवेगळे पुरस्कार ) देण्याचे ठरविले आहे. करीता या वेगवेगळ्या क्षेत्रात आपापली कामगिरी केलेली आहे. त्यानुसार इच्छुकांनी वरील प्रस्ताव १० फेब्रुवारी पर्यंत शत्रुघ्न बीडकर बी ५२ जनता बाजार अकोला या पत्त्यावर प्रस्ताव पाठवावे असे प्रतिष्ठांचे अध्यक्ष शत्रुघ्न बीडकर यांनी कळविलेले आहे.

### आज 'कॅट'चा पदग्रहण सोहळा

**अकोला :** राष्ट्रीय स्तरावर व्यापारी व उद्योजकांच्या सेवेत सक्रिय असणाऱ्या कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स अर्थात 'कॅट'च्या अकोला शाखेच्या पदग्रहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, ३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता, न्यू राधाकिसन प्लॉट परिसरातील अग्रसेन भवन येथे हा सोहळा पार पडणार आहे. कॅटचे विदर्भ चेअरपर्सन वसंत बाछुका यांच्या अध्यक्षतेखाली या पदग्रहण सोहळा होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून कॅटचे राष्ट्रीय अध्यक्ष बी. सी. भरतिया, आमदार रणधीर सावरकर, कॅटचे विदर्भ अध्यक्ष विनोद कलंत्री, राष्ट्रीय सचिव अशोक दालमिया, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य श्याम शर्मा, विदर्भ महामंत्री निकेश गुप्ता, कॅट महिला विभागाच्या अध्यक्षा कुंजन वेद, तसेच विदर्भ चेंबरचे सचिव निरव वोरा आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# मनपात नव्या पर्वाचा प्रारंभ

## महापौर शारदा खेडकर, उपमहापौर अमोल गोगे यांनी स्वीकारला पदभार

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २ :** तीन वर्षांहून अधिक काळ चाललेल्या प्रशासकराज नंतर अखेर अकोला महानगरपालिकेतील नव्या कारभाराची औपचारिक सुरुवात झाली असून, महापौरपदी निवड झालेल्या शारदा खेडकर आणि उपमहापौरपदी निवडून आलेले अमोल गोगे यांचा पदग्रहण सोहळा सोमवारी (ता. २) सायंकाळी पाच वाजता अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

भारतीय जनता पार्टी प्रणीत शहर सुधार आघाडीची सत्ता महापालिकेत आल्याने शहराच्या कारभारात आता नवा अध्याय सुरू झाला असून, या सोहळ्याला भाजप व मित्रपक्षांचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मोठी उपस्थिती होती. महानगरपालिकेची निवडणूक लांबणीवर पडल्यामुळे तब्बल तीन वर्षे शहरावर प्रशासक राज होते; या काळात प्रशासकीय यंत्रणा कार्यरत असली तरी लोकनियुक्त सभागृहाअभावी धोरणात्मक निर्णय आणि दीर्घकालीन विकास आराखड्यांवर मर्यादा आल्या होत्या. काही मोठ्या योजना मंजूर झाल्या असल्या तरी शहराचा सर्वांगीण विकास अपेक्षित वेगाने होऊ शकला नव्हता, त्यामुळे आता नव्या कारभाऱ्यांकडून रखडलेल्या विकास कामांना गती मिळेल, अशी रास्त अपेक्षा अकोलेकरांकडून व्यक्त केली जात आहे.

या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी विधान परिषदेचे आमदार वसंत खंडेलवाल, भाजप शहराध्यक्ष जयंत मसने, माजी महापौर विजय अग्रवाल, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संग्राम गावंडे, किशोर मांगटे पाटील, सुवासिनीताई धोत्रे, मंजुषाताई सावरकर यांच्यासह भाजप व मित्रपक्षांचे नवनिर्वाचित नगरसेवक आणि प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढील काळात शहरवासीयांना दर्जेदार सोयीसुविधा पुरविणे आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचे मोठे आव्हान आणि जबाबदारी आता या नवनियुक्त सत्ताधाऱ्यांच्या खांद्यावर असणार आहे.

### शहराच्या विकासालाच प्राधान्य असेल

महापौरपदाची सूत्रे स्वीकारताना शारदा खेडकर यांनी संविधान आणि लोकशाही मूल्यांप्रती निष्ठा राखून काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. उपमहापौर अमोल गोगे यांनीही पदभार स्वीकारत शहराच्या विकासासाठी पुढील काळात जोमाने काम करू, असा विश्वास व्यक्त केला. शहरातील मूलभूत सुविधा मजबूत करणे, पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये ठोस पावले उचलणे हे आमचे प्राधान्य असेल, असे त्यांनी सांगितले.

# ओव्याच्या दोन गंजी जळून खाक; पाच लाखांचे नुकसान

## अज्ञात इसमाने लावली आग; अकोट तालुक्यात भीतीचे वातावरण



अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोलखेड, दि. २ :** तालुक्यातील वडाळी देशमुख येथील सावरा रोडवरील शेतशिवारात अज्ञात इसमाने ओव्याच्या दोन मोठ्या गंजींना आग लावून सुमारे पाच लाख रुपयांचे नुकसान केले. रविवार, २५ जानेवारी रोजी रात्री ९ ते १० वाजेच्या सुमारास घडलेल्या या भीषण अग्निकांडामुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सावरा ते जुना अकोट रोडला लागून असलेले शेतकरी श्रीकांत तुळशीराम येवतकार (गट नं. ३६०/३६१) यांनी ५ एकरातील ओव्याची सोंगणी करून गेल्या ८-१० दिवसांपासून तीन गंजी लावून ठेवल्या होत्या. दुसऱ्या दिवशी थ्रेशरने ओवा काढण्याचे नियोजन असतानाच, अज्ञात नराधमाने दोन मोठ्या गंजींना आग लावली. ही आग इतकी भीषण होती की, संपूर्ण गावात आगीच्या ज्वाळा दिसत होत्या. ग्रामस्थांनी तातडीने धाव घेतली, मात्र तोपर्यंत दोन गंजी पूर्णपणे जळून खाक झाल्या होत्या.

घटनेची माहिती मिळताच अकोट ग्रामीण पोलिसांनी रात्री घटनास्थळी धाव घेतली. ठाणेदार किशोर जुनगरे यांच्या मार्गदर्शनाखाली भास्कर सांगळे यांच्या पथकाने पंचनामा केला आहे. मात्र, वडाळी देशमुख परिसरात अशा घटनांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाहीये. यापूर्वीही सोयाबीन, हरभरा, तूर, ज्वारी आणि गव्हाच्या पिकाला आग लावण्याचे प्रकार घडले आहेत. तसेच स्प्रिंकलर पाईप, केबल आणि झटका मशीन चोरीचे प्रमाणही वाढले आहे. अनेक तक्रारी देऊनही आजपर्यंत एकाही प्रकरणाचा तपास लागलेला नाही. पोलीस प्रशासनाला जणू चोरट्यांनी आणि आग लावणाऱ्यांनी खुले आव्हान दिले आहे. वारंवार तक्रारी करूनही शोध लागत नसल्याने शेती करायची तरी कशी? अशी संतप्त खंत येवतकार गुरुजी यांनी व्यक्त केली. आता तरी पोलीस प्रशासन या आग लावणाऱ्या नराधमांचा शोध घेणार का? याकडे संपूर्ण पंचक्रोशीतील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# बाळापूर-पातूर महामार्गावर बिबट्याचा मृत्यू

## नागरिकांमुळे प्रकार उघडकीस; वाहनाच्या धडकेचा संशय

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**बाळापूर, दि. २ :** बाळापूरपातूर महामार्गावर सोमवारी पहाटे एका बिबट्याचा मृतदेह आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. सकाळी मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेल्या नागरिकांच्या निदर्शनास हा बिबट्या रस्त्याच्या कडेला पडलेला दिसून आला. सुरुवातीला तो झोपलेला असावा, असा अंदाज नागरिकांनी वर्तवला होता; मात्र जवळ जाऊन पाहिल्यानंतर तो मृत असल्याचे स्पष्ट झाले.

या घटनेची माहिती तत्काळ वनविभागाला देण्यात आली. अकोला वनपरिक्षेत्र अधिकारी विश्वास थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली बाळापूर वनविभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. वनकर्मचाऱ्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून बिबट्याचा मृतदेह ताब्यात घेतला. त्यानंतर उत्तरीय तपासणीसाठी (शवविच्छेदन) मृतदेह अकोला येथील पशुवैद्यकीय रुग्णालयात हलविण्यात आला.

या कारवाईत वनपरिक्षेत्र अधिकारी गजानन गायकवाड, वनरक्षक नितीन सावळे, राम काकडे, सिंग राठोड, यशपाल इंगोले, तुषार आवारे यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. बिबट्याचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याचा तपास वनविभागाकडून सुरू आहे. महामार्ग ओलांडताना एखाद्या अज्ञात वाहनाच्या धडकेत हा मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वनविभागाने व्यक्त केला आहे.

# नवनाथ महाराजांच्या मूर्तींची विटंबना

## सकल हिंदू समाज, नाथ समाज आक्रमक; जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला मोर्चा

अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला, दि. २ :** शेगाव तालुक्यातील हिंगणा वैजनाथ येथे पू. नवनाथ महाराज यांच्या मूर्तींच्या विटंबनेचे संतप्त पडसाद सोमवारी अकोल्यात उमटले. घटनेचा निषेध करीत संबंधित माथेफिरूंवर कठोर कारवाईसाठी सकल हिंदू समाज व युवा नाथ संघटनेर्फे मोर्चा काढण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकलेल्या या मोर्चा महिला-पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी तगडा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

सनातन हिंदू धर्मियांचे आणि नाथसंप्रदाय, वारकरी संप्रदायाचे, आराध्यदैवत, प्रेरणास्थान असलेल्या पू. नवनाथ महाराज यांच्या मूर्तींची अज्ञात समाजकंटकांनी विटंबना केल्याचा संतापजनक प्रकार उजेडात आला होता. या घटनेचा ठिकठिकाणी निषेध करण्यात आला. धार्मिक द्वेष करणाऱ्या राष्ट्रद्रोही विचारसरणीच्या व हे अविवेकी कृत्य करणाऱ्या माथेफिरूंना त्वरित शोधून त्यांच्यावर कठोर कारवाई करून त्यांना शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी करीत २ फेब्रुवारी रोजी सकल हिंदू समाज व युवा नाथ संघटना यांच्या संयुक्त विद्यमानाने जाहीर जाहीर निषेध मोर्चा काढण्यात आला. मोर्चात गोरक्षनाथ महाराज यांची प्रतिमा वाहनावर विराजमान करण्यात आली. जिल्हाधिकारी वर्षा मिना यांना निवेदन सादर करण्यात आले. या मोर्चामध्ये सकल हिंदू समाज, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, नगरसेवक, सामाजिक संघटना, वारकरी संप्रदाय,नाथ संप्रदाय निषेध मोर्चामध्ये सहभागी झाले होते. मोर्चादरम्यान विधानसभेचे मुख्य प्रतोद आमदार रणधीर सावरकर यांनाही निवेदन देण्यात आले. भाजप आमदार वसंत खंडेलवाल हे जिल्हाधिकारी यांना निवेदन देताना स्वतः हजर होते.

## पळस फुलला...



हुताशनी होळी पौर्णिमा २ मार्च रोजी असुन रंगपंचमीला नैसर्गिक रंग बनविण्यासाठी या पळसाच्या फुलाचा वापर केला जात असतो. हा पळस केवळ फेब्रुवारी महिन्यातच असा फुलतो. (छाया. संजय ताथुरकर)

# ७४६ रस्त्यांची निवड; सीमांकन करून तातडीने आराखडा तयार करा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

## आमदार सावरकर यांच्या सूचना

**अकोला, दि. २ :** मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेबाबत सोमवारी उपविभागीय अधिकारी कार्यलयात आढावा घेण्यात आला. विधानसभेच्या अकोला पूर्व मतदार संघ व अकोट तालुक्यातील विकसित करावयाच्या शेत रस्त्यांबाबत चर्चा करण्यात आली. गाव नकाशावर दाखवलेले एकूण ६१८ व गाव नकाशावर नसलेले १२८ अशा एकूण ७४६ रस्त्यांची निवड करण्यात आली. सदर रस्त्यांचे सीमांकन तातडीने करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्याचा आदेश आमदार रणधीर सावरकर यांनी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना दिला.

मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजना ही महाराष्ट्र शासनाची ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाची योजना आहे. ज्याद्वारे शेतरस्ते आणि पाणंद रस्ते यंत्रसामग्रीच्या साहाय्याने रुंद व पक्के केले जातात. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या शेतातील शिवदांड रस्ते एका गावावरून दुसऱ्या गावाला जाणारे रस्ते, शेतात जाणारे रस्ते विकसित करण्यात येणार आहेत. १५ डिसेंबर व ७ जानेवारी रोजी जारी शासन निर्णयानुसार प्रत्येक विधानसभा क्षेत्रामध्ये विधानसभा क्षेत्र निहाय समिती गठीत करण्यात आली आहे. या गठीत केलेल्या अकोला पूर्व मतदार संघाच्या समितीची पहिली बैठक सोमवारी आमदार रणधीर सावरकर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीला अकोला उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे, अकोट उपविभागीय अधिकारी लोणारकर, पंतप्रधान ग्राम सडक योजनेचे अधीक्षक अभियंता जवंजाळ, अकोला तहसीलदार झाल्टे, अकोट चे तहसीलदार चव्हाण, उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील, सार्वजनिक बांधकाम व जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी

**प्राधान्यक्रम निश्चित करा**

शेत पांदन रस्त्याच्या विकासाचा रोड मॅप तयार करण्यात आला असून योजनेचे अंमलबजवणी करतांना प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावा अशा सूचना आमदार सावरकर यांनी केल्या. ज्या रस्त्यांवर अतिक्रमण नाही व जास्तीत -जास्त लाभार्थी शेतकरी असलेल्या व रस्त्याची रुंदी अधिक असलेल्या रस्त्यांची निवड प्रथम टप्प्यात करण्यात यावी. प्रथम टप्प्यात किमान २०० रस्ते निवडण्यात यावेत. या पैकी जिल्हा परिषदे मार्फत २५ टक्के, पंचायत समिती मार्फत २५ टक्के तर पंतप्रधान ग्राम सडक योजनेमार्फत ५० टक्के रस्त्यांचे बांधकाम करण्यात यावे. प्रथम टप्प्यात लोकसंख्येचा विचार करता साधारणपणे २ हजार लोकसंख्येपर्यंत एक रस्ता, शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी प्राधान्य देण्यात यावे, असेही बैठकित सांगण्यात आले.

### खर्च वाढण्याची शक्यता

रस्त्याचे बांधकामसाठी प्रत्यक्षात किती खर्च लागणार आहे, या करिता वास्तविक व वस्तुनिष्ठ अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन खर्चाचा अंदाज घेण्यात यावा, असे आ. सावरकर यांनी सांगितले. अंदाजपत्रक तयार करण्यासाठी पंतप्रधान ग्राम सडक योजनेच्या अधिकाऱ्यांना सूचित करण्यात आले. शासनाच्या विद्यमान निर्णयानुसार १५ लाख रुपये प्रती कि.मी. ची मर्यादा घालून देण्यात आली आहे. मात्र जिल्ह्यातील काळ्या मातीचा भाग लक्षात घेता खर्च वाढण्याची शक्यता असल्याने प्रत्यक्ष खर्चा अंदाज घेऊन, यासाठी शासनाला कळवण्यात येईल असे आमदार सावरकर यांनी बैठकीत स्पष्ट केले. रस्त्यांची निवड करतांना महसूल मंडळ निहाय किमान एक तज्ञ व अनुभवी शेतकऱ्याला निवड प्रक्रियेत सामावून घेण्याच्या सूचना आमदार सावरकर यांनी केल्या.

## कारवाई

### वीजबिल भरणार नाही, तर वीजही मिळणार नाही!

# ६ हजार थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. २ :** अकोला परिमंडळाअंतर्गत महावितरणने वीजबिल थकबाकीदारांविरुद्ध धडक मोहीम सुरू केली असून वीजबिल भरणार नाही, तर वीजही मिळणार नाही, अशी कठोर भूमिका घेत वारंवार आवाहन करूनही बिल भरण्यास प्रतिसाद न देणाऱ्या अकोला, बुलडाणा आणि वाशिम जिल्ह्यातील ६ हजार ३८७ ग्राहकांचा वीजपुरवठा जानेवारी महिन्यात खंडित करण्यात आला आहे. त्यामुळे महावितरणची कटू कारवाई टाळण्यासाठी बिल भरून सहकार्य करण्याचे आवाहन मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी केले आहे.

अकोला परिमंडळात वीजबिलांच्या प्रचंड थकबाकीमुळे महावितरणसमोर आर्थीक अडचणी निर्माण झाल्या आहेत. अकोला, बुलडाणा आणि वाशिम जिल्ह्यातील लघुदाब वर्गवारील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक व इतर वर्गवारीतील ११ लाख ६७ हजार १८२ ग्राहकांकडे जानेवारी महिन्याचे चालू बिल पकडता ३४५ कोटी रूपयाची थकबाकी होती. त्यापैकी जानेवारी महिन्यात ११२ कोटी रूपये वसूल झाले आहे, अद्याप २३३ कोटी थकीत आहे.

यात अकोला जिल्ह्यातील ४ लाख १६ हजार ३३७ ग्राहकांकडे १२६ कोटी ६३ लाख, वसूल मात्र ४६ कोटी ४५ लाख रूपये, बुलडाणा जिल्ह्यातील ५ लाख २९ हजार ६८२ ग्राहकांकडे १५९ कोटी ७२ लाख एकुण थकबाकी आणि वसूली ४६ कोटी ३१ लाख, वाशिम जिल्ह्यातील २ लाख २१ हजार १६३ ग्राहकांकडे ५८ कोटी ७९ लाख रुपयांची थकबाकी असतांना जानेवारी महिन्यात केवळ १८ कोटी ९५ लाख रूपयेच वसूल झाले आहे. वारंवार आवाहन करूनही अनेक ग्राहकांनी वीजबिल न भरल्याने महावितरणच्या थकबाकीचा आकडा दिवसेंदिवस वाढत आहे.

त्यामुळे महावितरणने कठोर भूमिका घेत आता थकबाकीदारांची वीजजोडणी खंडित करण्याची धडक मोहीम सुरू केली आहे. जानेवारी महिन्यात अकोला जिल्ह्यातील १ हजार ३२१, बुलडाणा जिल्ह्यातील ४ हजार ३५२ आणि वाशिम जिल्ह्यातील ७१४ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे.

# अकोल्याच्या प्रणिता ढोमणे यांना दादासाहेब फाळके पुरस्कार

## बेस्ट ॲक्टर अँड मॉडेल म्हणून करण्यात आला सन्मान

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. २ :** चित्रपट सृष्टीतील सर्वात मानाचा आणि प्रतिष्ठेचा पुरस्कार म्हणजे दादासाहेब फाळके पुरस्कार. हा पुरस्कार मिळविण्यासाठी अनेक कलावंत धडपडत असतात. हाच प्रतिष्ठेचा आणि मानाचा पुरस्कार अकोल्याच्या मिस प्रणिता रितेश ढोमणे यांना प्राप्त झाला आहे. त्यामुळे अकोल्याच्या कलाक्षेत्राचा नावलौकिक आणखी वाढला आहे.

मिस प्रणिता रितेश ढोमणे यांच्या अभिनयातील उत्कृष्टता, त्यासाठी त्यांची मेहनत आणि त्यांच्या कलागुणांची दखल घेत हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. त्यांच्या कारकिर्दीतील हे एक मोठे व अभिमानास्पद यश असून बेस्ट ॲक्टर अँड मॉडेल साठी हा पुरस्कार देण्यात आला असून २४ जानेवारी रोजी मुंबई येथे मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. दिल्ली येथे आयोजित आंतरराष्ट्रीय सौंदर्य व प्रतिभा स्पर्धेत मिस प्रणिता रितेश ढोमणे यांनी भारताचे प्रतिनिधित्व करीत उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे आणि उत्कृष्ट व्यक्तिमत्वामुळे त्यांना मिस आशिया अवार्ड प्रदान करण्यात आला.

## महत्त्वाचे

### सर्पदंश झालेल्या महिलेची मृत्यूशी झुंज अपयशी



**बोरगाव मंजू :** येथील शेतशिवारात कापूस वेचणी करत असताना विषारी सापाने दंश केल्यामुळे एका महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. शिलाबाई रमेश समुद्रे (वय ४९, रा. सिद्धार्थ नगर) असे मृत महिलेचे नाव असून, त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ३१ जानेवारी रोजी शिलाबाई या इतर महिला मजुरांसह शेतात कापूस वेचणीसाठी गेल्या होत्या. सायंकाळच्या सुमारास काम करत असताना त्यांना विषारी सापाने दंश केला. हा प्रकार लक्षात येताच सोबतच्या महिलांनी त्यांना तातडीने अकोला येथील शासकीय रुग्णालयात (सर्वोपचार) दाखल केले. गेल्या तीन दिवसांपासून त्या मृत्यूशी झुंज देत होत्या, मात्र २ फेब्रुवारी रोजी पहाटे उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. शिलाबाई या आपल्या मनमिळावू स्वभावामुळे सर्वपरिचित होत्या. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, चार मुली व नातवंडे असा मोठा परिवार आहे. सोमवारी स्थानिक मोक्षधामावर शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### बकऱ्या शेतात गेल्याच्या कारणावरून महिलेला मारहाण

**मूर्तिजापूर :** शेतात बकऱ्या गेल्याच्या किरकोळ कारणावरून एका महिलेला शिवीगाळ करून लाठीकाठीने बेदम मारहाण केल्याची घटना कासवी (ता. मूर्तिजापूर) येथील शेतशिवारात घडली. याप्रकरणी मूर्तिजापूर शहर पोलिसांनी एकाच कुटुंबातील तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी रेखा सुधीर धायगोळे (वय ३५, रा. कासवी) या मजुरी करून उदरनिर्वाह करतात. १ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास त्यांच्या बकऱ्या आरोपींच्या शेतात गेल्याने वादाला सुरुवात झाली. यावेळी आरोपी श्रीकृष्ण शामराव इंगोले याने शिवीगाळ करत फिर्यादीला मातीचा ढेकूळ फेकून मारला. त्यानंतर गजानन शामराव इंगोले याने रेखा धायगोळे यांना पकडून ठेवले, तर श्रीकृष्ण इंगोले याने लाठीने त्यांच्या हाता-पायांवर बेदम मारहाण केली.

### संत रविदास महाराज जयंती उत्साहात

**मूर्तिजापूर :** येथील दर्यापूर रोडवरील आशीर्वाद मंगलमय ग्रामसेवक कॉलनी येथे संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी समस्त चर्मकार समाज बांधवांच्या वतीने गुरु रविदास महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. या सोहळ्याचे खास औचित्य साधून मूर्तीजापूरचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष हर्षल साबळे आणि सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचा चर्मकार समाजाच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान उपस्थित वक्त्यांनी गुरु रविदास महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. तसेच समाजाच्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करून एकजुटीचा संकल्प करण्यात आला. या कार्यक्रमाला कोमल तायडे, सरपंच पंकज सावळे, राजकुमार नाचणे, श्याम खंडारे यांच्यासह चर्मकार समाजातील नागरिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लाखपुरी सर्कलमध्ये वन्यप्राण्यांचा हैदोस

## शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी; काढणीला आलेली कपाशी-हरभरा पिके उद्ध्वस्त

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**लाखपुरी, दि. २ :** मूर्तिजापूर तालुक्यातील लाखपुरी सर्कलसह संपूर्ण तालुक्यात सध्या वन्यप्राण्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून, शेतकरी अस्मानी संकटासोबतच आता प्रशासकीय अनास्थेच्या जाचालाही बळी पडत आहे. रानडुक्कर, रोही आणि हरणांच्या कळपांनी उभ्या पिकांची राखरांगोळी केली असताना, वनविभाग मात्र कुंभकर्णी झोपेत असल्याचा आरोप होत आहे. दुसरीकडे, शेतकऱ्यांच्या मतांवर निवडून आलेले लोकप्रतिनिधी जनतेच्या प्रश्नांऐवजी केवळ स्वतःच्या राजकीय गणितांमध्ये मग्न असल्याची घणाघाती टीका संतप्त ग्रामस्थांमधून होत आहे.



कमी पर्जन्यमानामुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने कपाशी, हरभरा आणि ज्वारीची पिके उभी केली. मात्र, रात्रीच्या वेळी शेतात घुसून रानडुक्कर पिकांची अक्षरशः नासधूस करत आहेत. दिवसभर शेतात राबल्यानंतर आता कडाक्याच्या थंडीत रात्रीही रानडुकरांपासून पिकांची राखण करण्यासाठी बळीराजाला जागरण करावे लागत आहे. रानडुकरांच्या या त्रासामुळे अनेक शेतकऱ्यांनी तर यंदा ज्वारीची पेरणीच बंद केली आहे.

शेतकऱ्यांचा वाली कोणीच नाही, अशी भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. निवडणुकीच्या तोंडावर गावागावात पाया पडणारे लोकप्रतिनिधी आता शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घ्यायला तयार नाहीत. नेते केवळ राजकीय स्वार्थात मग्न असून त्यांना जनतेचे जिवंत प्रश्न दिसत नाहीत, असा संतप्त रोष नागरिक व्यक्त करत आहेत. प्रशासनाने रानडुकरांचा तात्काळ बंदोबस्त करावा आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी मदत द्यावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

- डुक्कर, रोही आणि वानरांमुळे रात्रभर रखवाली करूनही पिके वाचत नाहीत. हाता-तोंडाशी आलेला घास हे प्राणी हिरावून घेत आहेत. शासनाने आता तरी जागे व्हावे आणि सर्व शेतकऱ्यांना कुंपणासाठी (कंपाऊंड) १०० टक्के अनुदान द्यावे.
  - **संतोष अवघाते,** शेतकरी, दुर्गवाडा
- तीन एकर हरभरा पेरल्यापासून सलग ३० दिवस शेतात रात्र काढली, तरी डुकरांनी पीक उद्ध्वस्त केले. आता सांगा करावे तरी काय? मेहनतीचा पैसा मातीत गेला. सरकारने मला तात्काळ भरपाई दिलीच पाहिजे.
  - **आकाश जामनिक,** शेतकरी, लाखपुरी
- लाखपुरी सर्कलमध्ये वन्यप्राण्यांनी उच्छाद मांडला आहे. वनविभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन वन्यप्राण्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा आणि शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत द्यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.
  - **मिनल नवघरे,** माजी पं. स. सदस्या, लाखपुरी

# साहेब, ध्वनीप्रदूषण करणाऱ्या सैराट स्टंटबाजांवर कारवाई कधी?

## बुलेटच्या आवाजाने नागरिक हैराण

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. २ :** मंगरुळपीर शहरात सध्या कानठळ्या बसवणाऱ्या बुलेट गाड्या आणि सुसाट धावणाऱ्या दुचाकींमुळे नागरिक कमालीचे त्रस्त झाले आहेत. या सैराट स्टंटबाजांमुळे सर्वसामान्य पादचाऱ्यांच्या आणि इतर वाहनचालकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून, पोलिसांनी अशा बेशिस्त चालकांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

शहरात काही शालेय विद्यार्थी आणि तरुण आपल्या दुचाकींना अस्पष्ट नंबर प्लेट किंवा रंगबिरंगी फॅन्सी नंबर प्लेट लावून फिरत आहेत. अनेकजण भरधाव वेगाने दुचाकी चालवून धोकादायक स्टंटबाजी करत आहेत. विशेषतः सायलेन्सरमध्ये बदल करून कर्कश आवाजाद्वारे ध्वनी प्रदूषण केले जात असल्याने शहरातील शांतता भंग होत आहे. या प्रकारामुळे भविष्यात गंभीर अपघात होऊन निरपराध नागरिकांचा बळी जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वाहतूक नियंत्रण शाखेने अशा बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कडक मोहीम उघडून मोटार वाहन कायद्यान्वये दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी सुज्ञ नागरिकांमधून होत आहे. दुसरीकडे, वाहतूक नियम मोडणाऱ्यांची माहिती वाहन क्रमांकासह कळविल्यास त्वरित कारवाई केली जाईल, असे पोलिसांकडून सांगण्यात येत असले तरी प्रत्यक्ष कारवाई कधी होणार, असा प्रश्न विचारला जात आहे. अपघात टाळण्यासाठी आणि शहरात शिस्त लावण्यासाठी पोलिसांनी नो-पार्किंग आणि स्टंटबाजांविरुद्ध आक्रमक पवित्रा घेणे गरजेचे झाले आहे.

# सनराईज ज्ञानपीठचा शिर्डीत 'बेस्ट स्कूल' पुरस्काराने गौरव

## ताले दांपत्याने स्वीकारला पुरस्कार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पातूर, दि. २ :** पातूर तालुक्यातील सस्ती येथील आझाद कलाम संस्थेद्वारे संचालित सनराईज ज्ञानपीठ इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ला शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिष्ठेचा 'बेस्ट स्कूल' पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. गुणवत्तापूर्ण व आधुनिक शिक्षणावर भर देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविलेल्या उपक्रमांची दखल घेऊन हा सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टीज असोसिएशन (मेस्टा) च्या ११ व्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे आयोजन ३१ जानेवारी रोजी शिर्डी येथे करण्यात आले होते. या अधिवेशनाचे उद्घाटन महसूलमंत्री



राधाकृष्ण विखे पाटील, शिक्षक आमदार किशोर दराडे, माजी आमदार सुधीर तांबे, मेस्टाचे प्रदेशाध्यक्ष संजय तायडे पाटील आणि अकोला जिल्हाध्यक्ष साहेबराव भरणे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते सनराईज ज्ञानपीठचे अध्यक्ष ॲड. श्रीकांत ताले व डायरेक्टर चैताली ताले यांनी हा मानाचा पुरस्कार स्वीकारला. ॲक्टिव्हिटी आधारित शिक्षणपद्धती, सक्षम मुख्याध्यापक आणि समर्पित शिक्षकवृंद यांच्या परिश्रमामुळेच हा गौरव मिळाल्याचे शाळेच्या वतीने सांगण्यात आले. या यशाबद्दल शाळेचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# पुनोती बु. येथे रासेयोच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन

## समाजकार्य महाविद्यालयाचा उपक्रम; विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव जपण्याचा संकल्प

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बार्शीटाकळी, दि. २ :** विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, राष्ट्रप्रेम आणि श्रमसंस्काराची मूल्ये रुजवण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) हे एक प्रभावी माध्यम आहे. याच उद्देशाने श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी (अकोला) च्या वतीने दत्तक गाव पुनोती बुद्रुक (ता. बार्शीटाकळी) येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन १ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:३० वाजता अत्यंत उत्साहात पार पडले.



कार्यक्रमाची सुरुवात स्वच्छतादूत संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी गावच्या सरपंच राधा मोहोकार होत्या, तर शिबिराचे उद्घाटन डॉ. संकेत काळे यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून गोपाल मोहोकार, प्राचार्य डॉ. बळीराम अवचार, उपसरपंच शालिग्राम वसतकार, कार्यक्रम अधिकारी डॉ. केतन वाकोडे, सहायक कार्यक्रम अधिकारी नवनाथ बंकट, महिला कार्यक्रम अधिकारी एस. एम. परळीकर आणि पोलीस पाटील गाडगे यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी मार्गदर्शनातून मान्यवरांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजनेचे "नॉट मी बट यू" (स्वतः पेक्षा समाज मोठा) हे ब्रीदवाक्य जगण्याची खरी संधी अशा श्रमसंस्कार शिबिरातून मिळते. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता ग्रामीण जीवनातील समस्या प्रत्यक्ष अनुभवून त्या सोडवण्यासाठी पुढाकार घ्यावा. या सात दिवसांच्या शिबिरातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल, असा विश्वासही मान्यवरांनी व्यक्त केला.

या उद्घाटन सोहळ्याला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी, गावातील ग्रामस्थ आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जि. प. शाळा बोर्डीचा राष्ट्रीय स्तरावर डंका; 'स्वच्छ एवं हरीत विद्यालय' मानांकनासाठी निवड

## दिल्ली येथील तज्ज्ञ पथक देणार भेट; महाराष्ट्रातील निवडक ८ शाळांमध्ये बोर्डीचा समावेश

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. २ :** शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, भारत सरकारतर्फे राबविण्यात येणाऱ्या स्वच्छ एवं हरीत विद्यालय रेटींग या राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत अकोट तालुक्यातील पीएम श्री जि. प. मराठी व प्राथमिक सेमी इंग्रजी शाळा, बोर्डी ची राष्ट्रीय मूल्यांकनासाठी निवड झाली आहे. या घवघवीत यशामुळे अकोट तालुक्यासह अकोला जिल्ह्याचा नावलौकिक देशपातळीवर पोहोचला आहे.



या उपक्रमांतर्गत ४ व ५ स्टार मानांकन प्राप्त शाळांचे तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय पथकांमार्फत बाह्य मूल्यमापन करण्यात आले होते. या कठीण प्रक्रियेत अकोट तालुक्यातील बोर्डी ही एकमेव शाळा पात्र ठरली आहे. विशेष म्हणजे, संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा परिषद प्रशासनातील केवळ ८ शाळांची या राष्ट्रीय मूल्यांकनासाठी निवड झाली असून, त्यात बोर्डी शाळेने स्थान मिळवून गौरवास्पद कामगिरी केली आहे.

राष्ट्रीय स्तरावरील अंतिम मूल्यांकनासाठी लवकरच दिल्ली येथील तज्ज्ञ पथक शाळेला भेट देऊन पाहणी करणार आहे. या पार्श्वभूमीवर, मुंबईमार्फत ऑनलाइन बैठक घेऊन शाळा प्रशासनाला मार्गदर्शन करण्यात आले. तसेच युनिसेफच्या विशेष चमूनेही शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन मूल्यांकनाबाबत महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत.

या यशाचे श्रेय शाळेचे मुख्याध्यापक उमेश चोरे, सर्व शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांना दिले जात आहे. या प्रक्रियेत शिक्षणाधिकारी (प्राथ.) रतनसिंग पवार, श्याम राऊत, अरविंद जाधव, मधुकर सूर्यवंशी (गटशिक्षणाधिकारी, अकोट), गजानन सावरकर, अनंत नहाटे व विस्तार अधिकाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. शाळेच्या या राष्ट्रीय झेपमुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

# सांस्कृतिक स्पर्धेत संत वामन महाराज विद्यालयाचे यश

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २ :** येथील तालुकास्तरीय शालेय सांस्कृतिक कार्यक्रमात संत वामन महाराज इंग्लिश विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचा ठसा उमटवत उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यालयाने सादर केलेल्या आंतरराष्ट्रीय योगा आसनांच्या संगीतमय सादरीकरणाने परीक्षक आणि प्रेक्षकांची मने जिंकली.

या सांस्कृतिक महोत्सवात संत वामन महाराज विद्यालयाच्या योगा थीम आधारित संगीतमय नृत्याला द्वितीय, तर छत्रपती शिवाजी महाराज: छावा या थीमवर आधारित सादरीकरणाला तृतीय क्रमांक मिळाला. सिद्धी मागाडे, पराग गावंडे, पुष्कर काळे, अनुष्का कडेल आणि आराध्या मनवर या विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याने विद्यालयाच्या



नावलौकिकात भर घातली.

उपविभागीय अधिकारी संजय खडसे, ठाणेदार नैना पोहेकर आणि गटशिक्षणाधिकारी अनिल पवार यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्रेस क्लबचे सदस्य, मुख्याध्यापिका सौ. सोनाली पिंगळे, योग प्रशिक्षिका अर्चना राऊत व शिक्षकवृंद उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या या यशासाठी राहुल वारे, आकाश ठाकरे व कल्पना ठाकरे यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यालयाचे अध्यक्ष अभिजित देशमुख, डॉ. सुहास देशमुख, डॉ. रुपाली देशमुख यांनी विजयी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले आहे. या यशामुळे शैक्षणिक क्षेत्रात विद्यालयाचे अभिनंदन होत आहे.

## अधिवेशन | आमदार तान्हाजी मुटकुळे यांचे आश्वासक प्रतिपादन

# राज्यस्तरीय अधिवेशनात जिल्ह्यातील पत्रविक्रेत्यांचा मोठा सहभाग





अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. २ :** महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे राज्यस्तरीय दोन दिवसीय अधिवेशन हिंगोली येथील महावीर भवन येथे उत्साहात संपन्न झाले. या अधिवेशनात अकोट आणि अकोला जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी प्रामुख्याने उपस्थित राहून वृत्तपत्र विक्रेत्यांच्या समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. अधिवेशनाचे उद्घाटन आमदार तान्हाजी मुटकुळे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते म्हणाले की, वृत्तपत्र विक्रेत्यांचे प्रश्न सरकारसमोर मांडून स्वतंत्र कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यासाठी मी प्रयत्नशील राहील. फडणवीस सरकार विक्रेत्यांना सहकार्य करून इतिहास घडवेल.यावेळी संघटनेचे राज्याध्यक्ष पाटणकर, कार्याध्यक्ष बालाजी पवार, राजेंद्र टिकार, संतोष श्रीभाते यांनी केवळ आश्वासने नको तर प्रत्यक्ष अंमलबजावणी हवी, अशी खंत व्यक्त केली. या अधिवेशनाला अकोला जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघाचे जिल्हाध्यक्ष बी. संतोषकुमार बावस्कर, उपाध्यक्ष विठ्ठलराव वानखडे, कार्याध्यक्ष हरीश येळणे, मंगेश उंबरकर, अमोल मोरे तसेच अकोट तालुका अध्यक्ष प्रकाश आम्ले, गणेश लोणकर, संजय कुलकर्णी, गजानन वडतकर, भरत बंगाले, गोपाल हिंगणकर आणि कैलास बुधळकर यांच्यासह राज्यभरातील वृत्तपत्र विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री गाडगे महाराज महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन कार्यशाळा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**हिरपूर, दि. २ :** मूर्तिजापूर येथील श्री गाडगे महाराज महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. एम. एस. यादव उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. ए. एल. गायकवाड यांनी केले. विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या विविध संधींचा अभ्यास करून स्वतःची प्रगती साधावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. वैष्णवी शर्मा उपस्थित होत्या. कला व वाणिज्य शाखेतील पदवीधर विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय व्यवस्थापन विषयातील पदविका व पदव्युत्तर शिक्षणाच्या अनेक संधी आहेत. त्यातून करिअर व रोजगाराच्या विविध वाटा खुल्या होतात. यासाठी आवश्यक प्रवेश परीक्षांची तयारी करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. एम. एस. यादव यांनी विद्यार्थ्यांनी केवळ पदवीवर अवलंबून न राहता कौशल्य विकास आणि व्यवसायपूरक शिक्षणावर भर द्यावा, असा सल्ला दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राधा गिरी यांनी केले, तर आभार प्रा. भारती बाजड यांनी मानले.या प्रसंगी प्रा. डॉ. एन. एम. बनसोड, प्रा. विजय बेलखेडे, प्रा. सुप्रिया इंगोले, प्रा. श्रीया तांबडे, प्रा. एस. एम. शामसुंदर, प्रा. राजेंद्र वाकडे, प्रा. तुषार रडके यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महत्त्वाचे

## दुचाकींचा समोरासमोर अपघात; दोघे गंभीर जखमी

**कारंजा (लाड) :** शहरातील रिद्धी-सिद्धी मंगल कार्यालयाजवळ दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. विशाल सुधाकर काठे (३५, रा. सिव्हिल लाईन, वाशिम) आणि अमित विष्णू चव्हाण (रा. दहातोंडा, जि. अकोला) अशी जखमींची नावे आहेत. अपघाताची माहिती मिळताच श्री गुरुमंदिर रुग्णवाहिकेचे चालक रमेश देशमुख आणि शिवनेरी रुग्णवाहिकेचे चालक विनोद खोंड यांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. दोन्ही जखमींना तातडीने कारंजा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. अपघातात दोघांनाही गंभीर दुखापत झाली असल्याने, डॉ. खडसे यांनी त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी मोठ्या रुग्णालयात हलविण्याचा सल्ला दिला. या बचाव कार्यात समृद्धी रुग्णवाहिकेचे संचालक श्याम घोडेस्वार, अजय घोडेस्वार, चालक शिवम खोंड आणि कक्षसेवक राहुल तंबोले यांनी सक्रिय मदत केली.

## इंझोरीत श्रीमद भागवत कथेचा भक्तिमय वातावरणात प्रारंभ



**इंझोरी:** श्रींच्या प्रकट दिन महोत्सवाचे औचित्य साधून स्थानिक परिसरात संगीतमय श्रीमदब भागवत कथा ज्ञानयज्ञाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. १ फेब्रुवारी रोजी या कथेचा शानदार प्रारंभ झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरपंच मनीषाताई दिघडे, माजी जिल्हा परिषद सदस्य अजयभाऊ जयस्वाल व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पवित्र ग्रंथाचे पूजन करण्यात आले. तत्पूर्वी, सकाळी ७ वाजता रमेश जोशी महाराज यांच्या उपस्थितीत श्रींचा अभिषेक आणि मंगल कलश स्थापना विधी संपन्न झाला. यावेळी वृंदावन येथील सुप्रसिद्ध कथाकार साध्वी चित्रा दीदी वाकोडे (मोहगव्हाण) आपल्या रसाळ वाणीतून कथा सांगताना म्हणाल्या की, भागवत कथा ही सात दिवसांचा ज्ञानयज्ञ असून, याद्वारे भगवंतांच्या विविध अवतारांचे दर्शन घडते. मनुष्य जीवनात देवरूपी संसाराचा अनुभव या कथेच्या माध्यमातून घेता येतो, असेही त्यांनी नमूद केले. या संगीतमय कथेच्या पहिल्याच दिवशी इंझोरीसह परिसरातील शेकडो महिला व पुरुष भाविकांनी श्रवणासाठी मोठी गर्दी केली होती. संपूर्ण गावात सध्या या महोत्सवामुळे चैतन्याचे आणि भक्तीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# साहेब! हा बाजारभाव शेतकऱ्यांसाठी की व्यापाऱ्यांच्या फायद्यासाठी?

## आवक संपताच बाजारपेठेत तेजीचा बनाव

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २ :** ''शेतकऱ्याच्या घरात दाणा, तेव्हा मातीमोल म्हणा ; आणि व्यापाऱ्याच्या कोठारात माल, तेव्हा सोन्याचा भाव सामाल!'' या जुन्या म्हणीचा प्रत्यय सध्या वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीत प्रकर्षाने पाहायला मिळत आहे. ऑक्टोबर २०२५ मध्ये दिवाळी सणाच्या तोंडावर आर्थिक विवंचनेत असलेल्या शेतकऱ्यांनी जो शेतमाल नाईलाजास्तव कवडीमोल भावाने विकला, त्याच मालाचे भाव आज सामान्य शेतकरी रिकाम्या हाताने बसलेला असताना गगनाला भिडले आहेत. हा बाजारभावाचा क्रूर खेळ केवळ साठेबाज व्यापाऱ्यांचे उखळ पांढरे करणारा ठरत आहे.

गेल्यावर्षी ऑक्टोबर महिन्यात जेव्हा खरीप हंगाम हातात आला होता आणि शेतकऱ्याला दिवाळी साजरी करण्यासाठी तसेच रब्बीच्या पेरणीसाठी पैशांची नितांत गरज होती, तेव्हा बाजारपेठेत जाणीवपूर्वक दर पाडण्यात आले होते. १४ ऑक्टोबर २०२५ च्या नोंदीनुसार, सोयाबीनला केवळ ३६५० ते ४२५० रुपये भाव दिला जात होता. आज २ फेब्रुवारी २०२६ रोजी, जेव्हा ८० ते ९० टक्के सामान्य शेतकऱ्यांच्या घरामध्ये सोयाबीनचा एक दाणाही शिल्लक नाही, तेव्हा हाच भाव ५६०५ ते ५९०० रुपयांपर्यंत पोहोचला आहे. सोयाबीनच्या दरात क्विंटलमागे झालेली ही साधारण १६०० ते १७०० रुपयांची वाढ शेतकऱ्याच्या घामाची नसून व्यापाऱ्यांच्या नियोजित नफेखोरीचा हिस्सा आहे.

बाजार समितीच्या आकडेवारीचा तुलनात्मक अभ्यास केल्यास यातील विसंगती आणि शेतकऱ्यांची होणारी आर्थिक कोंडी स्पष्टपणे दिसून येते. दिवाळीच्या काळात ज्या तुरीला व्यापाऱ्यांनी ५८३० ते ६६०० रुपयांचा भाव देऊन अडवणूक केली होती, तीच तूर आज ľ७२ओ ते ८६०० रुपयांपर्यंत वधारली आहे. अवघ्या चार महिन्यांत तुरीच्या भावात क्विंटलमागे दोन हजार रुपयांची वाढ होणे, हे कोणत्या अर्थशास्त्रात बसते? हा प्रश्न आता शेतकरी विचारत आहेत.

उडदाच्या बाबतीतही परिस्थिती वेगळी नाही. ऑक्टोबरमध्ये ३७८० ते ६००० रुपयांनी विकला जाणारा उडीद आज ७१०५ रुपयांच्या वर गेला आहे. विशेष म्हणजे, आगामी खरीप हंगामासाठी लागणाऱ्या बिजवाई सोयाबीनच्या दरातही मोठी लूट सुरू आहे. दिवाळीत ४३१० रुपयांचे दर आज ६४०५ रुपयांवर पोहोचले आहेत. गव्हाच्या दरातही क्विंटलमागे मोठी वाढ झाली असून, बाजारपेठेतील ही सर्व तेजी शेतकऱ्यांच्या कोठारातून माल बाहेर पडून व्यापाऱ्यांच्या गोदामात गेल्यानंतरच कशी येते, हा एक संशोधनाचा आणि संतापाचा विषय ठरत आहे. ''दिवाळीत आमच्या पिकाला कवडीची किंमत नव्हती, मुलाबाळांचे सण साजरे करताना आमची दमछाक झाली आणि आज बाजार वधारला आहे. हा बाजारभावाचा खेळ आमची थट्टा करणारा आहे,'' अशी संतप्त प्रतिक्रिया वाशिम जिल्ह्यातील शेतकरी व्यक्त करत आहेत. बाजार समित्या आणि शासनाच्या पणन विभागाने अशा संवेदनशील काळात दरांवर नियंत्रण मिळवणे आणि हमीभावापेक्षा कमी दरात खरेदी होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक होते. मात्र, सद्यस्थितीत बाजारपेठ केवळ धनदांडग्या व्यापाऱ्यांच्या हितासाठीच चालते की काय, असा संशय बळावत आहे. लोकप्रतिनिधींनी या लुटीकडे लक्ष देऊन शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

**शेतकरी हा जगाचा पोशिंदा असला तरी, बाजारपेठेच्या चक्रात तो नेहमीच भरडला जातो. जेव्हा माल पिकतो आणि बाजारात आवक वाढते, तेव्हा जादा आवक असल्याचे कारण पुढे करून भाव पाडले जातात. शेतकरी कर्जबाजारी असल्याने त्याला आपला माल साठवून ठेवता येत नाही. याचाच फायदा उचलून व्यापारी कमी दरात माल खरेदी करतात आणि साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण करतात. आजची भाववाढ ही त्याच साठेबाजीचे फळ आहे. जो नफा शेतकऱ्याच्या खिशात जायला हवा होता, तो आज मध्यस्थ आणि व्यापाऱ्यांच्या तिजोरीत जात आहे.**

## वाशिम येथे 'कुतूहल विज्ञान प्रदर्शनी'चे आयोजन; जनजागृती मोहीम

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**वाशिम, दि. २ :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व विज्ञान भारती यांच्या संयुक्त विद्यमाने वाशिम येथे ६ ते ८ फेब्रुवारी या कालावधीत 'कुतूहल विज्ञान प्रदर्शनी'चे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनीचा लाभ सुमारे ५० हजार विद्यार्थी घेणार असून, यामध्ये वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित सखोल ज्ञान देण्यात येणार आहे.

या प्रदर्शनीच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून 'कुतूहल' टीमच्या वतीने शाळा आणि महाविद्यालयांमध्ये प्रत्यक्ष भेट देऊन जनजागृती अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानाचा प्रारंभ शनिवार, ३१ जानेवारी रोजी स्थानिक लक्ष्मीबाई गोरुले नर्सिंग कॉलेज येथून करण्यात आला. यावेळी प्रदर्शनीच्या माहिती पत्रकाचे आणि बॅनरचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

याप्रसंगी डॉ. हरीश बाहेती, राजेश गोरुले, ललित भुरे, निलेश सोमानी, भारती सोमानी, डॉ. बाळासाहेब डाखोरे, डॉ. नारायण गोटे, डॉ. सतीश लांडकर, निलेश घुगे, सुदेश सानप, डॉ. सुबोध केळे आणि एड. सुरेश टेकाळे उपस्थित होते. वैद्यकीय विज्ञानाबद्दलची जिज्ञासा वाढवणाऱ्या या भव्य प्रदर्शनीचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. हरीश बाहेती यांनी यावेळी केले.

## ग्राम सडक योजनेत विधवा महिलेच्या शेतजमिनीत फेरफार

### कंत्राटदार, अभियंत्याविरुद्ध तक्रार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**रिसोड, दि. २ :** प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामात कंत्राटदार आणि अभियंत्यांनी संगनमत करून रस्त्याचा मूळ आराखडा बदलल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. कोयाळी जाधव येथील अत्यल्पभूधारक विधवा महिला शेतकरी श्रीमती दुर्गाबाई बबन जाधव यांच्या गट क्रमांक ३९८ मधील ४९ गुंठे जमिनीत जाणीवपूर्वक पूल व रस्ता वळवून नुकसान केल्याप्रकरणी केंद्र सरकार व राज्याच्या महसूल मंत्र्यांकडे दाद मागण्यात आली आहे.

कोयाळी जाधव ते डोणगाव सीमा या प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामात कंत्राटदार पी. व्ही. जाधव आणि अभियंता संतोष चव्हाण यांनी शासकीय आराखड्याला बगल दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. दुर्गाबाई जाधव यांच्याकडे उदरनिर्वाहासाठी केवळ ४९ गुंठे जमीन असून, रस्ता जाणीवपूर्वक त्यांच्या शेतातून नेल्याने जमिनीचे मोठे नुकसान झाले आहे.

रस्त्याच्या कामासोबतच शेजारील नाल्यातून कंत्राटदाराने अवैध रेती व माती उपसा केल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. या खोदकामामुळे अतिवृष्टीचे पाणी थेट शेतात शिरले आणि हाताशी आलेले पीक वाहून गेले. यामुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ आली असून, यापूर्वी स्थानिक स्तरावर केलेल्या तक्रारींची दखल न घेतल्याने पीडित महिलेने थेट केंद्र व राज्य सरकारकडे धाव घेतली आहे.

माझ्या पतीच्या निधनानंतर मी आणि माझा मुलगा निराधार झालो आहोत. कंत्राटदाराने संगनमताने माझ्या छोट्याशा जमिनीचे नुकसान केले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई व्हावी आणि मला नुकसान भरपाई मिळावी.

**- श्रीमती दुर्गाबाई जाधव,**
तक्रारदार शेतकरी

## वाशिम येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २ :** विमान दुर्घटनेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे झालेले आकस्मिक निधन ही महाराष्ट्राची कधीही न भरून निघणारी हानी आहे. या दुःखद घटनेच्या पार्श्वभूमीवर, स्थानिक अकोला नाका येथे रविवारी, १ फेब्रुवारी रोजी सर्वपक्षीय आणि सर्व संघटनांच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. विकास पुरुष आणि लोकप्रिय लोकनेता गमावल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

बाबाराव खडसे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या शोक सभेला माजी मंत्री सुभाषराव ठाकरे, भाजप आमदार श्याम खोडे, शिक्षक आमदार किरणराव सरनाईक, आमदार भावनाताई गवळी, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, उबाठा जिल्हाप्रमुख सुरेश मापारी, शिवसेना जिल्हाप्रमुख विजय खानझोडे, नगराध्यक्ष अनिल केंदळे, माजी आमदार विजयराव जाधव आणि विविध पक्षांचे जिल्हाध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माजी मंत्री सुभाषराव ठाकरे, चंद्रकांत ठाकरे, आमदार श्याम खोडे, आमदार किरणराव सरनाईक आणि इतर मान्यवरांनी आपल्या भाषणातून अजित पवार यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. वाशिम जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांनी दिलेला भरघोस निधी आणि त्यांच्या कार्यतत्परतेचा आवर्जून उल्लेख करण्यात आला. अजितदादांची जागा कोणीही घेऊ शकणार नाही, अशा शब्दांत मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

या शोक सभेत वंचित बहुजन आघाडीच्या सौ. किरणताई गिर्हे, माजी जि.प. अध्यक्ष ज्योती गणेशपुरे, काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस दिलीपराव सरनाईक, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमानी, व्यापारी मंडळाचे जिल्हाध्यक्ष जुगलकिशोर कोठारी यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, वकील संघ, व्यापारी आणि नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन माजी सरपंच दीपक खडसे, पवन राऊत आणि निलेश सोमानी यांनी केले.

## श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या जिल्हा कार्यकारिणीचे गठन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मंगरूळपीर, दि. २ :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करून ग्रामगीता प्रणीत राष्ट्रनिर्मितीसाठी पुढाकार घेणाऱ्या अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या वाशिम जिल्हा कार्यकारिणीची निवड नुकतीच करण्यात आली. मंगरूळपीर येथील सामुदायिक प्रार्थना मंदिर सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय बैठकीत ही प्रक्रिया पार पडली.

या बैठकीत जिल्हा सेवाधिकारी पदी सुनील दशमुखे तर महिला जिल्हा सेवाधिकारी पदी ज्योती उगले यांची बिनविरोध निवड करण्यात आली. जीवन प्रचारक लक्ष्मणराव आवटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला ज्ञानेश्वर पाटील कव्हळे महाराज, ज्येष्ठ प्रचारक गजाननराव इंगळे गुरुजी आणि मध्यवर्ती प्रतिनिधी रवींद्र वार्डेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या नवीन कार्यकारिणीत जिल्हा प्रचारक म्हणून दत्ता रोकडे व हर्षा अंधारे, तर उपजिल्हा सेवाधिकारी पदी निलेश सोमानी व सुनीता ठाकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. इतर जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांमध्ये माधुरी इंगळे (सचिव), यमुना राठोड (कोषाध्यक्ष), पुष्पा दहातोंडे (भजनप्रमुख) तसेच सदस्य म्हणून महादेवराव सोळंके, अंधारे गुरुजी, भुसारी, रजनी गावंडे, संध्या आलमवार आणि जयश्री भेराने यांचा समावेश आहे. तालुका स्तरावर कारंजा येथून गणेश गांजरे व आशा व्यवहारे, मंगरूळपीर येथून गोपाल क्षीरसागर व ज्योती ठाकरे, मालेगाव येथून सुभाषराव घुगे व गोदावरी इंगळे, वाशिम येथून भोयर व वाघाबाई गंडागुळे, रिसोड येथून रजनी उमाळे आणि मानोरा येथून भालदन व सोनू मातारमारे यांची सेवाधिकारी म्हणून निवड करण्यात आली आहे.

जनसागर लोटला | लोकनेत्याचा अखेरचा प्रवास

# मानोरा नगरीत अजित दादांच्या अस्थिकलशाचे आगमन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मानोरा, दि. २ :** महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावरील एक धगधगतं नेतृत्व आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील अकाली व दुर्दैवी निधनाने संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे. आपल्या लाडक्या नेत्याचे अखेरचे दर्शन घेण्यासाठी आसुसलेल्या मानोरा तालुक्यातील जनतेसाठी, २ फेब्रुवारी रोजी सायंकाळी त्यांच्या अस्थिकलशाचे शहरात आगमन झाले. मानोरा नगरीत हा अस्थिकलश येताच अवघे वातावरण जड झाले आणि उपस्थित जनसागराच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या.

ज्या नेत्याच्या शब्दाला प्रशासनात वजन होते आणि ज्यांच्या कार्यशैलीने विकासाची नवी शिखरे सर केली, त्या दादांचा अस्थिकलश मानोरा येथील ऐतिहासिक छत्रपती शिवाजी महाराज चौकात दर्शनासाठी ठेवण्यात आला होता. सायंकाळची वेळ असूनही, आपल्या जननायकाला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शहर आणि तालुक्यातील हजारो नागरिक, महिला आणि तरुणांनी याठिकाणी गर्दी केली होती. रथावर सजवलेला अस्थिकलश पाहताना अनेकांना हुंदके आवरता आले नाहीत. ''प्रशासनावरील पकड आणि सर्वसामान्यांच्या कामाची ओढ असलेला नेता हरपला,'' अशी भावना यावेळी प्रत्येकाच्या मनात दाटून आली होती.या हृदयस्पर्शी प्रसंगी राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गजांनी उपस्थित राहून पुष्पचक्र अर्पण केले.

यामध्ये पंजाबराव कृषी विद्यापीठाचे संचालक राम ठाकरे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अरविंद पाटील, चंद्रकांत पाकधणे, श्याम डोळस, डॉ. श्याम नाईक, सभापती डॉ. संजय रोठे, राजू गुल्हाने, यशवंत इंगळे, पप्पू हेडा आणि इफतेखार पटेल यांचा समावेश होता. तसेच मनोहर राऊत, कादर लंघा, भाजपा तालुका अध्यक्ष अरविंद इंगोले, गजानन भवाने, राजेश नेमाने, सचिन पाटील, चिंतामण खूळे, अतिक भाई, रवी दिघडे, रजनी गावंडे, दिलीप चव्हाण, सुनील जामदार यांच्यासह तालुक्यातील असंख्य कार्यकर्त्यांनी आपल्या लाडक्या नेत्याच्या स्मृतींना उजाळा दिला. एकीकडे लाडका नेता गेल्याचे अतीव दुःख असतानाही, अस्थिकलश दर्शनाच्या वेळी मानोरावासीयांनी अत्यंत संयम, शांतता आणि शिस्त पाळली. जणू काही आपल्या नेत्याला हीच खरी श्रद्धांजली असेल, अशा भावनेतून प्रत्येक नागरिक रांगेत उभा राहून दर्शन घेत होता. छत्रपती शिवाजी महाराज चौकातील वातावरण पूर्णतः स्तब्ध झाले होते. ''दादांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणात कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे,'' अशा शब्दांत मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

अजित पवार यांचे मानोरा तालुक्याशी असलेले ऋणानुबंध आणि त्यांनी राबविलेल्या विकासकामांची चर्चा यावेळी उपस्थित नागरिकांमध्ये सुरू होती. पहाटेपासून कामाला लागणारा आणि शिस्तीचा भोक्ता असलेला हा जनसेवक अशा प्रकारे अर्ध्यावरच साथ सोडून जाईल, अशी कल्पना कोणालाही नव्हती. त्यांच्या कार्याची महती सांगताना अनेकांच्या कंठात दाटून आलेल्या सुरांनी वातावरणात अधिकच कारुण्य भरले. या अस्थिकलश दर्शनानंतर हा रथ पुढील प्रवासासाठी रवाना झाला, मात्र मानोरावासीयांच्या मनात त्यांच्या स्मृती सदैव जिवंत राहतील.

## कारंजा शहरात दोन वाहनांना आग लावून पेटविले

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा (लाड), दि. २ :** शहरातील दारव्हा रोडवरील तुषार कॉलनी परिसरात सोमवारी मध्यरात्री दोन वाजताच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने घरासमोर उभ्या असलेल्या दोन महागड्या कार पेटवून दिल्याची खळबळजनक घटना

२ फेब्रुवारीच्या रात्री २:२० वाजता घडली. अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतल्यामुळे मोठा अनर्थ टळला. अज्ञात इसमाने तुषार कॉलनी येथील कार्तिक सुरसे यांची 'स्विफ्ट डिझायर' (क्रमांक एमएच ३७ एआर ०८९२) आणि गणेश गुडापे यांची 'मारुती एस-प्रेसो' (क्रमांक एमएच २९ सीजी १९२५) या दोन कारला आग लावली. क्षणार्धात आगीने रौद्र रूप धारण केल्याने दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

गाड्या पेटल्याचे लक्षात येताच मालकांनी कारंजा नगरपरिषद अग्निशमन दलाशी संपर्क साधला. माहिती मिळताच अग्निशमन अधिकारी विवेक वळसे, चालक मुलचंद राठोड आणि जवान सचिन ठाकूर, शुभम झोपाटे, अनुराग बारबोले, इमरान खान, सागर पांडे, सोहेल अहमद यांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. जवानांनी अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले, ज्यामुळे शेजारील घरांना आगीची झळ बसली नाही. या प्रकरणातील अज्ञात आरोपीचा शोध सुरू असून, मध्यरात्री झालेल्या या घटनेमुळे शहरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

अजिंक्य भारत

# आपलं अकोला/वाशिम

अकोला, मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी २०२६ www.ajinkyabharat.com



महत्त्वाचे

## दानापुरात संत गुरु रोहिदास महाराज जयंती उत्साहात



**तेल्हारा** : तेल्हारा तालुक्यातील दानापूर येथे संत शिरोमणी गुरु रोहिदास महाराज यांची ६४९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. श्री गुरुदेव सेवा मंडळाचे उपासक वसंतराव टाले यांच्या निवासस्थानी आयोजित या सोहळ्याची सुरुवात सामुदायिक प्रार्थनेने झाली. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. ॲड. अजित सिंह सेंगर यांनी संत रोहिदास महाराजांच्या जीवनकार्यावर चिंतन मांडले. समाजात समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश देणारे त्यांचे विचार आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. रात्री श्री गुरुदेव भजन मंडळाच्या वतीने भजन संध्येचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

या कार्यक्रमाला ॲड. अजित सिंह सेंगर, गोपालभाऊ बोरसे, समाधान येऊल, नंदू विखे, श्रीहरी अघडते, गोपाल झुणे, विक्रम नांदुरकर, पत्रकार नंदकिशोर नागपुरे, भास्कर दांदळे, गणेश दांदळे, दीपक वाघमारे, संजय सिंह चव्हाण, रवींद्र ढाकरे (अध्यक्ष, मराठा महासंघ, तेल्हारा), अशोक इंगळे, अभिषेक इंगळे गुरुजी, अंकुश दांदळे, बाळकृष्ण बावणे आणि बाळू घायल यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. राष्ट्रवंदनेने या सोहळ्याची सांगता करण्यात आली.

## निधन वार्ता

### पद्माकर डिक्कर



**रौंदळा** : रौंदळा (ता. अकोट) येथील रहिवासी डॉ. मदन डिक्कर यांचे वडील पद्माकर पुरुषोत्तम डिक्कर यांचे रविवार, १ फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई आणि नातवंडे असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. पद्माकर डिक्कर हे परिसरात एक मनमिळावू व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. त्यांच्या निधनाने डिक्कर परिवारासह रौंदळा गावावर शोककळा पसरली आहे.

### बाबुसिंग सोळंके



**मुंडगाव** : वणी येथील प्रतिष्ठित नागरिक, माजी सैनिक तथा सार्वजनिक बांधकाम विभागाचे माजी वरिष्ठ लिपिक बाबुसिंग टिकाराम सोळंके (वय ६५) यांचे दीर्घ आजाराने रविवारी (१ फेब्रुवारी) दुपारी निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, पाच भाऊ असा मोठा आप्तपरिवार आहे. ते पोलीस कॉन्स्टेबल निकेश सोळंके यांचे काका होते. देशसेवेनंतर सार्वजनिक बांधकाम विभागात त्यांनी कर्तव्यदक्ष कर्मचारी म्हणून ओळख निर्माण केली होती. त्यांच्या निधनाने सर्वच स्तरातून शोक व्यक्त होत आहे.

# पुंडा गाव 'प्रभारीं'च्या भरोशावर; प्रशासकीय यंत्रणेचा पुरता बोजवारा!

## ग्रामसेवक, तलाठी, आरोग्य सेविका प्रभारीच; पोलिस पाटील, कोतवाल पदे वर्षानुवर्षे रिक्त

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**पुंडा, दि. २** : पुंडा गाव सध्या जणू प्रभारी कर्मचाऱ्यांचे माहेरघर बनले असून, प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे ग्रामस्थांच्या दैनंदिन कामकाजात मोठे अडथळे निर्माण झाले आहेत. ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक आणि आरोग्य सेविका ही सर्वच महत्त्वाची पदे प्रभारींच्या ताब्यात असल्याने गावातील प्रशासकीय यंत्रणा अक्षरशः ठप्प झाल्याचे विदारक चित्र आहे.

गावातील नियमित ग्रामसेवकांची बदली पाच-सहा महिन्यांपूर्वी झाली. मात्र, त्यानंतर अद्याप येथे नियमित नियुक्ती करण्यात आलेली नाही. सध्याच्या प्रभारी ग्रामसेवकांकडे तब्बल तीन गावांचा प्रभार असल्याने ते केवळ ग्रामसभेपुरतेच दर्शन देतात. परिणामी, दाखले, नोंदी आणि शासकीय योजनांच्या कामांसाठी नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. गावातील कोतवाल पदाची स्थितीही वेगळी नाही. तब्बल १४ महिन्यांपासून हे पद रिक्त असल्याने महसूल विभागाचे टपाल आणि जमिनीच्या रेकॉर्डची कामे खोळंबली आहेत. त्यातच तलाठीही सध्या रजेवर असल्याने संपूर्ण गाव रामभरोसे आहे. कृषी सहाय्यकांचे मुख्यालय पुंडा असूनही त्यांच्याकडे १२ गावांचा भार असल्याने शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळेनासे झाले आहे.

आरोग्य उपकेंद्राची अवस्था तर अधिकच चिंताजनक आहे. आरोग्य सेविका प्रभारी असल्याने कर्मचारी केवळ लसीकरणाच्या दिवशीच हजर राहतात, असा ग्रामस्थांचा आरोप आहे. दुसरीकडे, गावातील कायदा-सुव्यवस्था राखणारे पोलीस पाटील पद गेल्या सहा वर्षांपासून रिक्त आहे. महत्त्वाचे दुवेच नसल्याने प्रशासनाची पकड सैल झाली आहे

❑ शासनाने आमचे गाव वाऱ्यावर सोडल्यासारखे चित्र आहे. सर्वच कर्मचारी प्रभारी असल्याने नागरिकांना कामासाठी वणवण फिरावे लागत आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन नियमित नियुक्ती करावी.

**- सुधाकर पाटील पुंडकर**, उपसरपंच, ग्रामपंचायत पुंडा

❑ पोलीस पाटील, कोतवाल पदे रिक्त आहेत आणि ग्रामसेवकही प्रभारीच! एवढ्या मोठ्या गावासाठी सगळेच कर्मचारी प्रभारी असतील, तर शासनाने आमच्या गावावर बहिष्कार टाकला आहे का?

**- नरेश पाटील पुंडकर**, सदस्य, ग्रामपंचायत पुंडा

# खेळता खेळता विहिरीत पडून चिमुकलीचा मृत्यू!



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरूळपीर, दि. २** : हातावरचे पोट भरण्यासाठी आई-वडील विटभट्टीवर घाम गाळत होते आणि तिथेच शेजारी मातीत खेळणारी तीन वर्षांची चिमुकली अचानक काळाच्या पडद्याआड गेली. खेळता खेळता जवळच असलेल्या उघड्या पडक्या विहिरीत पडल्याने सुंदरी धनसिंग सिसोदिया या चिमुकलीचा पाण्यात बुडून करुण अंत झाला. १ फेब्रुवारी रोजी घडलेल्या या हृदयद्रावक घटनेने केवळ सिसोदिया कुटुंबावरच नव्हे, तर संपूर्ण शहरावर शोककळा पसरली. मूळचे मध्य प्रदेशातील झीर पांजरीया (जि. बुरहानपूर) येथील मजूर धनसिंग सिसोदिया हे रोजगारासाठी मंगरूळपीर येथील विटभट्टीवर आले आहेत. रविवारी सकाळी नेहमीप्रमाणे कुटुंबातील मोठी माणसे कामात व्यस्त होती. सुंदरी घराबाहेर मातीत बागडत होती. मात्र, काही क्षण पालकांची नजर काय चुकली, खेळणारी सुंदरी अचानक बेपत्ता झाली. बराच वेळ ती न दिसल्याने शोधाशोध सुरू झाली आणि विटभट्टीजवळच असलेल्या एका जुन्या, कच्च्या विहिरीत ती पडल्याचे समोर आले. दुर्दैवाने, तोपर्यंत उशीर झाला होता.

विटभट्ट्या, बांधकामे किंवा शेती शिवारात उघड्या असलेल्या विहिरी चिमुकल्यांसाठी डेथ ट्रॅप ठरत आहेत. लहान मुले नैसर्गिक कुतूहलापोटी अशा धोकादायक ठिकाणी जातात आणि मोठी दुर्घटना घडते. या घटनेतही ती विहीर कच्ची आणि पडकी होती. अशा ठिकाणी पालकांनी आपल्या मुलांकडे क्षणभरही दुर्लक्ष करणे किती महाग पडू शकते, याचे हे धक्कादायक उदाहरण आहे. आई-वडिलांची नजर हटली आणि सुंदरीचे खेळण्याचे वय काळाने कायमचे हिरावून नेले.

घटनेची माहिती मिळताच ठाणेदार किशोर शेळके यांनी संत गाडगे बाबा आपत्कालीन शोध व बचाव पथकाला पाचारण केले. दीपक सदाफळे यांच्या नेतृत्वाखालील जवानांनी जीवाची पर्वा न करता त्या पडक्या विहिरीत उतरून शोध घेतला. एका तासाच्या प्रयत्नानंतर सुंदरीचा निष्प्राण देह बाहेर काढला. जेव्हा चिमुकलीचा मृतदेह विहिरीतून बाहेर आला, तेव्हा तिच्या आई-वडिलांनी फोडलेला हंबरडा उपस्थित असलेल्या सर्वांचे काळजाला घर पाडून गेला.विटभट्टी मालकांनी आणि पालकांनी अशा परिसरातील धोके ओळखून खबरदारी घेणे गरजेचे आहे. उघड्या विहिरी, खड्डे आणि विद्युत तारांपासून मुलांना लांब ठेवणे हीच या चिमुकल्या सुंदरीला खरी श्रद्धांजली ठरेल. मंगरूळपीर पोलिसांनी याप्रकरणी पंचनामा केला असून, चिमुकलीच्या मृत्यूने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

## विकासकामांची सीईओ अनिता मेश्राम यांच्याकडून पाहणी



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**तेल्हारा, दि. २** : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत तेल्हारा पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या गाडेगाव ग्रामपंचायतीस अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांनी भेट देऊन विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली.

या पाहणीदरम्यान त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अंगणवाडीतील डिजिटल रूम, परसबाग, शौचालय, शाळेची आवारभिंत तसेच रेन वॉटर हार्वेस्टिंग आदी कामांची तपासणी केली. विकासकामे केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात दर्जेदार व गुणवत्तापूर्ण व्हावीत, अशा स्पष्ट सूचना त्यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या. ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित कर्मचारी व ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांनी विविध योजनांचा आढावा घेतला. शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत, अशी ताकीद त्यांनी यावेळी दिली.

यावेळी सरपंच शिला वाकोडे, उपसरपंच गंगाताई खंडेराव, सदस्या लताबाई काळे, वर्षा गवई, बाजोडताई, प्रमोद वाकोडे, गटविकास अधिकारी अशोक बांगर, सहायक गटविकास अधिकारी शेख, विस्तार अधिकारी सुनील ठोंबरे व सोलंके, सहायक कार्यक्रम अधिकारी संदीप झाडोकार, ग्रामविकास अधिकारी वनमाला करवते, आरोग्य सेवक, जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक, अंगणवाडी सेविका तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांसह नोंदवह्या, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि आरोग्य सुविधांचा आढावा घेतला. ग्रामपंचायत स्तरावर सुरू असलेल्या विकासकामांबाबत समाधान व्यक्त करत अनिता मेश्राम यांनी पदाधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप झाडोकार यांनी केले, तर आभार अनुप वाकोडे यांनी मानले.

## १३ गोवंशांना जीवनदान, बोलेरो पिकअप जप्त

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**बोरगाव मंजू, दि. २** : नागपूरहून अकोल्याकडे गोवंश जनावरांची कत्तलीसाठी निर्दयतेने वाहतूक केली जात असताना बोरगाव मंजू पोलिसांनी मोठी कारवाई केली. या कारवाईत बोलेरो पिकअपमधून दाटीवाटीने कोंबून नेण्यात येत असलेली १३ गोवंश जनावरे सुखरूप वाचविण्यात आली असून, बोलेरो पिकअपसह (क्रमांक एम पी -१५ जी ५३७४) लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मात्र, वाहनचालक अंधाराचा फायदा घेत पसार झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरकडून अकोल्याकडे एका पांढऱ्या रंगाच्या बोलेरो पिकअपमध्ये गोवंश जनावरे कत्तलीसाठी नेण्यात येत असल्याची गुप्त माहिती गोरक्षकांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे त्यांनी तातडीने पोलिसांना कल्पना दिली. पोलीस आणि गोरक्षकांनी राष्ट्रीय महामार्गावर सापळा रचून संबंधित वाहन अडविण्याचा प्रयत्न केला. पोलिसांना पाहताच चालकाने वाहन रस्त्याच्या कडेला सोडून पळ काढला. वाहनाची तपासणी केली असता, त्यामध्ये अत्यंत निर्दयतेने आणि क्रूरपणे १३ गोवंश जनावरे कोंबलेली आढळली. या जनावरांची प्रकृती दयनीय असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी जप्त केलेले वाहन आणि जनावरे पोलीस ठाण्यात आणून पंचनामा केला. फिर्यादीच्या तक्रारीवरून आरोपी चालकाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या तस्करीमागे मोठे रॅकेट सक्रिय असण्याची शक्यता वर्तवण्यात येत असून, पोलीस फरार चालकाचा शोध घेत आहेत. ही कारवाई ठाणेदार अनिल गोपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर लांडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली.

## जि.प. शाळेत 'ग्रीन स्पार्टन'तर्फे वृक्षारोपण



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पिंपळखुटा, दि. २** : पातूर तालुक्यातील पिंपळखुटा येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रीय शाळा व तुलंगा बु. परिसरात ग्रीन स्पार्टन फाऊंडेशनच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात आला. १ फेब्रुवारी रोजी आयोजित या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा जागर करण्यात आला.

वाढते तापमान आणि हवामान बदलाचे संकट लक्षात घेता, उष्णतेविरुद्धचा लढा गावापासूनच सुरू व्हावा, या उद्देशाने 'एक झाड, एक जबाबदारी आणि एक भविष्य' हा उपक्रम राबविला गेला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पर्यावरण रक्षणाची जबाबदारी केवळ प्रशासनाची नसून ती प्रत्येक नागरिकाची असल्याचे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाला ॲड. अमित तेलगोटे, अभिजीत इंगळे, अभिजीत तेलगोटे, प्रशांत वानखडे, इंजि. सतीश हातोले, हरीभाऊ वाहोकार, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रवीभाऊ महानकार, राजेश तराळे, धीरज वानखडे, भाग्यश्री वाहोकार, नंदाबाई पवार आणि भिकेश इंगोले यांच्यासह ग्रामस्थ व तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. ''झाडे लावा, झाडे जगवा'' अशा घोषणांनी या उपक्रमाचा यशस्वी समारोप झाला.

## प्रताप नागरे यांना लोक स्वातंत्र्य प्रभावी पत्रकारिता पुरस्कार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २** : पत्रकारिता हे केवळ माहिती देण्याचे साधन नसून समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे. सत्य आणि निर्भीडतेच्या जोरावर लोकहिताचा आवाज बुलंद करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान होणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन लोक स्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष संजय एम. देशमुख यांनी केले.

अकोला येथे आयोजित एका विशेष सोहळ्यात पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रताप नागरे यांना लोक स्वातंत्र्य प्रभावी पत्रकारिता गौरव या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संजय एम. देशमुख यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व गौरवपत्र देऊन त्यांना गौरविण्यात आले.

निर्भीड पत्रकारितेची दखल

प्रताप नागरे यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न, प्रशासकीय त्रुटी आणि सर्वसामान्यांच्या समस्यांना न्याय मिळवून दिला आहे. त्यांच्या याच सातत्यपूर्ण आणि जनहितकारी पत्रकारितेची दखल महासंघाच्या वतीने घेण्यात आली.

या सोहळ्याला विविध क्षेत्रांतील मान्यवर, ज्येष्ठ पत्रकार, पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पुरस्कारामुळे जबाबदारी वाढली असून, समाजहितासाठी अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा मिळाल्याची भावना नागरे यांनी यावेळी व्यक्त केली.

इच्छाशक्तीपुढे अंतरही फिके! खोटरे यांची ७० दिवसांत पायी नर्मदा परिक्रमा पूर्ण

# ३,८०० किमीची खडतर वाट अढळ श्रद्धेने पार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**तेल्हारा, दि. २** : मनात दृढ निश्चय आणि ईश्वराप्रती अढळ श्रद्धा असेल, तर कोणतीही खडतर वाट सहज पादाक्रांत करता येते, याचाच प्रत्यय तेल्हारा तालुक्यातील खापरखेड येथील रहिवासी सदाशिव पूर्णाजी खोटरे यांनी दिला आहे. खोटरे यांनी तब्बल ७० दिवसांत सुमारे ३,८०० किलोमीटर अंतराची पायी नर्मदा परिक्रमा यशस्वीरीत्या पूर्ण केली असून, त्यांच्या या साहसी आणि आध्यात्मिक प्रवासाचे संपूर्ण तालुक्यात कौतुक होत आहे.

५ नोव्हेंबर रोजी ओंकारेश्वर येथून नर्मदे हरचा जयघोष करत त्यांनी या प्रवासाला सुरुवात केली होती. नर्मदा नदीच्या उगमापासून समुद्रापर्यंत आणि पुन्हा ओंकारेश्वरपर्यंतची ही प्रदक्षिणा पूर्ण करून ते २५ जानेवारी रोजी सुखरूप परतले. नर्मदा मैय्याच्या चरणी नतमस्तक होऊन परिक्रमा पूर्ण झाल्याचे समाधान व्यक्त करताना त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. हा क्षण आपल्या आयुष्यातील सर्वात अविस्मरणीय असल्याचे त्यांनी सांगितले.

या ७० दिवसांच्या प्रवासात त्यांना अनेक नैसर्गिक आव्हानांचा सामना करावा लागला. कधी कडाक्याची थंडी, तर कधी डोंगरदऱ्या आणि जंगलातील दुर्गम मार्ग; मात्र शारीरिक थकव्यावर मानसिक बळाने मात करत त्यांनी दररोज सरासरी ३० ते ४० किलोमीटर अंतर पायी कापले. मध्य प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्रातील विविध तीर्थक्षेत्रांमधून जाताना परिक्रमावासींबद्दल भाविकांनी दाखवलेली आपुलकी आणि अखंड सेवाभाव थक्क करणारा होता, असे अनुभव खोटरे यांनी व्यक्त केले.

**''नर्मदा मैय्याचा आशीर्वाद आणि कुटुंबीयांचे पाठबळ यामुळेच ही प्रदक्षिणा पूर्ण करणे शक्य झाले,'' असे मत खोटरे यांनी व्यक्त केले. त्यांच्या या यशाने खापरखेड गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, गावकऱ्यांनी त्यांचे जंगी स्वागत केले आहे. खोटरे यांनी पूर्ण केलेली ही परिक्रमा आजच्या तरुणांसाठी केवळ धार्मिक आदर्शच नव्हे, तर जिद्द आणि चिकाटीचे उत्तम उदाहरण ठरली आहे.**

## संत रामराव महाराज यांना पद्म पुरस्कार देण्याची मागणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २** : बंजारा समाजाचे श्रद्धास्थान आणि आध्यात्मिक व सामाजिक दिशादर्शक तपस्वी संत डॉ. रामराव महाराज (बापू) यांना मरणोत्तर पद्म पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे, अशी मागणी पीठाधीपती तथा आमदार बाबूसिंग महाराज यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

संत रामराव महाराज यांनी १९३५ ते २०२० या काळात सात दशकांहून अधिक काळ समाजप्रबोधनाचे महान कार्य केले. २४ वर्षांची घोर तपश्चर्या, आयुष्यभर केवळ दुधावर निर्वाह आणि अविवाहित राहून त्यांनी अंगीकारलेली तपस्वी जीवनशैली लाखो भाविकांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली पोहरादेवी तीर्थक्षेत्राचा बंजारा काशी म्हणून उदय झाला.महाराजांनी देशभर जगद्गुरू संत सेवालाल महाराज व माँ जगदंबा देवी यांची १० हजारांहून अधिक मंदिरे स्थापन केली. व्यसनमुक्ती, शाकाहार, नैतिक शिस्त, महिला सक्षमीकरण आणि युवकांना सन्मार्गावर आणण्यासाठी त्यांनी आयुष्यभर चळवळ राबवली. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन २०११ मध्ये गुलबर्गा विद्यापीठाने त्यांना मानद डॉक्टरेट (डी.लिट.) प्रदान केली होती.देशभरातील कोट्यवधी भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र असलेल्या या महान संताच्या अतुलनीय आध्यात्मिक आणि सामाजिक वारशाचा पद्म पुरस्काराच्या माध्यमातून गौरव व्हावा, अशी आग्रही विनंती अमित शहा यांना दिलेल्या शिफारस पत्रातून करण्यात आली आहे. या मागणीमुळे संपूर्ण बंजारा समाजात आनंदाचे वातावरण आहे.

अजिंक्य भारत

# आपलं बुलडाणा

बुलडाणा, मंगळवार, दि.३ फेब्रुवारी २०२६



## महत्त्वाचे

### संत रविदास महाराज जयंती उत्सहात साजरी

**खामगाव :** स्थानिक चांदमारी भागातील श्री संत रविदास महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने काल १ फेब्रुवारी २६ रोजी संत शिरोमणी रविदास महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमीत्ताने शहरातुन भव्य शोभायात्रा काढण्यात आली होती. सजविलेल्या रथात संत रविदास महाराजांची प्रतिमा शोभायात्रेचे मुख्य आकर्षण होते. शोभायात्रेत भाविकांनी पारंपारिक पाऊली खेळुन व संत रविदास महाराज की जय.. अशी घोषणा करून उत्सवाचा आनंद द्विगुणीत केला. शोभायात्रेचे शहरात ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले तसेच रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. शोभायात्रेत समाज बांधव व महिला बहुसंख्येने सहभागी झाल्या होत्या.

### श्रींच्या प्रगट दिनानिमित्त धार्मिक कार्यक्रम

**खामगाव :** स्थानिक शंकर नगर भागात श्री संत गजानन महाराज चॅरीटेबल ट्रस्ट यांच्या वतीने श्रींच्या प्रगटदिनानिमीत्या १ ते ८ फेब्रुवारी २६ पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम आयोजन केले आहे. यामध्ये १ फेब्रुवारी रोजी कलश पूजन तर श्री संत तुकाराम महाराज चरित्र कथा वाचन १ ते ६ फेब्रुवारी पर्यंत दुपारी १२ ते ४ पर्यंत, ५ फेब्रुवारी रोजी दुपारी ५ ते ७ भजनाचा कार्यक्रम, ६ फब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता माँ दुर्गा मालेची प्राणप्रतिष्ठा व पुर्णाहुती होणार आहे. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता श्रींची शोभायात्रा काढण्यात येणार आहे. तर प्रगटदिनी ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० वाजता हभप महादेव महाराज बोराडे पोरज यांचे काल्याचे किर्तन व त्यानंतर दुपारी १२ ते ४ महाप्रसादतर दररोज सकाळी ५ वाजता काकडा आरती, सायंकाळी ६ वाजता हरीपाठ व रात्री ८ वाजता किर्तनाचा कार्यक्रम होणार आहे.

### सक्षमचे नेत्र तपासणी शिबीर

**खामगाव :** स्थानिक मुकबधीर निवासी विद्यालयात सक्षम खामगाव यांच्यावतीने २८ डिसेंबर २५ रोजी जागतिक दिव्यांग सशक्तीकरण दिनानिमित्तत नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ३१ जानेवारी २६ पर्यंत सुमारे ६०० विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली असून ३० विद्यार्थ्यांना ३१ जानेवारी २६ रोजी शिबीर समारोप प्रसंगी चष्मे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रा.स्व. संघाचे तालुका संघचालक संतोषबाप्पु देशमुख होते. यावेळी सक्षमचे खामगाव नगराध्यक्ष राम एंडोले व ॲड. शेखर जोशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर सक्षमचे उपाध्यक्ष आशिष सराफ यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची माहिती दिली. तर नगरसेवक कृष्णा ठाकुर यांनी आर्थिक मदत केली. शिबीरात मोहनराव नारायण नेत्रालयाचे पीआरओ विठ्ठल सोनाग्रे, डॉ. साबळे यांनी विद्यार्थ्यांची नेत्रतपासणी केली. कार्यक्रमाला सक्षम कोषाध्यक्ष मुन्ना कस्तुरे व सहकोषाध्यक्ष हेमंत खेकाळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन सक्षम उपाध्यक्ष जयंतराव कुलकर्णी तर आभार प्रदर्शन सक्षम सचिव अमित जोशी यांनी केले. शिबीराच्या आयोजनाबद्दल मुख्याध्यापक जगताप यांनी सक्षम टिमचे आभार मानले.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १९५० - २०२५ |
| गहू | २२०० - २४०० |
| तुर | ५१०० - ७७०० |
| हरभरा | ३८०० - ५३०० |
| सोयाबीन | ४८०० - ६१५० |
| उडीद | ४००० - ६३५० |
| मुग | ५५०० - ५५०० |
| मका | १६०० - १६०० |

# वैद्यकीय महाविद्यालयाच्या बांधकामावर मजुराचे दृष्कृत्य

**बुलडाणा दि. २ :** तालुक्यातील हतेडी शिवारात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे बांधकाम सुरू आहे.या कामावर असलेल्या एका २५ वर्षीय आरोपी मजुराने ५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केले,त्यात रक्तस्त्राव होत असल्याने आरोपीने मुलीला रुग्णालयात न नेता तिचे अपहरण करून थेट मलकापूर रेल्वे स्टेशन गाठले. परंतु बुलडाणा पोलिसांनी शिताफीने पीडित मुलीला ताब्यात घेत आरोपी विरुद्ध पोक्सो, अपहरण या कलम न्वये गुन्हा दाखल करत अटक केली आहे.पीसीआर संपल्यावर आरोपीची न्यायालयीन कोठडीत जिल्हा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

बुलडाणा तालुक्यातील हतेडी शिवारात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे बांधकाम सुरू असून "सॅम इंडिया" या कंपनीने बांधकामाचे कंत्राट घेतलेले आहे. मागील काही महिन्यापासून प्रत्यक्षात बांधकाम सुरू झाले आहे. यासाठी बांधकाम करणारी "सॅम इंडिया" कंपनीने मोठ्या प्रमाणात परप्रांतीय मजूर आणले असून त्याच ठिकाणी त्यांना राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. २८ जानेवारी रोजी दुपारी ५ वर्षीय मुलगी एकटी असतांना आरोपी संतोष ब्रिजपाल भोईया,वय २५ वर्ष,रा. चरकील,जि. पलामु, झारखंड याने मुलीला झोपडीत नेले आणि शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यामुळे मुलीच्या गुप्तांगातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. अशात आरोपीने त्या चिरमुडीचे अपहरण केले व तिला घेऊन थेट मलकापूर रेल्वे स्टेशन गाठले. संध्याकाळी तिचे आई-वडील कामावरून परतले असता त्यांना मुलगी दिसली नाही. परिसरात शोध घेतला तरीही त्याचा पत्ता लागला नाही. त्यामुळे याची माहिती तात्काळ बुलडाणा ग्रामीण पोलिसांना देण्यात आली. ठाणेदार गजानन कांबळे यांनी सदर माहिती वायरलेसद्वारे संपूर्ण जिल्ह्याला देत सतर्क केले. तसेच ग्रामीण पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतल माहिती घेतल्यानंतर कळाले की सदर मुलगी आरोपी संतोष भोईया याच्यासोबत जाताना दिसली होती. जिल्ह्यातील सर्व बस स्थानक आणि रेल्वे स्टेशनवर आरोपी व मुलीचा शोध सुरू करण्यात आला शेवटी रात्री मलकापूर शहर पोलिसांनी तेथील रेल्वे स्टेशनवर आरोपी व मुलीला शोधून काढले. बुलढाणा ग्रामीण पोलिसांनी धाव घेत आरोपी व मुलीला ताब्यात घेऊन बुलढाणा आणले.



**पीडित मुलीवर अकोला येथे उपचार सुरू**

जबरी अतिप्रसंग केल्यामुळे पीडित मुलीचा मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव सुरू होता. पोलिसांनी जेव्हा तिला आरोपीच्या ताब्यातून आणले तेव्हा पण तीच परिस्थिती होती. पोलिसांनी पिढीतेला रुग्णालयात उपचारासाठी नेले परंतु रक्त थांबत नसल्याने पुढील उपचारासाठी अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.

**आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल**

पीडित मुलीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीनुसार आरोपी विरुद्ध पोक्सो व अपहरण चा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली होती.बुलढाणा कोर्टात आरोपीला हजर केल्याने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली होती ती संपल्याने आरोपीची रवानगी न्यायालयीन कोठडीत जिल्हा कारागृहात करण्यात आली आहे.

# आई होती, आई आहे, तिच्या कायातून ती सदैव राहील: बुलडाणेकरांशी ममताताईंचा भावनिक संवाद

**बुलडाणा दि. २ :** तू आहेस ना या जिव्हाळा परिवार बुलढाणा यांच्या वतीने आयोजित मुक्त संवादामध्ये पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या कन्या ममता सिंधुताई सपकाळ यांनी बुलढाणेकर रसिकांशी संवाद साधला त्यावेळी त्या बोलत होत्या. आपल्या सगळ्यांना सुरक्षित घर आहेत मात्र अनाथ मुलांना घराची किंमत कळली पाहिजे, घरासारखी माया मिळाली पाहिजे यासाठी माईने सुरू केलेलं बालनिकेतन आम्ही सांभाळत आहोत. वर्षभरातील संपूर्ण सण इथे साजरे केले जातात. कुणाला भाऊ, कुणाला आई, कुणाला बहीण मिळते आणि अनाथ असूनही उद्याच्या कुटुंब संस्थेचा कणा तयार होतो. इथे शिकलेल्या लेकी डॉक्टर, इंजिनियर, वकील होऊन इथूनच सासरी जातात आणि माहेरपणाला देखील येतात. मुलं इथून गेल्यानंतर आपलं कुटुंब म्हणून जबाबदारी पूर्ण करतात हेच आईला अपेक्षित असलेलं काम आम्ही करत आहोत. असं देखील यावेळी बोलतांना त्या म्हणाल्या. कीर्ती वैराळकर यांनी विविध प्रश्न विचारून ताईंना बोलतं करत उत्तरोत्तर कार्यक्रमाची रंगत वाढवली. मुलींच्या घटत्या संख्येवर बोलताना त्या म्हणाल्या की, आपल्याला समाजाची एक बाजू कमकुवत करून चालणार नाही म्हणून मुले आणि मुलींना समान पातळीवर पाहिलं पाहिजे. आज मुलांना लग्नासाठी मुली मिळत नाहीत ही आपण आधी केलेल्या अनेक गर्भपाताची किंमत चुकवत असून संस्थेतून नऊ मुलींची एकाच वेळी लग्न केली. त्यावेळी ५०० अर्ज आले होते ही भयावह वास्तविकता असल्याचे त्यापुढे म्हणाल्या. शिवाय संस्थेतून मुलींच्या लग्नासाठी कुठल्याही पैशाची मागणी केली. जात नाही त्यामुळे अशा पद्धतीचे मेसेज किंवा मागणी आल्यास सावध राहण्यास देखील त्यांनी सांगितले.

बालपणापासून ते माईच्या शेवटच्या क्षणापर्यंत अनेक भावनिक विषयावर बोलताना त्या सद्गतीत झाल्या. खच्च भरलेल्या गोवर्धन हॉलमध्ये सिंधुताईंना ममताताईकडून बुलढाणा कर रसिक तन मनाने ऐकत होते. आई आणि गझल माझ्यासाठी वेगळ्या नाहीत. कमालीचं साधर्म्य आणि टोकाचा विरोधाभास या दोन्ही गोष्टी गझल आणि आई मध्ये मला मिळाल्या म्हणून माझी गझल समृद्ध होत गेली. असे म्हणत वेगवेगळ्या गझल त्यांनी सादर केल्या.




# बालवैज्ञानिक अगस्त्य तिडके राज्यस्तरावर




**बुलडाणा :** श्री शिवाजी शिक्षण संस्था नागपूर या ठिकाणी २८ जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान ५३ वी राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनी पार पडली.या प्रदर्शनीमध्ये देऊळगाव राजा हायस्कूल देऊळगाव राजा चा विद्यार्थी अगस्त्या वैशाली बाळकृष्ण तिडके वर्ग ८ सलग तीन वर्ष तालुका व जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले. या विद्यार्थ्याने ॲग्रो डस्ट क्लिनर हा प्रोजेक्ट सादर केला. या प्रोजेक्टचे वैशिष्ट्य म्हणजेच दिल्ली येथे दरवर्षी हिवाळ्यामध्ये वाढणाऱ्या जीव घेण्या प्रदूषणावर उपाययोजना करण्यासाठी अगदी अभ्यासपूर्ण प्रोजेक्टची मांडणी केली होती. त्यामध्ये राज्यस्तरावर त्याचा सहभाग नोंदवल्याबद्दल त्याला प्राचार्य आर.बी.कोल्हे आणि जाधव सर पर्यवेक्षक यांच्या हस्ते तसेच विज्ञान शिक्षक एस.एल.बोरकर ,पुनम विजयसिंह सूर्यवंशी व सुभाष तिडके यांच्या उपस्थितीमध्ये प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

# बुलडाणा येथे सूर्यनमस्कार कार्यशाळा

**बुलडाणा :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय बुलढाणा येथे रथसप्तमी निमित्त शनिवार दिनांक ३१ जानेवारी रोजी सूर्यनमस्कार कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमात सूर्यनमस्काराचे प्रशिक्षण व स्पर्धा आयोजित करण्यात आली. महाविद्यालयाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. सुनिल विधाते व शरीरक्रिया विभागाच्या विभागप्रमुख डॉ. रंजना शिंगणे यांनी यांनी विद्यार्थ्यांना सूर्यनमस्काराचे महत्व समजून सांगितले. कार्यक्रमाची सुरवात व शेवट वैदिक पद्धतीने करण्यात आली. बारा सूर्यनमस्कारचा मंत्रोच्चार करण्यात आला. विविध योगासनाबद्दल देखील तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले.

सदर कार्यक्रमासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. भागवत भुसारी, प्रशासकीय अधिकारी सोमनाथ माठे, वरिष्ठ लिपीक राजू काटोळे इत्यादी उपस्थित होते. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून मार्गदर्शक म्हणून जिल्हा समन्वयक शिवाजी नागरे, स्वाती देगलूरकर व कालिंदा नागरे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अधिपरिचारिका सौ. पौर्णिमा इंगळे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.



# विहिरीत बुडून शिक्षकाचा मृत्यू

**मंगरूळ नवघरे :** हराळखेड (ता. चिखली) येथे विहिरीत पाण्यात बुडून एका ५२ वर्षीय शिक्षकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी अमडापूर पोलीस ठाण्यात कायम मर्ग क्रमांक ०५/२०२६ कलम १९४ बीएनएस अन्वये नोंद करण्यात आली आहे. मयताचे नाव स्व. किसन भगवान येवले (वय ५२, रा. हराळखेड) असे आहे. याबाबत फिर्यादी नंदकिशोर मधुकर येवले (वय ३६, रा. हराळखेड) यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.०१ फेब्रुवारी २०२६ रोजी रविवार असल्याने किसन येवले हे शेतामध्ये फेरफटका मारण्यासाठी गेले होते. दरम्यान, अज्ञात कारणाने ते विहिरीत पडल्याने पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाला. ही घटना दि. ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली असून मृत्यूची नोंद सकाळी ०९.३० वाजता करण्यात आली. मृत्यूचे कारण विहिरीत पाण्यात बुडणे असे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाचा तपास सफौ अमडापूर हे करीत असून मर्ग दाखल अधिकारी सफौ अमडापूर आहेत. पोलीस उपनिरीक्षक यांच्या आदेशानुसार पुढील तपास दिलीप तोंडे करीत आहे. स्व. किसन भगवान येवले हे जिल्हा उच्च प्राथमिक शाळा, वैरागड ता.चिखली येथे कार्यरत होते.



# नवनाथ महाराज पुतळा विटंबना प्रकरणी हिंदुत्ववादी संघटना आक्रमक

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**शेगाव दि. २ :** तालुक्यातील ग्राम हिंगणा येथील एका शेतात असलेल्या नवनाथ महाराजांचे पुतळे अज्ञात समाजकंटकाकडून त्याची विटंबना करण्यात आल्याची घटना दिनांक जानेवारी रोजी घडली होती. मात्र पोलीस अद्यापही अज्ञात आरोपीस अटक करून न शकल्यामुळे आज स्थानिक छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये बजरंग दल शिवसेना व भाजपकडून निषेध आंदोलन करण्यात आले तसेच पंधरा दिवसात आरोपीस अटक न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही देण्यात आला. या आंदोलनात शिवसेना तालुका प्रमुख रामा पाटील थारकर, भाजपचे ज्येष्ठ नेते प्रदीप सांगळे शहराध्यक्ष ज्ञानेश्वर आप्पा साखरे, शुभम ढगे, बजरंग दलाचे सोमेश कांबळे, अतुल ठोंबरे शुभम भुसारी, यांचेसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.




हिंगणा येथे नवनाथ महाराजांच्या पुतळ्यांची विटंबना झाली असून आरोपींना अद्यापही पोलीस अटक करू शकले नाहीत पोलिसांनी पंधरा दिवसात आरोपीस अटक न केल्यास शिवसेना तीव्र आंदोलन करेल

**रामा पाटील थारकर**
तालुका प्रमुख शिवसेना

# कामगारांनी देशव्यापी संपात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे- गायकवाड

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि. २ :** देशातील मोदी सरकारने कामगार हिताचे २९ कामगार कायदे रद्द करून त्याऐवजी भांडवल धार्जिणे व कामगारावर अन्याय करणाऱ्या चार श्रमसंहिता कुठलीही चर्चा न करता आपल्या बहुमताच्या जोरावर संसदेत संमत केल्या. त्याची अंमलबजावणी करण्याचे आदेश राज्यांना देण्यात आले आहेत. या चार श्रमसंहितेमुळे देशातील कामगारांची सुरक्षितता मोठ्या प्रमाणात धोक्यात येणार आहे. तसेच नुकतेच १ फेब्रुवारी रोजी संसदेत जाहीर झालेल्या केंद्रीय बजेट मध्ये देशातील कामगार कष्टकऱ्यांना दिलासा देण्यासाठी व देशातील आरोग्य,शिक्षण व जिवनाश्यक वस्तूंच्या किमंती कमी करून महागाई कमी करण्यासाठी कुठलीही उपाययोजना केलेली नाही. या भांडवल धार्जिण्या सरकारी धोरणाचा निषेध करण्यासाठी दिनांक १२ फेब्रुवारी रोजी अखिल भारतीय स्तरावरील सीटूसह इतरही प्रमुख कामगार संघटनेनी जो एकदिवशीय संप पुकारला आहे. या संपात जिल्ह्यातील कामगार कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सीटूचे जिल्हा अध्यक्ष कॉ.पंजाबराव गायकवाड यांनी केले आहे. देशात महिला व बाल विकास, राष्ट्रीय आरोग्य मिशन, मध्यान्ह भोजन इत्यादी सारख्या सरकारच्या महत्वाच्या विविध योजनेत देशातील अंगणवाडी कर्मचारी, आशा वर्कर्स, गटप्रवर्तक, अर्धवेळ स्त्री परिचारिका, आणि शालेय पोषण आहार कामगार अत्यंत अल्प मानधनावर व मोबदल्यावर काम करतात. २०१८ पासून त्यांच्या मानधनात एक रुपयाची सूद्धा केंद्र सरकारने वाढ केलेली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या या महिला कामगारांनी १२ फेब्रुवारी च्या अखिल भारतीय स्तरावरील एकदिवसीय संपात सहभागी होऊन या संपाला पाठिंबा देण्याचे जाहीर केले आहे. याबाबतची नोटीस आज २ फेब्रुवारी २०२६ रोजी सिटूचे जिल्हा अध्यक्ष पंजाबराव गायकवाड यांच्या पुढाकारात जिल्हाधिकारी यांना देण्यात आली. यावेळी अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या राज्य उपाध्यक्ष तथा जिल्हा सचिव प्रतिभा पाटील गटप्रवर्तक संघटनेचे जिल्हा सचिव जयश्री तायडे, रेखा इंगळे, अर्धवेळ परिचारिका संघटनेच्या जिल्हा अध्यक्ष छाया खंडारे, शालेय पोषण आहार कामगार संघटनेच्या उपाध्यक्ष शोभा काळे, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर वाघमारे, नर्मदा शिरसाट, सुरेखा डोंगरे, सुरेखा गायकवाड छाया जाधव इत्यादी उपस्थित होते.



**शैक्षणिक**

## आरोग्य क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय सहकार्यावर चर्चा

# जर्मन शिष्टमंडळाची हर्ष इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंगला भेट

**अंजिक्य भारत** / प्रतिनिधी

**खामगाव दि. २ :** आज हर्ष इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग खामगाव येथे जर्मनीहून आलेल्या एका उच्चस्तरीय शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रातील शिष्टमंडळाने भेट दिली. या भेटीचा मुख्य उद्देश आरोग्य सेवा आणि विशेषतः नर्सिंग क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय भागीदारी मजबूत करणे हा होता.

या शिष्टमंडळामध्ये जर्मनीच्या आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील प्रा. डॉ. टॉम शाल, डीन, झिकाऊ विद्यापीठ जर्मनी, टोरॅल्फ हेतझे प्राचार्य डी आर के अकॅडेमी, जर्मनी, टीम तिशेंडोर्फ व श्रीमती मॅडी विटव्यालीच या तज्ज्ञांचा समावेश होता. त्यांनी संस्थेच्या शैक्षणिक सुविधा, अत्याधुनिक प्रयोगशाळा आणि प्रशिक्षण पद्धतींची पाहणी केली. या भेटीदरम्यान भारतीय परिचारिकांसाठी जर्मनीतील रोजगाराच्या संधी आणि प्रगत कौशल्य विकास या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

**भेटीतील महत्वाचे मुद्दे:** कौशल्य विकास: नर्सिंग विद्यार्थ्यांना जर्मन भाषेचे प्रशिक्षण देऊन त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर सक्षम बनवण्याबाबत चर्चा करण्यात आली. **रोजगार संधी:** प्रशिक्षित परिचारिकांना जर्मनीतील नामांकित रुग्णालयांमध्ये कामाची संधी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक विचार व्यक्त करण्यात आला. **शैक्षणिक देवाणघेवाण:** विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या देवाणघेवाण कार्यक्रमाद्वारे शिक्षणाचा दर्जा वाढवण्यावर भर देण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष जनार्दन हेंड पाटील यांनी शिष्टमंडळाचे स्वागत करताना सांगितले की, "हर्ष इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग हि विदर्भातील एकमेव संस्था असून ज्यांचा आंतरराष्ट्रीय स्तरावर सामंजस्य करार होणार आहे अशा जागतिक स्तरावरील सहकार्यामुळे आमच्या विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक कौशल्येच नाही, तर आंतरराष्ट्रीय कामाचा अनुभव मिळण्यास मोठी मदत होईल."या भेटीमुळे हर्ष इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग खामगाव आणि जर्मन संस्थांमधील भविष्यातील शैक्षणिक करारांसाठी एक ठोस पाया रचला गेला आहे.




# राजकारणाची जाण आणि सामाजिक भान असलेले नेतृत्व हरपले- आ. सौ. महाले

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**चिखली दि.२:** महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दुःखद निधनाने संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला असून, राज्याने एक अनुभवी, कतृर्त्वान आणि जनतेसाठी सतत झटणारे नेतृत्व गमावले आहे. या दुःखद घटनेच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या पवित्र स्मृतीस आदरांजली अर्पण करण्यासाठी दिनांक २ फेब्रुवारी २६ रोजी दुपारी १ वाजता चिखली येथील शिवाजी कला मंदिर, शिवाजी हायस्कूल येथे शोकसभा व श्रद्धांजली सभा संपन्न झाली.

यावेळी चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की "राजकारणाची जाण आणि सामाजिक भान असलेले दूरदृष्टीचे नेतृत्व महाराष्ट्राने गमावले आहे. अजितदादांचे कार्य, त्यांची कार्यपद्धती आणि जनतेशी असलेली आपुलकी कायम स्मरणात राहील." सभेमध्ये इतर मान्यवरांनीही अजितदादांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला. त्यांच्या साधेपणा, निर्णयक्षमता आणि प्रशासनावर असलेली पकड याविषयी अनेक प्रसंग कथन करण्यात आले. शेवटी सर्व उपस्थितांनी पुष्पांजली अर्पण करून दिवंगत नेत्यास भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. संपूर्ण वातावरण शोकमय झाले असून, उपस्थितांच्या डोळ्यांतून अश्रू आणि मनात दुःखाची भावना स्पष्टपणे दिसून येत होती. या सभेस चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांच्यासह काँग्रेसकडून जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष राहुल बोंद्रे, शिवसेना उबाठा पक्षाचे नेते माजी जी. प. अध्यक्ष नरेंद्र खेडेकर, शिवसेना नेते श्रीराम झोरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष शंतनू बोंद्रे, मनसे जिल्हाध्यक्ष गणेश बरबडे, भाजपा उपजिल्हाध्यक्ष देविदास जाधव, संजय गाडेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे मनोज दांडगे, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## महत्त्वाचे

### संस्कार प्रबोधिनीच्या एकांकिकेला पारितोषिक

**जालना :** नाट्यांकूर एकांकिका स्पर्धेत हायस्कूल विभागातून संस्कार प्रबोधिनी माध्यमिक विद्यालयाच्या स्वच्छता एकांकिकेचा सर्व तृतीय क्रमांक तर अभिनयामध्ये तृतीय, उत्तेजनार्थ पारितोषिक मिळून घवघवीत यश संपादन केले आहे. स्पर्धेत हायस्कूल विभागातून संस्कार प्रबोधिनी माध्यमिक विद्यालयाच्या स्वच्छता एकांकिकेने तृतीय क्रमांक मिळवला आहे. अभिनयात तृतीय आणि उत्तेजनार्थ पारितोषिक मिळून कलावंतांनी घवघवीत यश संपादन केले आहे. स्वच्छता एकांकिकेचे लेखन व दिग्दर्शन उपक्रमशील शिक्षक रामदास कुलकर्णी यांनी केले होते. स्पर्धेत अभिषेक वाढेकर, स्वानंद गोंदीकर, श्रावणी राऊत, प्रतिभा शेळके, प्रांजल देवरे, दर्शना वाघमारे, तन्वी देशमुख, अथर्व जाधव, आदर्श काळे, सुंदर शिंदे आदींचा सहभाग होता. स्पर्धेतील यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुरेश कुलकर्णी, सचिव विजय देशमुख, बिनायकमामा देशपांडे, भास्करराव काळे, डॉ. दीपक मंत्री, डॉ. जुगलकिशोर भाला आदींनी कौतुक केले आहे.

### शिबिरामध्ये ५० दिव्यांग व्यक्तींची दंत तपासणी

**जालना :** सक्षम व लायन्स क्लब ऑफ जालना मर्चेंट सिटीच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व्यक्तींसाठी मोफत दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात ५० मुलांची तपासणी करण्यात आली. जालना शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळील रुपम हॉल येथे हे शिबिर पार पडले. सक्षम व लायन्स क्लबच्यावतीने नेहमीच विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. या शिबिरात ५० दिव्यांग व्यक्तींनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मनीष अग्रवाल, डॉ. प्रकाश आंबेकर, प्रमिला मोरे यांच्यासह जगदीश प्रित्यानी, राहुल अग्रवाल यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विनोद कुमावत, डॉ. अरविंद नाईक, इंद्रजीत केदारे, विनोद वीर, पिंपळकर, मोहिनी धनकानी, अमृता धावणे, भाग्यश्री गोमतीवाले, गोपाल गोमतीवाले आदींनी परिश्रम घेतले. दंत तपासणी झाल्यानंतर मुलांना शस्त्रक्रियेची गरज आहे का, याचीही माहिती देण्यात आली. मोफत तपासणीमुळे दिव्यांग मुलांना दिलासा मिळाला. सहभागी विद्यार्थ्यांनी आपले विविध कला-गुणही सादर केले. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात हे शिबिर पार पडले.

# कॉपी करण्यास सहकार्य करणाऱ्यावर गुन्हा दाखल करुन सेवेतून निलंबित करणार : जिल्हाधिकारी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**जालना, दि. २ :** जिल्ह्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (बारावी) दि.१० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ तर माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (दहावी) दि.२० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यात इयत्ता बारावीच्या परीक्षेसाठी ३७ हजार ३३८ विद्यार्थ्यांसाठी ७९ परीक्षा केंद्र आहेत. इयत्ता दहावीच्या परीक्षेसाठी ३२ हजार ४३३ विद्यार्थ्यांसाठी १०२ परीक्षा केंद्र आहेत. सर्व परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची चोख व्यवस्था करण्यात आली असून जिल्ह्यातील संवेदनशील बारावीच्या ८ तर दहावीच्या ४ अशा एकुण १२ परीक्षा केंद्रावर ड्रोन कॅमेऱ्याची नजर राहणार असून चित्रीकरणही करण्यात येणार आहे. जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार असून दहावी, बारावीच्या परीक्षेत कॉपी करण्यास सहकार्य करणाऱ्यावर गुन्हा दाखल करुन सेवेतून निलंबित केले जाईल, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात दहावी, बारावीच्या परीक्षेच्या अनुषंगाने दक्षता समितीची बैठक पार पडली. यावेळी त्या बोलत होत्या. या बैठकीस उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, पोलिस उपअधिक्षक रविंद्र निकाळजे, शिक्षणाधिकारी बाळु खरात यांच्यासह शिक्षण विभागासह संबंधित यंत्रणेचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, विद्यार्थ्यांची क्षमता विकसित करण्यासाठी कॉपीला आळा घालणे अतिशय महत्वाचे आहे. दहावी, बारावीच्या परीक्षा शांततेत व तणावमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी वातावरण निमिर्ती करुन विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वाढ होण्यासाठी कॉपीमुक्त परीक्षा अत्यंत महत्वाची आहे. आगामी काळात परीक्षा पारदर्शक आणि शांततेत पार पाडण्याचा प्रशासनाचा मानस असून कॉपीमुक्त परीक्षा सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाकडून कडक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. दहावी व बारावीच्या परीक्षेत कॉपी करण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित उमेदवारावर कठोर कारवाई करण्यात येईल. परीक्षार्थ्यांनी कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये, आपल्या अभ्यासावरुन पेपरमध्ये लिखाण करावे. सर्व परीक्षा केंद्रावर २ अधिकारी-कर्मचाऱ्यांची बैठे पथकात नियुक्ती करण्यात येणार आहे. जिल्हाभरात परीक्षेसाठी एकुण ६ भरारी पथके तैनात करण्यात आली असून त्याद्वारे सर्व परीक्षा केंद्रावर लक्ष दिले जाणार आहे. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी केंद्र संचालकांनी दक्षता बाळगावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

केंद्र संचालकाशिवाय परीक्षा केंद्रावर कोणत्याही व्यक्तीला मोबाईलचा वापर करता येणार नाही. तसेच परीक्षा केंद्र परीसरात १४४ कलम लागू करण्यात येणार आहे. परीक्षार्थ्यांची तपासणी करुन नंतरच परीक्षा केंद्रात प्रवेश देण्यात येणार आहे. जालना जिल्ह्यातील दहावी, बारावीच्या एकुण १२ संवेदनशिल परीक्षा केंद्रासाठी वेगळ्या मार्गदर्शक सूचना देण्यात येणार असून त्यांच्यासाठी स्वतंत्र व्हॉटसअप ग्रुपही तयार करण्यात आला आहे. त्याद्वारे नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. या सर्व दहावी, बारावीच्या परीक्षेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या टॉप टेन केंद्र प्रमुखांचा पालकमंत्री यांच्या हस्ते गौरव केला जाईल. असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी उपस्थित केंद्र प्रमुखांना माझ्या परीक्षा केंद्रावर कॉपीचा गैरप्रकार घडू देणार नाही अशी सामुहिक प्रतिज्ञा देण्यात आली. या बैठकीस जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी, सर्व केंद्र संचालक आदि मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नळविहिरा परिसरात माकडांचा उच्छाद

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**ॲग्रोव्हिजन गटशेती संघाचे वनपरिक्षेत्र कार्यालयाला निवेदन**

**जाफराबाद , दि. २ :** तालुक्यातील नळविहिरा व परिसरात मोठ्या प्रमाणात माकडांचा उच्छाद वाढला असून या माकडांचा ताबडतोब बंदोबस्त करण्यात यावा, अशी मागणी ॲग्रोव्हिजन गटशेती संघाने गावकऱ्यांच्यावतीने ग्रामसभेच्या ठरावाद्वारे वनपरिक्षेत्र कार्यालयाला रीतसर निवेदन देऊन केली आहे.

ॲग्रोव्हिजन गटशेती संघांचे संस्थापक प्रमुख संजय मोरे यांनी शुक्रवारी वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक जालना ( प्रा. ) उत्तर यांचे कार्यालयाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की मौजे नळविहिरा परिसरात माकडांच्या अनेक टोळ्यांनी शेतकरी वर्गाला अक्षरशः त्रस्त करून सोडले आहे. कपाशी, मका सारख्या पिकांसोबतच आंबा, आवळा या फळपिकांसह अनेक फळपीके ही माकडे फस्त करीत आहेत. आता ही माकडे माणसांना अजिबात जुमनात नाहीत. महिला, लहान मुले यांच्या अंगावर धावून येतात. पिसाळल्यागत दात विस्कटून जोरदारपणे धाक दाखवतात. दिवसेंदिवस माकडांचा जास्तच धाक वाढत असून महिलांना शेतात काम करण्याची भीती वाढत चालली आहे. अगोदरच हरीण, रानडुक्कर, निलगाय यांच्या नुकसानीपासून शेतकरी त्रस्त आहेत. त्यांचाही तात्काळ बंदोबस्त होणे आवश्यक आहे. परंतु माकडांचा त्वरित बंदोबस्त करून नळविहिरा गाव व परिसरातील सर्व माकडे पकडून नेऊन शेतकऱ्यांना माकडाच्या भीती व नुकसानीपासून वाचवावे अशी मागणी संजय मोरे यांनी गावकऱ्यांच्या वतीने निवेदनात केली आहे.

# श्रीक्षेत्र खणेपुरीत आज सूत्रपाठ ग्रंथ महाराज पालखी सोहळा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २ :** सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी विचार प्रबोधिनी सेवाभावी संस्थेच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही श्री क्षेत्र खणेपुरी ता. जालना येथील सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी चरणांकित भारद्वाज वेध तीर्थस्थान, १०८ फोटी नामस्मरण मंदिर, श्रीकृष्णनीथ महानुभाव देवस्थानास मंगळवारी महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांच्या मुखातून निघालेली वचने, तत्वज्ञानावर आधारित लीळाचरित्र ग्रंथातील निवडक वचनांचा संग्रह असलेला केसिराज ध्यास रचित श्री श्री सुत्रपाठ ग्रंथ महाराज पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून मंत्रिमंडळातील मंत्री, खासदार, आमदार, धर्माचार्यासह राज्याच्या कानाकोपऱ्यातून दहा हजार भाविक सहभागी होणार आहेत, अशी माहिती महंत श्री प्रज्ञासागर बाबा महानुभाव यांनी दिली.

महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांच्या मुखातून निघालेली बचने, तत्वज्ञानावर आधारित लीळाचरित्र ग्रंथातील निवडक वचनांचा संग्रह असलेला रचित श्री श्री सूत्रपाठ ग्रंथांची रचना केसिराज व्यास यांनी लीळाचरित्रानंतर दहा वर्षांनी इ.स.१२१० मध्ये केली होती. या ग्रंथांचे तत्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावं यासाठी महत श्री प्रज्ञासागर बाबा महानुभाव यांनी सन २००० साली ज्ञानाची पालखी हा अभिनव सोहळा सुरू केला. यंदाचे हे २६ वे वर्ष आहे. मंगळवारी दुपारी ३ वाजता जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते धर्म ध्वजारोहण होईल. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते श्री सूत्रपाठ ग्रंथ प्रकाशन, तदनंतर गावातून पालखी मिरवणूक काढली जाईल. दुपारी ४ वाजता ज्ञानसभेचे आ. अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन तर मांजी मंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते देवस्थान महापूजा होईल. याप्रसंगी खा. डॉ. कल्याण काळे, परभणीचे खा. संजय जाधव, जिल्हाधिकारी अशिमा मित्तल, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, माजी आ. चंद्रकांत दानवे, उद्योजुक सुनील भाई रायठठ्ठा, संजय कदम, नागपूर येथील महानुभाव तीर्थस्थान समन्वयक अनिल बौडते, उपास्य अत्रागाचार्य प.पू लोणारकरबाबा, कवीचर कुलाचार्य पं. श्री खाम णीकर बाबा, प.पू. आलाय आचार्य श्री कोठीबाबा, ए. म. आचार्य राहेरकरबाबा, प.पू.ग. आचार्य राजार बाबा, प.पू.म. संतोष मुनी शास्त्री, प.पू. म. आचार्य श्री वेळमकरबाबा, प.पू. म. आचार्य श्री मोनेवाला या धर्माचार्यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

# विक्रमशिला शाळेत बक्षीस वितरण सोहळा उत्साहात

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**अंबड, दि. २ :** येथील शिवबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था,आन्वी संचलित विक्रमशिला प्राथमिक निवासी शाळेत रविवार,दि. १ फ ेब्रुवारी रोजी अभ्यासक्रम उद्घाटन सत्र व बक्षीस वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

शाळेच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमातून नवीन शैक्षणिक वर्षाचा शुभारंभ करण्यात आला तसेच यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. या सोहळ्याचे उद्घाटन रामकिसन सोळूंके यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष बळीराम राऊत होते.प्रमुख मार्गदर्शक म्हणून माऊली दोबोले यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, ध्येय निश्चिती व जीवनमूल्यांवर सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी, मॅथ्स व विज्ञान विषयांवरील विविध प्रयोगांचे प्रभावी सादरीकरण केले. तसेच पुणे येथे उत्कृष्ट शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आलेले योगेश हरणे यांचा शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संस्थेमध्ये उत्कृष्ट शैक्षणिक कार्य केल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी ॲड. कृष्णा शर्मा यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावातील अर्थ स्पष्ट करत''शि शिकायचं, वा वाचायचं आणि जी जगायचं''

हा प्रेरणादायी संदेश विद्यार्थ्यांना दिला. तसेच संत तुकाराम गुरुकुल,आष्टी सर्कल येथील रामकिसन सोळूंके यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला निमंत्रित पाहुणे म्हणून डॉ.महेश मुंढे,ॲड.कृष्णा शर्मा, मधुकर घुमरे तसेच पत्रकार राजेंद्र गायकवाड यांची उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाबरोबरच त्यांच्या कलागुणांचे कौतुक करण्यासाठी आयोजित बक्षीस वितरण सोहळ्यात बळीराम राऊत यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र व ट्रॉफी बक्षीस स्वरूपात प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमास शिक्षक संजय जाधव, योगेश हरणे, प्रमोद मस्के, सौ.शितल जाधव व योगिता शिंदे उपस्थित होत्या. कार्यक्रमास नागरिक,पालक व शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पारध बुद्रुक ग्रा.पं.सदस्य उपोषणास बसणार

## विजेची समस्या, मोडकळीस आलेले खांब बदलण्याची मागणी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २ :** भोकरदन तालुक्यातील पारध बुद्रुक गावातील विविध समस्या सोडविण्याच्या मागणीसाठी ग्रामपंचायतचे पदाधिकारी, उर्दू शालेय व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर ४ फेब्रुवारीपासून आमरण उपोषण करणार असल्याची माहिती माजी सभापती मनीष श्रीवास्तव यांनी दिली.

पारध बु. गावठाणातील विजेच्या समस्या सोडविण्यात याव्यात. तसेच गावातील जीर्ण व मोडकळीस आलेले २५ एल. टी. पोल तात्काळ मिळावेत. ब्रेक डाऊन, आर्थिंग, किटकॅट, बुशिंग,रॉड, लग्स, केबल, तसेच मेंटेनन्सचे काम करण्यात यावे. ३३ के. व्ही. सबस्टेशनची क्रॉसिंग काढण्यात यावी. ए. बी. स्विच बसवण्यात यावे. पराशर नगर येथील ६३ क्षमतेचा ट्रान्सफार्मर १०० क्षमतेचा करून मिळावा. चौरिवाडी (रामनगर) येथे २५ ऐवजी १०० क्षमतेचा ट्रान्सफार्मर मंजूर करण्यात यावा. पारध बू. ते पारध खुर्द रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे. पारध बू. ते धामणगाव रस्त्याचे काम सुरू करण्यात यावे. रस्त्याच्या दुतर्फा नालीचे काम सुरू करून सार्वजनिक बांधकाम विभागाची तसेच ग्रामपंचायतीची हद्द कायम करण्यात यावी. रायघोळ नदी ते मर्दडीदेवी मंदिर व वालसावंगी फाटा ते महेश देशमुख यांचे शेतापर्यंत रस्त्याचे दुभाजक बसवण्यात यावे. पारध बू. ते चौरिवाडी (रामनगर) रस्त्याचे ०/५०० ते १.५०० किमी काम ग्रामीण रस्ते विकास योजनेतून मंजूर करण्यात यावे. पारध बू. ते डोमरूळ सरहद रस्त्याचे अर्धा कि.मी.अंतराचे काम मंजूर करण्यात यावे. पारध उर्दू प्राथमिक शाळेला ५ शाळा खोल्या तात्काळ मंजूर करण्यात याव्यात. पारध बु. येथील हिंदू सार्वजनिक स्मशानभूमीची गट नंबर ३८९ च्या सातबारावर वहिवाटी प्रमाणे नोंद घेण्यात यावी आदी मागण्यांसाठी हे उपोषण करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

**स्नेहसंमेलन** | नगरसेवक केदारदादा कुलकर्णी यांचे भावनिक मत

# कुठलेही दडपण न टाकता मुलांना हसत-खेळत शिकू द्या

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अंबड, दि. २ :** विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी वार्षिक स्नेह संमेलनासारखे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम उपयुक्त ठरतात.तसेच पुस्तकी अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांनी विविध कला, छंद जोपासावेत असे आवाहन करतांनाच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कौतुकास्पद काम महात्मा फुले इंग्लिश स्कुल नेहमीच करत असते. पालकांनी दडपण न आणता मुलांना हसत खेळत शिकू द्यावे, असे मत नगरसेवक केदार दादा कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

अंबड शहरातील महात्मा फुले व स्मार्ट किडस वर्ड इंग्लिश स्कुलच्या शनिवारी आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाचे उदघाटन नगरसेवक केदार दादा कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून एसबीआय बँकेचे शाखाधिकारी कौशीक चौधरी, डॉ.राजेंद्र ठोसर, माजी नगरसेवक कुमार रुपवते, नगरसेवक गंगाधर वराडे, नगरसेवक सौरभ कुलकर्णी, केंद्र प्रमुख माने, यशवंत व्याख्यानमालेचे संजय खोरे, संपादक बळीराम राऊत, बाबासाहेब सोळुंके आदींची उपस्थिती होती.



यावेळी पुढे बोलतांना केदार कुलकर्णी म्हणाले की, कोणत्याही मुलाची पहिली शाळा हे त्याचे घर असते आणि पहिले शिक्षक हे त्याचे पालक असतात. सुरुवातीच्या काळात कोणतेही मूल आपल्या पालकांकडूनच सर्व कामे करायला शिकते, जर तुम्हाला तुमच्या मुलाचे भविष्य चांगले घडवायचे असेल तर त्यांना नेहमीच चांगले शिक्षण द्या. आजच्या पालकामध्ये शिक्षणाविषयी आवड आहे त्यामुळे प्रत्येक पालक आपल्या मुलांकडून काही तरी अपेक्षा धरुन आहे. मात्र पालकांनी आपल्या मुलांवर जास्त दडपण न टाकता त्यांना मुक्तपणे त्यांच्या मनाप्रमाणे जगू दिले पाहिजे. हे वय मुलांचे खेळण्याबागडण्याचे आहे. त्यामुळे मुलांना हसत खेळत शिकू द्या असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी शाखाधिकारी कौशिक चौधरी व डॉ.राजेंद्र ठोसर यांनीही मौलिक मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात संस्थाध्यक्ष गिताराम मते यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा मांडला तसेच विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविण्याचे काम आम्ही असेच प्रामाणिकपणे करत राहू अशी ग्वाही दिली.

यावेळी वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात देवा श्री गणेशा,वारकरी दिंडी,फनी डान्स, देशभक्तीपर गाणे,शेतकरी गित अशी अनेक गाणे विद्यार्थ्यांनी उत्कृष्टपणे सादर केली. यामध्ये तान्हाजी मालुसरे यांची लढाई तसेच देशाच्या एकात्मतेवरील नृत्यकला लक्षवेधी ठरल्या.

या कार्यक्रमांचे सुत्रसंचालन स्वाती जंगले व उज्वल सावंत यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्या सविता मते, शबनम शेख, साधना शिंदे, सोनाली जैन, आश्विनी जानवे, गायत्री पाटील, कोमल देवडे, वैष्णवी गायकवाड, वैभवी पडूळ, कोमल ऊगले यांच्यासह बाबासाहेब जावळे, शिवराज मते, संजय परदेशी आदींनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह विद्यार्थी व पालकांची मोठी उपस्थिती होती.



### पालक नसलेल्या, हलाखीच्या आर्थिक परिस्थितीच्या मुलांना मोफत शिक्षण

* कोरोनामध्ये पालक गमावलेल्या मुलांसह आत्महत्याग्रस्त शेतक-यांची मुले तसेच जे पालक मुलांची शैक्षणिक फिस भरु शकत नाही अशा गरीब मुलांना महात्मा फुले इंग्लिश स्कुलमध्ये मोफत प्रवेश देवून त्यांच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च संस्था करत असून सद्यस्थितीमध्ये या शाळेत अशी १७ मुले मोफत शिक्षण घेत आहेत असे संस्थाध्यक्ष गीताराम मते यांनी यावेळी सांगितले
* कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्व.अजीतदादा पवार यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली यावेळी अजीजदादा यांचा आवाजातील वरील ऑडीओ लावण्यात आला होता यावेळी संपुर्ण सभागृह भावूक झाले होते.
* या कार्यक्रमात अजीजदादा पवार यांची रांगोळी ठरली लक्षवेधी सर्वांचे लक्ष त्या रांगोळीकडेच होते .केशव मिटकुल व प्रसाद जावळे यांनी विमान अपघाताची दादाचा फोटो असलेली रांगोळी काढली होती ही रांगोळ काढण्यासाठी त्यांना तब्बल ५ तास लागले होते.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, मंगळवार, ३ फेब्रुवारी २०२६

## थोडक्यात

### आमिष दाखवून लाखोंची फसवणूक

अमरावती : शेअर्समध्ये यांची नफा कमवण्याचे आमिष देत एक अज्ञात महिलेने रविकांत लक्ष्मीनारायण झंवर (६६, रा. मांगीलाल प्लॉट) ३ लाख ४४ हजार ९९८ रुपयांनी फसवणूक केली. त्यांच्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी अज्ञात महिलेविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### वाहतूकीस अडथळा करणाऱ्यांवर कारवाई

अमरावती : अडथळा निर्माण रहदारीस करणाऱ्या वाहन चालकांसह दुकानदारांवर वेगवेगळया पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. नांदगाव पेठ पोलिसांनी पसिरातील बस स्टँड रोड कारवाई करीत अमोल अरुण साबळे (३५), मोहम्मद शेख इरफान मजीर (३३) व वैभव सानदेव दराळे (२२), नागपुरी गेट पोलिसांनी मनोज नन्हेलाल बरसैय्या (५९), तर भातकुली पोलिसांनी गणेश शंकरराव माकोडे (२८) याच्यावर कारवाई करीत गुन्हा नोंदवला.

### तडीपार आरोपीला शंकरनगरातून अटक

अमरावती : तडीपार युवक शंकर नगर बगिच्याजवळ आढळून आला. त्याच्यावर राजापेठ पोलिसांनी कारवाई करीत मपोका नोंदवला. संकेश सुरेशराव घुगे (२६) असे तडीपाराचे नाव आहे.

### जुगार अड्डुयावर पोलिसांच्या धाडी

अमरावती : बडनेरा, नांदगाव पेठ व नागपुरी गेट पोलिसांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात प्रत्येकी एकेका जुगारावर कारवाई केली. या कारवाईदरम्यान एकूण 5 हजार ७९५ रुपयांचे साहित्य जप्त करण्यात आले. या वेळी राहुल दादारावजी वरठे (४८), बंडू भीमरावजी बरडे (४८), शेख नईम शेख फईम (४०) यांच्यासह अन्य दोघांवर गुन्हे दाखल केले.

### दारू विक्रेत्यांवर पोलिसांची कारवाई

अमरावती : नागपुरी गेट पोलिसांनी अवैध दारू विक्रेत्यावर कारवाई करीत साडे चार हजारांची दारू जप्त केली. ही कारवाई रतनगंज ते मसानगंज रोडवर करण्यात आली. प्रथम गौतम धाडसे (२०) याच्यावर गुन्हा नोंदवला.

### मारहाण प्रकरणी परस्परविरोधी तक्रारी

अमरावती : वलगाव पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या मार्की येथे एकदुसऱ्याला मारहाण करीत दुखापत केली. या प्रकरणी परस्पर विरोधी तक्रारीवरून पोलिसांनी एकूण चौघांवर गुन्हे दाखल केले.

### घराच्या आवारातून दुचाकीची चोरी

अमरावती : यशोमंगल ले-आऊट, व्हीएमव्ही परिसरात घराच्या आवारातून अज्ञाताने दुचाकी (एमएच २७-एई १६६४) अज्ञाताने चोरून नेली. तिची अंदाजे किंमत १० हजार रुपये आहे. श्रीकृष्ण संपतराव भुसारी (७१) यांच्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### दुचाकी धडकेत युवक जखमी

अंजनगाव सुर्जी : १७ वर्षीय युवक हा कामावरून घरी सायकलने परत येत होता. त्याच वेळी भरधाव आलेल्या अज्ञात दुचाकीस्वाराने तयाला धडक दिली व पळून गेला.त्यात युवक जखमी झाला.

ही घटना पानअटाई मार्गावर घडली. त्याच्या तक्रारीवरून अज्ञात दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# भाजपचा महापौर ठरला; सव्वा-सव्वा वर्षांचा फार्म्युला

## श्रीचंद तेजवानी भाजपचे पहिले सिंधी समाजाचे महापौर






अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती,दि. २ :** अमरावती महानगरपालिकेत अखेर सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा झाला असून महापौर पदावर भारतीय जनता पार्टीचा उमेदवार निश्चित झाला आहे. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट), आमदार रवी राणा यांची युवा स्वाभिमान पार्टी आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्या महायुतीतून अमरावती महानगरपालिकेत सत्ता स्थापन होणार आहे. या सत्तावाटपात महापौर पदासाठी सव्वा-सव्वा वर्षांचा फार्म्युला निश्चित करण्यात आला असून सुरुवातीचे अडीच वर्ष भाजपकडे राहणार आहेत.

भाजपच्या आज झालेल्या अंतर्गत बैठकीत महापौर पदाच्या नावांवर शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यानुसार सुरुवातीच्या सव्वा वर्षासाठी भाजपचे नगरसेवक श्रीचंद तेजवानी हे महापौर असतील, तर त्यानंतरच्या सव्वा वर्षात भाजपचेच आशिष अतकरे महापौर पदाची सूत्रे हाती घेणार आहेत. विशेष बाब म्हणजे श्रीचंद तेजवानी हे महाराष्ट्रातील भाजपचे पहिले सिंधी समाजाचे महापौर ठरणार असून अमरावतीच्या राजकारणात हा एक ऐतिहासिक क्षण मानला जात आहे. महापौर पदाची अधिकृत निवडणूक येत्या ६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. त्याआधीच भारतीय जनता पार्टीने अधिकृतपणे महापौर पदाचे उमेदवार जाहीर करून राजकीय चित्र स्पष्ट केले आहे. महापौरपदासह उपमहापौर, स्थायी समिति सभापती व इतर महत्त्वाच्या पदांचाही सत्तावाटपाचा फार्म्युला महायुतीतील घटक पक्षांमध्ये निश्चित करण्यात आला आहे.

फार्म्युल्यानुसार सुरुवातीचे अडीच वर्ष भाजपकडे महापौर पद राहणार असून उर्वरित अडीच वर्षात युवा स्वाभिमान पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) यांना महापौर पद देण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व घटक पक्षांना सत्तेत सहभागी करून घेत संतुलित कारभार करण्याचा प्रयत्न असल्याचे चित्र आहे. महापौरपदासाठी निवड झालेल्या श्रीचंद तेजवानी यांच्या नावामुळे सिंधी समाजात विशेष उत्साहाचे वातावरण असून भाजपने समाजाला प्रतिनिधित्वाची संधी दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे. दुसरीकडे, महायुतीच्या माध्यमातून शहराचा विकास, पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि वाहतूक व्यवस्थेवर लक्ष केंद्रित केले जाईल, असा दावा नेत्यांकडून केला जात आहे.

६ फेब्रुवारीच्या निवडणुकीनंतर अमरावती महानगरपालिकेत नवे नेतृत्व अधिकृतपणे सत्तेवर येणार असून आगामी पाच वर्षांच्या कारभाराकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

### उपमहापौर युवा स्वाभिमानकडे

उपमहापौरपद भाजपचा सहकारी पक्ष असलेल्या युवा स्वाभिमान पक्षाकडे देण्याचा निर्णय भाजपने घेतला असून या पक्षातर्फे सचिन भेंडे यांना संधी मिळू शकेल. स्थायी समिती सभापतीपद कुणाला मिळेल, हे अद्याप ठरलेले नाही.

# महिलेची लूट करणारे गजाआड

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**चांदूररेल्वे ,दि.२ :** चांदूररेल्वे येथे एका महिलेच्या घरात घुसून सुरीचा धाक दाखवत तिची लूट करणाऱ्या दोन अट्टल गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यात अमरावती ग्रामीण पोलिसांना यश आले आहे. २९ नोव्हेंबर २०२५ च्या रात्री घडलेल्या या थरारक घटनेत - आरोपींनी महिलेला धमकावून तिचे सोन्याचे कानसुलं आणि भ्रमणध्वनी हिसकावून नेला होता. या प्रकरणाचा छडा लावत पोलिसांनी - मध्यप्रदेशातील मांडला जिल्ह्यातून एकाला आणि चांदूर रेल्वेतून दुसऱ्या आरोपीला ताब्यात घेतले आहे. या धडाकेबाज कारवाईमुळे गुन्हेगारी वर्तुळात मोठी खळबळ माजली असून नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला आहे.

या घटनेची सविस्तर माहिती अशी की, - चांदूर रेल्वे शहरातील एका घरात शिरून दोन अनोळखी इसमांनी एका महिलेला सुरीचा धाक दाखवला. जिवाच्या भीतीने महिला हादरली असतानाच आरोपींनी तिच्याकडील विवो कंपनीचा भ्रमणध्वनी आणि दोन ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानसुलं असा ऐवज हिसकावून पळ काढला होता. या घटनेनंतर पोलीस विभागाने तपासाची चक्रे वेगाने फिरवली. तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी ३१ जानेवारी २०२६ रोजी मध्यप्रदेशातील मांडला जिल्ह्यातील घुगरी तालुक्यातील नाहरबेली येथील रहिवासी अनिल कुमार सुखराम उईके (२४ वर्षे) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे लुटलेला भ्रमणध्वनी मिळून आला. त्याची अधिक चौकशी केली असता, त्याने हा गुन्हा चांदूर रेल्वे येथील राजीव गांधी नगरमधील रहिवासी देवेंद्र महेंद्र पवार (२० वर्षे) याच्या सोबतीने केल्याची कबुली दिली.पोलिसांनी तातडीने दुसऱ्या आरोपीलाही ताब्यात घेतले असून त्याच्याकडून लुटीतील उर्वरित सोन्याचे दागिने हस्तगत करण्याचे काम सुरू आहे. ही यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर आणि चांदूर रेल्वेचे ठाणेदार अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाली. या पथकात पोलीस उपनिरीक्षक नितेश आमझरे, दुर्गेश इंदूरकर, भागवत कासार, कुमार बनकर आणि महिला पोलीस कर्मचारी शीतल चौधरी यांचा समावेश होता. या लूटमारीच्या घटनेत आरोपींनी महिलेचा भ्रमणध्वनी चोरून नेला होता. पोलिसांनी या भ्रमणध्वनीचा मागोवा घेतला असता त्याचे ठिकाण थेट मध्यप्रदेशातील मांडला जिल्ह्यात दिसून आले.

# दिवंगत अजितदादा यांच्या अस्थिकलश दर्शनासाठी सर्वपक्षीय कार्यकर्त्यांची गर्दी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**अमरावती, दि. २ :** दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांच्या अस्थीकलशाचे दर्शन घेण्यासाठी आज सोमवार दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांच्या रेल्वे स्टेशन चौक स्थित जनसंपर्क कार्यालय येथे अमरावती जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेतेमंडळी पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच विविध समाज संघटना तसेच शेकडो चाहत्यांनी मोठी गर्दी केली.यावेळी अस्थिकलशाचे विधिवत पूजन,दादांच्या पवित्र स्मृतींचे स्मरण करत, भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने सर्वत्र शोक व्यक्त होत आहे. अजितदादांच्या अंत्यसंस्कारानंतर मुंबई स्थित राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात विविधत पूजन केल्या नंतर संपूर्ण राज्यभर अस्थिकलश रवाना करण्यात आला.

अमरावती विभागातील पाच जिल्हे व एक वर्धा जिल्हा अशा ठिकाणी दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांचा अस्थिकलश पोहोचविण्याची जबाबदारी पक्षाचे महासचिव (संघटन) आ.संजय खोडके यांच्यावर सोपविण्यात आली. त्याअनुषंगाने आज दिनांक २ फेब्रुवारी रोजी आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांच्या रेल्वेस्टेशन चौक स्थित जनसंपर्क कार्यालय येथे सर्व सहा जिल्ह्यांचे अस्थिकलश आणण्यात आले. यावेळी सर्व अस्थिकलशाचे विधिवत पूजन करून महाराष्ट्राचे दिवंगत लोकनेता - अजितदादा पवार यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तदनंतर आ.सौ.सुलभाताई खोडके व आमदार संजय खोडके यांनी प्रत्येक जिल्ह्याचा अस्थिकलश हा त्या - त्या जिल्ह्यातील प्रमुख मंडळी व प्रतिनिधीकडे सुपूर्द केला.

तसेच अमरावती जिल्ह्यासाठी अजितदादा पवार यांचा अस्थिकलश आमदार - सुलभाताई खोडके यांच्या रेल्वे स्टेशन चौक स्थित जनसंपर्क कार्यालय येथे ठेवण्यात आला असता जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस परिवार,सर्वपक्षीय नेते व कार्यकर्ते तसेच सर्व नागरिकांनी दादांच्या अस्थिकलशाचे दर्शन करून, पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी दादांचा अमरावतीमधील चाहता वर्ग शेकडोंच्या संख्येने उपस्थित होता. महाराष्ट्राच्या राजकारणातील अजातशत्रू लोकनेता दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने सर्व चाहतावर्ग शोकसागरात बुडाला असून दादांच्या स्मृतीचे स्मरण करून आज लाडक्या लोकनेत्याप्रतीची आपली शोकसंवेदना प्रकट केली.

# ५ किलो एमडीसह चौघे जेरबंद

## अमरावती कनेक्शनने हादरले प्रशासन; आंतरराष्ट्रीय ड्रग्ज रॅकेट उघड

अजिंक्य भारत| प्रतिनिधी







**अमरावती, दि.२ :** अमरावती शहर अंमली पदार्थांच्या तस्करीत राज्यात मागे नसल्याचे पुन्हा एकदा उघड झाले आहे. नागपूर येथील विशेष पथकाने केलेल्या धडक कारवाईत नवसारी परिसरातील एका फ्लॅटमधून तब्बल ५ किलो एमडी ड्रग्ज जप्त करण्यात करून चौघांना अटक केली. जप्त केलेल्या ड्रग्जची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत सुमारे १० कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. गोलू आणि आवेश (दोन्ही रा. गवळीपुरा) अशी अटकेतील ड्रग्ज तस्करांची नावे आहेत. अतिशय गुप्त पध्दतीने मुंबईच्या पथकाने ही कारवाई केली. यासंपूर्ण प्रकरणात अमरावती पोलीस अनभिज्ञ होते.

मुंबई येथील महसूल गुप्तचर संचालनालय विभागाच्या पथकाला मुंबई येथून दोन युवक मोठ्या प्रमाणात एमडी ड्रग्जची तस्करी करीत असल्याची ठोस माहिती मिळताच त्यांनी दोन्ही युवकांचा शनिवारपासून मुंबई येथून ते पाठलाग करीत होते. दरम्यान दोन्ही युवक प्रथम नागपूरला उतरले. त्यानंतर ते कारने अमरावतीला आले तेव्हा पथकातील अधिकारीसुध्दा कारने त्यांच्या मागावर होते. रविवारी दुपारी दोन्ही युवक नवसारी येथील एका फ्लॅटमध्ये थांबले, तेव्हा पथकाने धाड घालून दोन्ही युवकांना ताब्यात घेतले. त्यांना ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता शहरातील गवळीपुरा येथे राहणारा गोलू आणि आवेश यांना एमडीड्रग्जची खेप देण्याकरिता आल्याचे सांगितले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी गोलू आणि आवेशला ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी सुरु केली. तसेच चौघांपासून पाच किलो एमडी ड्रग्ज जप्त केली, अशी माहिती सुत्रांकडून मिळाली. याकारवाईमुळे अमरावती पोलीस यंत्रणेची झोप उडाली असून, शहरातील वाढत्या ड्रग्ज नेटवर्कचा धक्कादायक पर्दाफाश झाला आहे. विशेष म्हणजे, या ड्रग्ज तस्करीमध्ये सहभागी असलेल्या आरोपींचे आंतरराष्ट्रीय स्तरावर संपर्क असल्याची माहिती समोर येत असून, यामुळे राज्यभरात एकच खळबळ उडाली आहे. अमरावतीसारख्या शहरात इतक्या मोठ्या प्रमाणात ड्रग्ज साठवणूक व तस्करी सुरू असताना, स्थानिक पोलिसांच्या गुप्तचर विभागाला याची भनकही लागू नये ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे. याप्रकरणामुळे अमरावती पोलीस विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, गुप्तचर यंत्रणा नेमकी काय करत होती? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

तर दुसरीकडे, यासंपूर्ण प्रकरणावर पोलीस आयुक्त कठोर भूमिका घेणार का?, तसेच स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ड्रग्ज तस्करीचे वाढते जाळे, तरुणाईचे भवितव्य धोक्यात घालणारा हा काळा धंदा आणि पोलीस यंत्रणेतील संभाव्य दुर्लक्ष या साऱ्यांमुळे अमरावती शहर पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे.

**आठवणींचा उजाळा** | राष्ट्रीय विद्यालयात १५ हजार प्रेक्षकांनी लावली उपस्थिती; माजी विद्यार्थी मेळावा ठरला कुंभमेळा

# तोंगलाबादला रंगला 'सांज आठवांची' बहारदार कार्यक्रम

अजिंक्य भारत| प्रतिनिधी







**दर्यापूर, दि. २ :** काय म्हणता तोंगलाबादकर!,शाळेत येऊन बर वाटत न!,आठवले का जूने कारनामे!,भेटल्या का जुन्या मैत्रिणी! असे आपल्या बहारदार आवाजाच्या शैलीत प्रेक्षकांना बोलके केले ते सुप्रसिद्ध मराठी हास्य कलाकार भारत गणेशपुरे यांनी व त्यांना आपल्या वेगळ्या शैलीने दाद दिली ते, हास्य जत्रा कलाकार गौरव मोरे व हेमांगी कवी,अंकुर वाढावे या कलाकारांनी व तुमच्या सहकारी चमूने बहारदार मराठी गाण्यावर नृत्य सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली.

प्रसंग होता तालुक्यातील तोंगलाबाद येथे राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय तोंगलाबाद या शाळेचा स्थापनेपासून आजपर्यंतच्या पाच हजार विद्यार्थ्यांचा राज्यातील ग्रामीण भागातील सर्वात मोठा भव्यदिव्य माजी विद्यार्थी मेळावा मोठ्या दिमाखदार संपन्न झाला.

मराठी चित्रपट दिग्दर्शक तथा माजी विद्यार्थी प्रा.निलेश रावसाहेब जळमकर दिग्दर्शित व के एल फूड इंडस्ट्री निर्मित सरगम मसाले अमरावती यांच्या सौजन्याने सांज आठवांची या बहादुर कार्यक्रमाने या माजी विद्यार्थी मेळाव्याला खरी रंगत आणली.याप्रसंगी राज्याचे माजी मंत्री तथा माजी विद्यार्थी गुलाबराव गावंडे यांच्या अध्यक्षतेखाली व खासदार बळवंतराव वानखडे, उपजिल्हाधिकारी राम अरुण लंके, माध्यमिक शिक्षण अधिकारी प्रिया देशमुख,जिल्हा बँकेचे संचालक सुधाकर पाटील भारसाकळे,श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारणी सदस्य हेमंतदादा काळमेघ,जिल्हा क्रीडा अधिकारी गणेशराव जाधव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पाटील गावंडे,खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष गजाननराव जाधव,रामशेठ मालपाणी, लोक कल्याण शिक्षण संस्थेचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीरंग पाटील अरबट,उपाध्यक्ष राजेंद्र जळमकर,माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष सदानंद जाधव,सहकार नेते अनिल पाटील जळमकर, संयोजक निलेश जळमकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शाळेच्या गुणवंत माजी विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला.यामध्ये राजकीय ,सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा,शिक्षण, उद्योग, पत्रकारिता, यशस्वी माता या क्षेत्रातील गुणवंतांचा सन्मान करण्यात आला. या पाच हजार विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचे उद्घाटन २९ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून झाली. याप्रसंगी उद्घाटक म्हणून शिक्षक आमदार किरण सरनाईक व प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे व लोक कल्याण शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, तोंगलाबाद,लासूर,धामोडी, गोळेगाव ग्राम पंचायत सरांचं व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला.

## थोडक्यात

### अल्पवयीन मुलीचा विनयभंग

शिरखेड : भावाच्या वाढदिवसाच्या वेळी परिचिताने १५ वर्षीय मुलीसोबत फोटो काढले. ते व्हायरल करण्याची धमकी देत तिच्यासोबत जवळीक साधण्याचा प्रयत्न करीत विनयभंग केला. शिरखेड पोलिसांनी सलमान शहा हसन शहा (२५) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करीत अटक केली.

### अतिक्रमणातून महिलेला मारहाण

अंजनगाव सुर्जी : सातेगाव येथे

जागेवर केलेल्या अतिक्रमणा मधून विनोद लक्ष्मीनारायण जैस्वाल (५०) व मनोज लक्ष्मीनारायण जैस्वाल (४२) यांनी वाद घालत शिवीगाळ केली. महिलेच्या तक्रारीवरून सरमसपुरा पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### घरातून तुरीचे कट्टे लंपास

अचलपूर : परतवाडा शहरातील ब्राह्मणसभा कॉलनीतील रहिवाशी पंकज सुरेशरोव घोरे (४०) यांच्या घराच्या ओट्यावरून अज्ञाताने १४ तुरीचे कट्टे चोरून नेली. त्यांची अंदाजे किंमत ४४ हजार रुपये आहे. परतवाडा पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### जामळा शिवारातून दोन म्हशींची चोरी

पथ्रोट : बँकेचे कर्ज काढून पशुपालक रघु गोंडुजी येवले (५९, रा. ठोकबर्डा) म्हशी घेतल्या. परंतु, चोरट्याने गोठ्यात बांधून बलेल्या दोन म्हशी चोरून नेल्या. ही घटना जामळा शेत शिवारात घडली. पशुपालकाच्या तक्रारीवरून पथ्रोट पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### वाळूसह पळवून नेला ट्रॅक्टर

आसेगाव : कारवाईदरम्यान वाळूसह ताब्यात घेतलेला ट्रॅक्टर अज्ञाताने पळवून नेत शासकीय कामात अडथळा आणला. मोहन श्रावणजी पाखरे (४९) यांच्या तक्रारीवरून आसेगाव पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध वाळू चोरीचा गुन्हा नोंदवला. या घटनेचा पुढील तपास आसेगावपूर्णा पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहे.

### कारखान्यातून साहित्य लंपास

अचलपूर : परतवाडा ते अमरावती मार्गावर महालक्ष्मी मंगल कार्यालयासमोर मुर्ती बनवण्याचा कारखाना आहे. अज्ञाताने तेथे चोरी करीत वेल्डिंग मशीन, ग्राईंडर आदीसह सुमारे ४३ हजारांचे साहित्य चोरून नेले. योगेश घनश्याम पेटकर (३७, रा. अचलपूर) यांच्या तक्रारीवरून अचलपूर पोलिसांनी चोरीचा गुन्हा नोंदवला.

### शेताच्या धुऱ्यावर ठेवलेली दुचाकी चोरली

धामणगाव रेल्वे : दानापूर ते जावरा मार्गावर दुचाकी उभी करीत फिर्यादी विजय ज्ञानेश्वर नंदेश्वर (३८, रा. जावरा, ता. चांदूर रेल्वे) हे त्यांच्या शेतात गेले. परत आले असता, त्यांना उभी केलेली दुचाकी (एमएच २७ -बीवाय २४५३) दिसून आली नाही. या प्रकरणी त्यांनी तळेगाव दशासर पोलीस ठाण्यात दुचाकी चोरीची तक्रार नोंदवली. अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

### शेंदोळा खुर्द येथे घरफोडी

तिवसा : शेंदोळा खुर्द येथे घरी कुणी नसताना अज्ञाताने घरफोडी करीत १६ हजारांचे साहित्य चोरून नेले. विनोद रामभाऊ निस्ताने (५६) यांच्या तक्रारी वरून गुन्हा दाखल केला.

### वाहनचालकावर गुन्हा दाखल

वरुड : भरधाव पिकअप वाहनाने दिलेल्या धडकेत दुचाकीवरील गुणवंत नाराण दंडाळे (३५) व फिर्यादी प्रकाश महादेवराव बथाल (५०) हे जखमी झाले होते. उपचारांती त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी पिकअप चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला.

# वर्षभरात पाचव्यांदा नियम मोडल्यास वाहन नोंदणी रद्द!

## चालकाचा परवानाही जाणार | परिवहन विभागाचे आदेश

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**अमरावती, दि.२ :** शहरात वाढते रस्ते अपघात, बेशिस्त वाहनचालक आणि त्यामुळे जाणारे निष्पाप जीव रोखण्यासाठी केंद्र सरकारने आतापर्यंतचे सर्वांत कठोर पाऊल उचलले आहे. केंद्रीय मोटार वाहन कायदा १९८९ मध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले असून, वारंवार वाहतूक नियम मोडणाऱ्या चालकांवर आता थेट कठोर कारवाई केली जाणार आहे. नव्या नियमानुसार, एका वर्षात पाच वेळा वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधित वाहनाची नोंदणी (रजिस्ट्रेशन) रद्द करण्यात येणार असून, चालकाचा ड्रायव्हिंग लायसन्सही कायमस्वरूपी रद्द केला जाणार आहे. शहरातील वाढती वाहतूक, बेदरकार वाहनचालक, वेगमर्यादेचे उल्लंघन, सिग्नल तोडणे, मद्यप्राशन करून वाहन चालवणे अशा घटनांमुळे अपघातांचे प्रमाण वाढत आहे. यावर आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

यामुळे रिपीट ऑफेंडर्स म्हणजेच वारंवार नियम मोडणाऱ्या चालकांना चांगलाच चाप बसणार आहे. मागील एक वर्षात अमरावती जिल्ह्यात हजारो चालकांनी वारंवार वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याची नोंद आहे. या चालकांमुळेच अपघातांची तीव्रता आणि संख्या वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे. नव्या कायद्यामुळे अशा वाहनचालकांवर नियंत्रण मिळण्याची शक्यता आहे.

आतापर्यंत अनेक चालक वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करत होते. मात्र, आता किरकोळ वाटणारी चूकही भविष्यात मोठ्या कारवाईस कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणे चांगलेच महागात पडणार आहे. रस्त्यावर वाहन चालवताना शिस्त पाळणे हे केवळ कर्तव्य नसून काळाची गरज आहे. यासाठी वाहतूक विभागाकडून नव्या मोटार वाहन कायद्याबाबत जनजागृतीही केली जात आहे. महत्त्वाचे म्हणजे, करण्यापूर्वी कारवाई वाहनचालकाला आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाणार आहे. संबंधित कारवाई चुकीची वाटल्यास

चालक किंवा वाहनमालक वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अपील करू शकणार आहे. मात्र, सीसीटीव्ही फुटेज किंवा डिजिटल पुराव्यांमधून नियम मोडल्याचे स्पष्ट झाल्यास कोणतीही शिफारस किंवा विनंती ग्राह्य धरली जाणार नाही. अशा परिस्थितीत विहित दंड आणि कठोर कारवाई अटळ असेल. केंद्र सरकारने मूळ मोटार वाहन कायद्यात सुधारणा करून प्रशासनाला अधिक अधिकार दिले आहेत. अपघातांचे प्रमाण कमी करणे आणि रस्ते सुरक्षा मजबूत करणे हा या बदलांचा मुख्य उद्देश आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यानंतर दंड भरण्यासाठी ४५ दिवसांचा ग्रेस पीरियड देण्यात येणार असून, या कालावधीत दंड भरल्यास कायदेशीर गुंतागुंत टाळता येणार आहे. नव्या वाहनचालकांनी अधिक जबाबदारीने वाहन चालवावे, हाच केंद्र सरकारचा स्पष्ट संदेश आहे.

# सीसीटीव्ही बसविण्यात कासवगती; सीईओंची ठेकेदाराला नोटीस

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**अमरावती, दि.२ :** विद्यार्थ्यांच्या, विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेस प्राधान्य देत जिल्हा परिषदेने शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली आहे. शासनाच्या निर्देशानुसार हा महत्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत असून, ही प्रक्रिया मात्र मंद गतीने सुरू असल्याने सीईओ संजिता महापात्र यांनी संबंधित कंत्राटदाराला नोटीस देत तातडीने सीसीटीव्ही लावण्याचे आदेश दिले आहे. पहिल्या टप्प्यात २५५ पैकी आजवर केवळ ५५ जिल्हा परिषद आले आहे. शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यातशासनाच्या आदेशावरून जिल्ह्यात पहिल्या टप्प्यामध्ये सर्वाधिक मुली असणार्या आणि शंभरपेक्षा अधिक पटसंख्या असणार्या २५५ शाळांची निवड करण्यात आली होती. याकरिता २ कोटी ३९ लाखांची तरतूद करीत या शाळांमध्ये सीसीटीव्ही संच बसविण्याला मंजुरात देण्यात आली.

याचा कंत्राट मागील वर्षी पुणे येथीलसुपर कॉम्प्युटरला देण्यात आला. दरम्यान, कंत्राटदाराकडून सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या व्हॅल्युएशनमध्ये वाढीव दराची मागणी करण्यात आली होती. मात्र, प्रशासनाने ही मागणी फेटाळून लावत शासकीय निधीच्या योग्य वापरावर ठाम भूमिका घेतली. या निर्णयामुळे काही काळ प्रक्रिया मंदावली. त्यामुळे सीईओंनी सदर कंत्राटदाराना नोटीस बजावित कामांना गती देण्याचे आदेश दिले. सद्यस्थितीत जिल्ह्यात ५५ शाळांमध्ये सीसीटीव्ही लावल्याचा दावा शिक्षणविभागाकडून केल्या जात आहे तर २०० शाळांमध्ये वायरींग लावण्यात आली आहे. त्यामुळे २५५ शाळांमधील सीसीटीव्ही लावण्याची प्रक्रिया केव्हा पूर्ण होणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. कारण पुढील टप्प्यात ५० पेक्षा अधिक पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये सीसीटीव्ही लावण्याचे नियोजन शिक्षण विभागाकडून केले जात आहे. एकूणच जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा ठरत आहे.

# पाचशे पर्यटकाचा भार सांभाळणार 'स्काय वॉक'

## स्काय वॉकचे फ्लोअर १२ मिलीमीटर जाडीच्या त्रिस्तरीय काचेचे

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**अमरावती, दि.२ :** विदर्भातील एकमेव थंड हवेचे ठिकाण म्हणून चिखलदरा प्रसिद्ध आहे. येथील निसर्ग सौंदर्याचा आनंद घेण्यासाठी देशभरातून पर्यटक येत असतात. आता या पर्यटनात स्काय वॉकची भर पडणार आहे. निसर्गाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी खोल दरीतूच चालण्याचा आणि हवेतून झेपावण्याचा आनंद पर्यटकांना काही दिवसांत घेणार आहे. या ठिकाणी भारतातील सर्वात लांबीचा काचेचा पूल (स्काय वॉक) उभारला जात आहे. या पुलाच्या डेक चे काम पूर्ण झाले आहे. पुढील महिन्यात या स्काय वॉकचे लोकार्पण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

स्काय वॉकची उंची २८० मीटर (अंदाचे ५९४ फूट) आहे. या स्काय वॉकचे फ्लोअर १२ मिलीमीटर जाडीच्या त्रिस्तरीय काचेचे असणार आहे. एकाचवेळी ५०० पर्यटकांचा भार सांभाळण्याची तसेच प्रतितास १९० किलोमीटर गतीचा वारा झेलण्याची क्षमता या काचेची राहणार आहे. हरिकेन आणि गोराघाट यादरम्यान सर्वसाधारण वाऱ्याचा वेग ताशी १६० किलोमीटर असतो. या प्रकल्पावर सुमारे ४० कोटी रुपये खर्च होत आहेत. इंदूर येथील ॲपिकॉन कंस्ट्रक्शन कंपनीला या कामाचे कंत्राट देण्यात

आले आहे. या स्काय वॉकच्या ४० मीटर उंचीच्या पिलरच्या कामाला फेब्रुवारी २०१९ मध्ये सुरुवात होऊन प्रकल्प फेब्रुवारी २०२१ मध्ये पूर्णत्वास जाणे अपेक्षित होते.मात्र, सिडकोने आवश्यक त्या परवानग्या न घेताच काम सुरू केल्यामुळे परवानगीच्या फेऱ्यात हा महत्त्वपूर्ण प्रकल्प अडकला होता. वन मंत्रालयाने घालून दिलेल्या अटी आणि शर्तीची पूर्तता केल्यानंतर या प्रकल्पाच्या कामाला पुन्हा सुरूवात झाली. आता या पुलाच्या डेकचे काम पूर्ण झाले आहे. आता काच लावणे व इतर किरकोळ कामे केली जाणार आहेत. त्यासाठी काही कालावधी लागू शकतो. मार्च २०२६ पर्यंत हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले असून त्या पद्धतीने कंत्राटदार कामाला गती देत असल्याचे दिसून येत आहे.

चिखलदरा येथे जंगल सफारी व व्याघ्र प्रकल्प असल्यामुळे देशभरातून पर्यटकांची पहिली पसंती चिखलदरा आहे. कॉफीच्या बागा, प्रसन्न वातावरण, पशु-पक्षांच्या शेकडो प्रजाती, डोंगर दऱ्यांच्या या परिसरात निसर्गाच्या सानिध्यात रममाण होण्याची प्रत्येकाचीच इच्छा असते.चिखलदरा येथे स्काय वॉकचे काम पूर्ण झाल्यानंतर जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला चालना मिळू शकेल. स्काय वॉक हे चिखलदरासाठी एक महत्वाचे केंद्र ठरणार असून पर्यटकांचा ओघ वाढेल, असे चिखलदरा हॉटेल ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष श्रीवर्धन करंडे यांनी सांगितले.

# कारागृहात झडती घेताना कैद्यांचा राडा

## जीवे मारण्याचीही दिली धमकी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**अमरावती, दि.२ :** मध्यवर्ती कारागृहात एका कैद्याने कारागृह प्रशासनाच्या कामात अडथळा निर्माण करून वरिष्ठ कारागृह अधिकाऱ्यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात संबंधित कैद्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० जानेवारी रोजी सायंकाळी ५.२० ते ५.५० च्या दरम्यान ही घटना घडली.

या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी कारागृहाचे अतिरिक्त अधीक्षक विकास भोईटे यांच्यावतीने कारागृह शिपाई ईश्वर डहाने यांनी दिलेल्या तक्रारीनुसार कैदी नितेश उर्फ सूर्या सोनू अनिल जैस्वाल (३३, रा. नागपूर) याच्याविरुद्ध ३१ जानेवारी रोजी उशिरा रात्री गुन्हा दाखल केला. एफआयआर नुसार, ३० जानेवारी रोजी सायंकाळी कारागृह प्रशासनाकडून बॅरेक क्रमांक ६ची नियमित झडती घेतली जात होती. यावेळी कारागृह शिपाई आणि अधिकारी कैद्यांच्या सामानाची तपासणी करत होते. वरिष्ठ तुरुंग अधिकारी देवराव जाधव आणि त्यांचे सहकारी कैदी नितेश उर्फ सुर्या सोनू अनिल जैस्वाल याच्या सामानाची झडती न घेऊ लागले, तेव्हा त्याने आक्रमक पवित्रा घेतला. नितेशने त्याची प्लास्टिकचे बादली व इतर साहित्य तपासण्यास विरोध केला. तपासणीदरम्यान नितेशने आरडाओरडा करत अधिकाऱ्यांना धमकावले. विशेष म्हणजे, या कारागृहातील अतिसंरक्षित अंडा बॅरेकसह आतील आवारात कैद्यांकडे सहा महागडे मोबाइल, आयफोन, बॅटरी तथा एक पेनड्राइव्ह आढळला होता. तत्पूर्वी, अनेकदा गांजाचे बॉल, चरसही आढळून आले आहेत. शिक्षाबंदी नितीश उर्फ सूर्या याच्याविरूद्ध सन २०१६ मध्ये बलात्कार, अनैसर्गिक अत्याचार, अपहरण व पोस्को अन्वये गुन्हा दाखल आहे. तो ३० जुलै २०१६ पासून नागपूर मध्यवर्ती कारागृहात न्यायाधीन बंदी म्हणून दाखल होता. मात्र, तेथे गैरवर्तन केल्याने २३ मार्च २०२३ रोजी त्याला अमरावती कारागृहात हलविण्यात आले. येथे देखील ३० जानेवारी रोजी तो अनियंत्रित झाला. त्यामुळे बॅरेक क्रमांक ६ मधील बंद्यांचाही त्याच्या विरोधात रोष निर्माण झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक अर्जुन राजमल्लू हे करत आहेत.

# बजेटने विद्यार्थी, शिक्षक, संस्थाचालक व कर्मचारी यांच्या तोंडाला पाने पुसली - रुपेश टाले

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**अंजनगाव बारी, दि.२ :** या बजेटमध्ये शिक्षण क्षेत्रासाठी अपेक्षेप्रमाणे भरीव तरतूद करण्यात आलेली नाही. सरकारी शाळा व महाविद्यालयांच्या सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी पुरेसा निधी दिला गेला नाही. विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व संशोधनासाठी असलेली मदत अपुरी वाटते, त्यामुळे गरीब व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना अडचणी येऊ शकतात बजेटमध्ये करदात्यांना कोणताही ठोस दिलासा देण्यात आलेला नाही. उत्पन्नकराच्या दरांमध्ये सवलत किंवा करमर्यादा वाढविण्याबाबत अपेक्षित निर्णय झाले नाहीत त्यामुळे विदयार्थी , शिक्षक , संस्थाचालक व कर्मचारी यांच्या तोंडाला या बजेट मध्ये पाने पुसली आहे.

# रमाबाई आंबेडकर जयंती महोत्सवाचे आयोजन

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**धामणगाव रेल्वे, दि.२ :** भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी त्यागमूर्ती मातोश्री रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त्याने दरवर्षी प्रमाणे यंदाही संविधान रक्षक जय संविधान सन्मान ग्रुप धामणगाव रेल्वे च्या वतिने विविध सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे . शनिवार दिनांक ७ फेब्रुवारी ला, सांय ४ वाजता पासून आयोजन केले आहे ,या मध्ये भंत्ते डॉ अभय बोधी यांच्या हस्ते बुद्ध वंदना व धम्म प्रवचन , चलो बुध्द की ओर डान्स ग्रुप, नंतर अनुसूचित जाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांचे व्याख्यान विषय अनुसूचित जातीवर झालेल्या अन्यायावर आयोगाची भूमिका, सुनील किटकरू यांच्या विषय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत भारतीय समाज त्या नंतर बुद्ध भिम गिंताचा महासंग्राम महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक प्रबोधनकार संविधान मनोहरे व दिपाली इंगळे यांच्या दणदणीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशांत मुन अध्यक्ष संविधान रक्षक जय संविधान सन्मान ग्रुप धामणगाव रेल्वे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असुन , समाजातील विविध सामाजिक संस्था व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मंडळी चा मातोश्री रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पुरस्कार प्रदान करण्यात येईल आहे. या कार्यक्रमाचा लाभ समस्त नागरिकांनी घ्यावा असे आवाहन रवि उर्फ दादू मेश्राम, प्रेम मोटघरे, सिध्दार्थ टाले, सदानंद कांबळे, भिमराव सहारे, अल्पेश बनसोड, राहुल भगत, आकाश मुन, इरफान अली, सेन्हल वानखडे, सीमा मुन, दिपाली जाधव, प्रनिता टाले, माधवी सावध, अरुणा भिल यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली.

**समस्या** | कृषीविभागाची रिक्त पदे भरण्याची शेतकऱ्यांची मागणी

# कृषी कार्यालयात सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांची पदे रिक्त

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**बेनोडा ( शहीद ), दि.२ :** वरुड तालुक्यात चार पाच वर्षापासून सहाय्यक कृषी अधिकारी व मंडळ अधिकारी तसेच लिपिक पद रिक्त आहे.तालुक्यातील शेतकऱ्यांनी सहाय्यक कृषी अधिकारी, व मंडळ अधिकारी तसेच लिपिक पद भरण्यासाठी लेखी निवेदन तहसीलदार वरुड ,उपविभागीय अधिकारी मोर्शी, जिल्हाधिकारी अमरावती ,आ.चंदू उर्फ उमेशभाऊ यावलकर , चंद्रशेखर बावनकुळे पालकमंत्री यांना अनेक वेळा निवेदन देण्यात आले.व आंदोलन करण्यात आले आणि स्वत: संबंधित अधिकारी व लोक प्रतिनिधी यांना जाऊन भेटले. शेतकऱ्यांनी भेट घेतली असता रिक्त पदे भरण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले. परंतु आज पर्यंत एकही पद भरण्यात आले नाही व शेतकऱ्यांना प्रतिसाद मिळाला नाही.म्हणून शेतकऱ्यासामोर प्रश्न निर्माण झाला आहे . कि न्याय कोणाकडे मागावा तसेच शेतकरी सततच्या पावसामुळे कर्जबाजारी झाला असून कर्जमाफी नाही .कार्यालयात सहाय्यक कृषी अधिकारी, व मंडळ अधिकारी तसेच लिपिक नाही.शेतकऱ्यांना केंद्र व राज्य सरकार च्या शासकीय योजना शेतकऱ्यापर्यंत पोहचत नाही.इतर अनेक गोष्टीसाठी शेतकऱ्यांना वरुड कृषीकार्यालयात चकरा मारावे लागत आहे.तालुक्यातील शेतकरी शासनाला कंटाळला असून सहाय्यक कृषी अधिकारी ५ व मंडळ अधिकारी २ तसेच लिपिक १ असे एकूण ८ पदाची नियुक्तीची वाट तालुक्यातील शेतकरी पाहत आहे.

> वरुड कृषीअधिकारी - रेहान मुजावर यांच्या कडून माहिती घेतली असता . माझ्या कार्यालयात ५ सहाय्यक कृषी अधिकारी, व २ मंडळ अधिकारी तसेच १ लिपिक असे एकूण ८ पदे रिक्त आहे.अशी त्यांच्याकडून माहिती मिळाली.
>
> - **पुरुषोत्तम पोटोडे**

# वैद्यकीय अधिकारी डॉ.साळुंके यांचा साहित्य संघातर्फे गुणगौरव व सत्कार

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**खोलापूर, दि.२ :** भातकुली तालुक्यातील खोलापूर आयुष्यमान आरोग्य केंद्राला राष्ट्रीय स्तरावरील एन्कॉस पुरस्कार देण्यात आला .

या पुरस्कारासाठी अथक परिश्रम घेणारे वैद्यकीय अधिकारी डॉ. धीरज कुमार साळुंके व सहकारी कर्मचारी यांचा श्री संत गजानन महाराज साहित्य संघ अमरावती जिल्हाध्यक्ष भा.बा. काळे गुरुजी यांच्या हस्ते शाल श्रीफळ व गुणगौरव सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रसिद्ध उर्दू व हिंदी साहित्यिक अब्दुल रजाक दिल , साहित्य संघाचे सचिव दिलीप ढोके, सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र रसे, पत्रकार कैलास बांगर, आयुष्यमान आरोग्य केंद्राचे कर्मचारी श्री रामेश्वर अंभोरे, प्रगती दहातोंडे बहुसंख्येने आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

## घटना - घडामोडी



### कलगावच्या डी.व्ही.एस.पी.एम. विद्यालयात प्रजासत्ताक महोत्सव

**दिग्रस :** कलगाव येथील डी.व्ही.एस.पी.एम. विद्यालयात विद्यार्थ्यांच्या क्रीडा गुणांना वाव देण्यासाठी प्रजासत्ताक महोत्सव आणि क्रीडा सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक महेश मांगलेकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि सरपंच अस्मिता मनवर, रवी पवार यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी विविध मनोरंजनात्मक खेळ आणि शिस्तबद्ध कवायती सादर केल्या. क्रीडा शिक्षक अविनाश गलाट यांच्या मार्गदर्शनाखाली हे सादरीकरण झाले. या महोत्सवात लिंबू चमचा, सुई दोरा, संगीत खुर्ची, चित्रकला, गायन, रांगोळी, पोत्यातून धावणे, स्लो सायकल आणि बटाटा शर्यत या स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच सूर्यनमस्कार, दंडकवायत, घुंगुर काठी, डंबेल्स आणि टिपरी नृत्य सादर करण्यात आले. कार्यक्रमाला सतीश राठोड, रामराव मनवर, आकाश मनवर, राजाराम राठोड, राजपाल बनसोड आणि फारुक उपस्थित होते. यावेळी यशवंत मनवर यांनी दहावीतील गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना प्रत्येकी २५०० रुपयांचे बक्षीस दिले. प्रास्ताविक ए. टी. रणखाम यांनी केले, तर सूत्रसंचालन ज्योती कुरसंगे यांनी केले. कार्यक्रमासाठी पारधी, बोरकर, राऊत, शिरभाते, तायडे, वाघमारे, भावे, थोरात, वानखेडे, दुधे, तळोकर, प्रमोद टेकाळे आणि कैलास चव्हाण यांनी परिश्रम घेतले.




### अणे महाविद्यालयाच्या शिबिरात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या कार्यावर व्याख्यान

**यवतमाळ :** येथील लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या लासीना येथील निवासी शिबिरात ३० जानेवारी रोजी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे जीवन व चरित्र' या विषयावर बौद्धिक सत्र पार पडले. संत साहित्याचे अभ्यासक सतपाल सोवळे यांनी शिबिरार्थींना उपाध्याय यांचे एकात्म मानव दर्शन आणि अंत्योदय तत्त्वज्ञान समजावून सांगितले. यावेळी सिकलसेल व थॅलेसेमियाविषयी जनजागृतीही करण्यात आली. लासीना येथील संत शिरोमणी गोरोबा विद्यालयात २८ जानेवारी ते ४ फेब्रुवारी दरम्यान हे शिबिर सुरू आहे. या बौद्धिक सत्राच्या अध्यक्षस्थानी ज्ञानेश्वर गटकर होते. सतपाल सोवळे यांनी उपाध्याय यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला. त्यानंतरच्या सत्रात मुक्तांगण बहुद्देशीय संस्थेचे विनोद राठोड यांनी सिकलसेल आणि थॅलेसेमिया या आजारांवर सविस्तर माहिती देत शिबिरार्थींच्या शंकांचे निरसन केले. तसेच या आजारांच्या जनजागृतीसाठी शपथ देण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोनिका बावणे हिने केले, तर आभार मयूरी राठोड हिने मानले. महाविद्यालयाचे प्राचार्य दुर्गेश कुंटे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी ममता दयणे, ज्ञानेश्वर गटकर, चंद्रशेखर कुडमेथे, मोनाली सलामे, सरिता देशमुख, नारायण वाघमारे, सपना दाढे, वैशाली वाटकर आणि नितीन वालदे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.


### टँकरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**उमरखेड :** तालुक्यातील खंडाळा-मुळावा मार्गावरील इनापूर फाट्याजवळ शनिवारी रात्री डिझेल टँकरने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात राहुल ढगे (२७, रा. सांडवा-माडवा) याचा जागीच मृत्यू झाला. लोणदरी येथील यात्रा आटोपून गावी परतत असताना टँकरच्या चाकात शीर अडकल्याने ते धडावेगळे झाले. अपघातानंतर टँकरचालक वाहन सोडून फरार झाला आहे. राहुल हा एमएच २९ बीएन ४६५७ क्रमांकाच्या दुचाकीने प्रवास करत होता. त्यावेळी समोरून आलेल्या एमएच ३० बीडी ०३७५ क्रमांकाच्या टँकरने त्याला धडक दिली. या अपघाताची भीषणता इतकी होती की, राहुलचे शीर धडापासून वेगळे होऊन टँकरच्या टायरमध्ये अडकले. घटनेनंतर चालकाने टँकर गंगनमाळ फाटा येथील रेल्वे कॅम्पमध्ये नेऊन उभा केला आणि तिथून पळ काढला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# जमिनीचे भाव वाढण्याऐवजी पडले

## रेल्वे प्रकल्पग्रस्तांचा टाहो; शेतकरी संतप्त, खासदार आष्टीकरांना निवेदन देत मांडली व्यथा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**उमरखेड, दि. २ :** वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वे प्रकल्पासाठी उमरखेड तालुक्यात नव्याने संपादित होत असलेल्या जमिनीला प्रशासनाकडून अत्यंत तुटपुंजा मोबदला मिळत असल्याने संतप्त शेतकऱ्यांनी रविवारी खासदार नागेश पाटील आष्टीकर यांची स्थानिक विश्रामगृहावर भेट घेऊन आपला टाहो फोडला. २०१३ च्या कायद्यानुसार चारपट मोबदला मिळावा, या मागणीचे निवेदन देत शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या लहरी कारभाराचा पाढा वाचला असता, खासदारांनी प्रशासनाशी चर्चा करून न्याय मिळवून देण्याचे ठाम आश्वासन दिले.

विदर्भाच्या विकासासाठी महत्त्वाचा मानल्या जाणाऱ्या रेल्वे प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असताना, उमरखेड तालुक्यात मात्र भूसंपादनाच्या दरावरून प्रशासनाने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे. रेल्वेसाठी अतिरिक्त जमीन संपादित करताना प्रशासनाने शेतकऱ्यांना विश्वासात न घेता मनमानी पद्धतीने दर निश्चित केल्याचा आरोप होत आहे. या अन्यायाविरोधात प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्याकडे धाव घेत आपली कैफियत मांडली. शेतकऱ्यांनी मांडलेली व्यथा धक्कादायक आहे. २०१७-१८ मध्ये याच रेल्वे प्रकल्पासाठी भूसंपादन झाले होते, तेव्हा शासनाने प्रति हेक्टर १६ लाख ५० हजार रुपये मोबदला दिला होता. आज सात वर्षांनंतर महागाई गगनाला भिडली असताना आणि जमिनीचे भाव वाढले असताना, २०२४-२५ मधील संपादनासाठी मात्र प्रशासनाने भाव वाढविण्याऐवजी तो १३ लाख रुपयांवर आणला आहे. ही तफावत संतापजनक आणि तर्कहीन असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. सदर जमीन ही उमरखेड शहरालगत आणि गावठाण परिसरात येते, तसेच येथील ९० टक्के क्षेत्र ओलिताखाली आहे. असे असतानाही कोरडवाहू जमिनीच्या दराने मातीमोल भावात शेतकऱ्यांची लूट सुरू आहे. रेल्वे भूसंपादन कायदा २०१३ अन्वये ग्रामीण भागात रेडिरेकनरच्या चारपट मोबदला मिळणे अपेक्षित असताना, यवतमाळ उपजिल्हाधिकारी आणि भूसंपादन विभागाने केवळ दोनपट दर लावून शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. प्रशासनाने या मागण्यांचा गांभीर्याने विचार न केल्यास उमरखेड तालुक्यातील रेल्वेचे काम बंद पाडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. यावेळी बिजोरे पाटील, शिवाजी बिजोरे, निरंजन जाधव, बाबाराम जाधव, बाबुराव जाधव, संभाजी जाधव यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बँक एनओसीचा 'अडसर' आणि फळबागांचे नुकसान

**प्रशासनाने केवळ जमिनीचा दरच पाडला नाही, तर जमिनीवरील इतर मालमत्तेकडेही सोयीस्कर दुर्लक्ष केले आहे. भूसंपादनात शेतातील पाईपलाईन, विहिरी, बोअरवेल आणि फळझाडांचा समावेश करून त्यांचे नव्याने 'फेरमूल्यांकन' करावे, अशी प्रमुख मागणी आहे. तसेच, मंजूर झालेला मोबदला उचलण्यासाठी बँकांच्या 'ना हरकत प्रमाणपत्रा'ची (NOC) जाचक अट घालण्यात आली आहे. कर्जाचा आणि या मोबदल्याचा संबंध जोडून शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी केली जात असल्याने ही अट तातडीने रद्द करावी, अशी मागणी जोर धरत आहे.**

## मांडवा येथे नागदिवाळी महोत्सव थाटात

### विविध स्पर्धा आणि दिंडीने वाढविली रंगत

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**घाटंजी, दि. २ :** तालुक्यातील मांडवा येथे २५ जानेवारी २०२६ रोजी माँ. मानिका देवी मंदिर सेवा समितीच्या वतीने नागदिवाळी महोत्सव मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. अजाबराव घरत, बुरेवार, सुरपाम आणि मडावी यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या महोत्सवात पारंपरिक बैलगाडी दिंडी, विविध क्रीडा व बौद्धिक स्पर्धा आणि महाप्रसाद अशा भरगच्च कार्यक्रमांनी ग्रामस्थांचा उत्साह द्विगुणीत केला.

या महोत्सवात स्पर्धा परीक्षा, पंजा लढविणे, रांगोळी आणि संगीत खुर्ची स्पर्धा रंगल्या. गुरुदेव सेवा मंडळाच्या सहकार्याने बैलगाडीतून काढलेल्या दिंडीने आणि मानिका देवी मंदिर फलक विमोचनाने कार्यक्रमाची शान वाढवली. रामभाऊ नारनवरे, प्रदीप सावसाकडे, मनोहर भरडे, अरविंद मंगरे आणि मोहन राऊत यांच्या भजनाने रंगत आणली. नितेश टेकाम आणि प्रशिक्षित रंदये यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. बक्षीस वितरण धनराज राऊत, विठ्ठल राऊत, विठ्ठल घरत, मनोहर भोयर, नंदु नारनवरे, राजु भरडे, अशोक रंदये, प्रवीण भरडे, मनोज शेंडे आणि गोवींद जांभुळे यांच्या उपस्थितीत झाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नितेश घरत, प्रवीण बारेकर, रुषीकेश घोडमारे, पवन नारनवरे, जय शेंडे, प्रदीप रंदये, रोशन नारनवरे, मंथन गायकवाड, तन्मय शेंडे, मनिष शेंडे, प्रमोद नारनवरे, संदीप जांभोरे, हर्ष जांभुळे, जगदीश शेंडे, अमोल शेंडे, लवकेश जांभुळे, प्राची शेंडे आणि रोशन सरवर यांनी परिश्रम घेतले.

## आर्णीतील सर्व शाळा होणार 'सीसीटीव्ही'मय

### शिक्षण समितीच्या सभेत ठराव मंजूर, आर्णी नगर परिषदेचा मोठा निर्णय

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**आर्णी, दि. २ :** आर्णी नगर परिषदेच्या शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसुविधांसाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, आता शहरातील सर्व नऊ शाळांमध्ये 'सीसीटीव्ही' कॅमेरे आणि शुद्ध पाण्यासाठी 'वॉटर फिल्टर' बसविण्यात येणार आहेत. शिक्षण सभापती संजय व्यवहारे यांच्या अध्यक्षतेखाली गांधीनगर येथील शाळेत शुक्रवार, ३० जानेवारी २०२६ रोजी पार पडलेल्या शिक्षण समितीच्या सभेत हा दिलासादायक निर्णय एकमताने घेण्यात आला.

आर्णी येथील नगर परिषद प्राथमिक मराठी शाळा क्रमांक ४ (गांधीनगर) येथे आयोजित या महत्त्वपूर्ण सभेला शिक्षण क्षेत्रातील मान्यवर आणि लोकप्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत परिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या नऊ शाळांमधील भौतिक सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. याप्रसंगी नगरसेविका निलोफर साजिद बेग, नगरसेवक काल्‍ू मलनस, नगरसेविका भावना मुनेश्वर, नगरसेवक विशाल मनवर आणि जयराज मुनेश्वर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच, सर्व शाळांचे मुख्याध्यापक आणि शिक्षक मोठ्या संख्येने हजर होते. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गांभीर्याने घेत समितीने सर्व शाळा 'सीसीटीव्ही'च्या निगराणीखाली आणण्याचा ठराव मंजूर केला. तसेच, विद्यार्थ्यांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे म्हणून प्रत्येक शाळेत 'वॉटर फिल्टर' बसविण्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. सभेच्या दुसऱ्या सत्रात शिक्षकांनी आपल्या विविध समस्या आणि शैक्षणिक अडचणी मांडल्या. या समस्यांवर सकारात्मक चर्चा करून त्या तातडीने सोडविण्याचे ठोस आश्वासन शिक्षण समितीच्या वतीने देण्यात आले. शाळेतील शैक्षणिक वातावरण अधिक सक्षम करण्यासाठी आणि गुणवत्ता वाढीसाठी आवश्यक उपाययोजनांवर यावेळी भर देण्यात आला. नगर परिषदेच्या या निर्णयामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.



### CAPTION खड्ड्यांचे 'ग्रहण'...



**झरी जामणी :** मुकुटबन येथील मुख्य रस्त्याची झालेली अत्यंत दयनीय अवस्था आणि त्यामुळे वाहनचालकांसह नागरिकांना सहन करावा लागणारा नाहक त्रास... शासन आणि संबंधित कंत्राटदाराच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे रस्त्याची झालेली चाळणी, परिणामी वाहतूक कोंडी आणि धुळीच्या त्रासाला सामोरे जात जीव मुठीत घेऊन कसरत करत मार्गक्रमण करणारे त्रस्त वाहनचालक व नागरिक. (छायाचित्र : मुजफ्फर बेग, मुकुटबन)

## नेरमध्ये विश्वकर्मा जयंती उत्साहात

### कौशल्य विकासावर भर देण्याचे आवाहन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नेर (परसोपंत), दि. २ :** स्थानिक मेन रोडवरील दत्त मंदिर सभागृहात ३१ तारखेला विश्वकर्मा जयंती उत्सव समितीच्या वतीने कारागिरांचे आराध्यदैवत भगवान विश्वकर्मा यांची जयंती भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. श्रमसंस्कृतीचे महत्त्व रुजविण्यासाठी आणि सामाजिक प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमात प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कौशल्य विकासासह समाजापुढील आव्हानांवर मंथन करण्यात आले.

कार्यक्रमात मान्यवरांनी आधुनिक काळात कौशल्य, नवकल्पना आणि स्वावलंबनावर भर देण्याची गरज व्यक्त केली. तसेच संघटना बळकट करून समाजाच्या वेदना शासनापर्यंत पोहोचवण्याचा निर्णय घेण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक प्रवीण पाटमासे यांनी केले, तर आभार मयूर काळे यांनी मानले. यावेळी दिवाकर पाटमासे, अंबादास पाटमासे, विनोद पाटमासे, अरुण काळे, दिलीप पाटमासे, प्रभाकर पाटमासे, गजानन मानेकर, दत्ता पराळे, नारायण जवणे, प्रदीप पराळे, राजेंद्र सरदारकर, विजेंद्र पाटमासे, मयूर काळे, बाबू लोहार, गजानन जवने, राजू जवने, विशाल पाटमासे, अंकुश राजुरकर, अनुप पाटमासे, सतीश पाटमासे, रजनी पाटमासे, लता काळे, रेखा पाटमासे, शारदा पाटमासे, नंदा पाटमासे, चंचल काळे, स्नेहल पाटमासे, भैरवी कोहळे, रेखा पराळे, शुभांगी जवने आणि रुपाली सरदारकर उपस्थित होते.

# आर्णीतील 'त्या' रस्त्याच्या कामाला अखेर सुरुवात!

## मनसेच्या 'दणक्या'ने प्रशासन जागे; डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते माहूर चौक रस्त्याचा शुभारंभ

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**आर्णी, दि. २ : शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते माहूर चौक या अत्यंत वर्दळीच्या रस्त्याच्या कामाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या आक्रमक पाठपुराव्यामुळे अखेर सुरुवात झाली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे खड्डेमय झालेल्या या रस्त्यासाठी मनसेने प्रशासनाला धारेवर धरताच यंत्रणा खडबडून जागी झाली असून, कामाचा शुभारंभ झाल्याने वाहनचालकांसह नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.**




शहरातील हा रस्ता नागरिकांच्या दैनंदिन दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मात्र, गेल्या काही काळापासून या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली होती. रस्त्यावर पडलेले जीवघेणे खड्डे, उखडलेले डांबर आणि पावसाळ्यात साचणारे पाणी यामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त झाले होते. अनेकदा तक्रारी करूनही प्रशासनाकडून केवळ आश्वासनांची बोळवण केली जात होती. या पार्श्वभूमीवर, मनसेने जनहिताचा हा प्रश्न हाती घेत आक्रमक भूमिका बजावली. स्थानिक पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून प्रशासनाला जाब विचारला आणि कामाला तात्काळ सुरुवात करण्याची मागणी लावून धरली. मनसेच्या या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि राजकीय दबावामुळे प्रशासनाला अखेर हालचाल करणे भाग पडले आणि आज प्रत्यक्षात रस्त्याच्या कामाला वेग आला आहे. "नुसते आश्वासन न देता प्रत्यक्ष काम करून दाखवणे हीच मनसेची कार्यपद्धती आहे," अशी प्रतिक्रिया देत मनसे पदाधिकाऱ्यांनी या यशाचे श्रेय एकजुटीला दिले आहे. या कामाच्या पाहणी व शुभारंभ प्रसंगी मनसे तालुकाध्यक्ष सचिन यलगंधेवार, शहराध्यक्ष कपिल ठाकरे, आकाश मालटवाड, अजय पिकलमूंडे, चंदन भगत, सूरज राठोड, महेश बांते, गौरव बाबरै आणि बलदेव आडे हे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. दरम्यान, हे काम दर्जेदार आणि टिकाऊ पद्धतीने व्हावे, त्यात कोणताही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. काम निकृष्ट दर्जाचे आढळल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही मनसेच्या वतीने प्रशासनाला व कंत्राटदाराला देण्यात आला आहे. मनसेच्या या राजकीय विजयामुळे आर्णीकरांनी समाधान व्यक्त केले आहे.

**नगरपंचायत कार्यालय, ढाणकी**
**ता. उमरखेड जिल्हा यवतमाळ**

न.प. फोन न. :- 07231 241022 | Email ID : dhankinp@gmail.com
जा.क्र./बांध.वि./ 64 /2025/2026 | दिनांक :- 02/02/2026

**ई-निविदा सूचना क्र. 08**

ढाणकी नगरपंचायतला विविध योजने अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून व नगरपंचायत निधीमधून करावयाचे विविध विकास कामी जसे - प्रशासकीय इमारत, व्यापारी संकुले, रस्ते, नाले, पाणी पुरवठा योजना, स्वच्छता व सौंदर्यकीकरण कामाचे नकाशे तयार करणे, डिझाईन, अंदाजपत्रक, तांत्रिक मार्गदर्शन व पर्यवेक्षन करणेसाठी अनुभवी अशा वस्तूविशारद/अभियंता/ अधिकृत तांत्रिक सेवा संस्था व प्रकल्प सल्लागारांचे पॅनल तयार करावयाचे आहे.

ई निविदेचा विस्तृत नमुना http://www.mahatenders.gov.in या वेबसाईट वर व नगर पंचायत नोटीस बोर्ड, बांधकाम विभागात दिनांक 03/02/2026 पासून पहावयास उपलब्ध आहे.

स्वा-
डॉ. अजय गोविंदराव कुरवाडे
मुख्याधिकारी,
नगरपंचायत ढाणकी

स्वा-
श्री. दत्तदिगांबर श्रीकृष्ण वानखेडे
उपाध्यक्ष,
नगरपंचायत ढाणकी

स्वा-
सौ. अर्चना सुंदरकांता वासमवार
अध्यक्ष,
नगरपंचायत ढाणकी

## महत्वाचे

### २३ लाखांची फसवणूक

**यवतमाळ :** वाहने नावावर करून देण्याच्या बहाण्याने खोटे दस्तावेज तयार करून एकाची २२ लाख ९५ हजार रुपयांनी फसवणूक करण्यात आली. ही घटना यवतमाळमधील प्रगती सोसायटी येथे घडली असून, १ फेब्रुवारी २०२६ रोजी अवधूतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंकुश विजय कोटेचा (३३, रा. प्रगती सोसायटी) असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. आरोपी जसपालसिंग (५५, रा. भिलाई, छत्तीसगड) याने अंकुश यांचा विश्वास संपादन केला. त्याने ८ लाख २५ हजार रुपयांचे जेसीबी मशीन आणि १४ लाख ७० हजार रुपयांचे सेल्फ लोडिंग मिक्सर ही वाहने अंकुश यांच्या नावावर करून देतो, असे सांगून त्यांच्याकडून पैसे घेतले. यासाठी त्याने खोटे दस्तावेज बनवले. मात्र, वाहने नावावर न करता पैशांचा अपहार करून फसवणूक केली. याप्रकरणी पोलिसांनी जसपालसिंग विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### वाहनाच्या धडकेत एक गंभीर

**यवतमाळ :** निवडणूक रॅलीमध्ये सहभागी झालेल्या एका व्यक्तीला भरधाव कारने चिरडल्याची घटना वंजारी फैल परिसरातील बलभीम आखाड्याजवळ घडली. ही घटना २१ डिसेंबर २०२५ रोजी घडली होती, ज्याचा गुन्हा १ फेब्रुवारी २०२६ रोजी दाखल झाला. जमील बाबूलाल शेख (५७, रा. वंजारी फैल) असे जखमीचे नाव आहे. ते रॅलीमध्ये पायी चालत असताना एमएच ३४ एए १२७७ या क्रमांकाच्या स्विफ्ट कार चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवून त्यांना धडक दिली. इतकेच नाही तर वाहनाचे चाक त्यांच्या पायावरून गेल्याने ते गंभीर जखमी झाले. अपघातानंतर चालक वाहन सोडून पळून गेला. याप्रकरणी यवतमाळ शहर पोलिसांनी कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### आष्टोणा येथे घरफोडी

**वडकी :** घरमालक बाहेरगावी गेल्याची संधी साधत अज्ञात चोरट्याने घरफोडी करून १० हजार रुपयांची रोकड लंपास केली. ही घटना राळेगाव तालुक्यातील आष्टोणा येथे २९ ते ३० जानेवारी दरम्यान घडली.फिर्यादी मधुकर विठ्ठल आत्राम (४८, रा. आष्टोणा) हे आपल्या कुटुंबासह घराला कुलूप लावून बाहेरगावी गेले होते. यादरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या दरवाजाचा कडीकोंडा तोडून आत प्रवेश केला. घरातील कपाटात ठेवलेल्या स्टीलच्या डब्यातील १० हजार रुपये रोख रक्कम चोरून नेली. घरी परतल्यावर चोरी झाल्याचे लक्षात आले. याप्रकरणी १ फेब्रुवारी रोजी वडकी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांपासून राळेगाव तालुक्यात चोरी, घरफोडी आदींच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. त्यामुळे पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्न उपस्थित होत आहे.

# शेतकऱ्याने पिकवावे अन् स्वतःच विकावे

## एकात्मिक शेतीचा कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी दिला 'कानमंत्र'; उमरखेडमध्ये भाऊसाहेब माने कृषी गौरव पुरस्काराचे थाटात वितरण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी





**उमरखेड, दि.२ :'केवळ पारंपरिक शेतीवर अवलंबून न राहता शेतकऱ्यांनी 'एकात्मिक शेती'पद्धतीचा अवलंब करणे काळाची गरज आहे. शेतकऱ्यांनी आता केवळ पिकविणारे न होता, आपल्या मालावर प्रक्रिया करून स्वतःची बाजारपेठ निर्माण करावी. ज्या दिवशी शेतकरी आपल्या मालाचा भाव स्वतः ठरवेल, त्या दिवशी त्याची खरी आर्थिक उन्नती होईल,' असा मोलाचा कानमंत्र अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी दिला. ते उमरखेड येथील कृषी महाविद्यालयाच्या प्रांगणात रविवारी (दि.२) आयोजित 'सहकारमहर्षी भाऊसाहेब माने राज्यस्तरीय कृषी गौरव पुरस्कार'वितरण सोहळ्यात बोलत होते.**

> **'शेतकरी हा केवळ राबणारा नसून तो अनुभवाच्या आधारावर नवनवीन प्रयोग करणारा खरा संशोधक असतो. त्याने आत्मसात केलेल्या तंत्रज्ञानावर त्याचा ठाम विश्वास असतो. महाराष्ट्रातील नामवंत शेतकरी, शास्त्रज्ञ आणि कृषी उद्योजक यांनी एकत्र येऊन केलेले हे मंथन सर्व शेतकऱ्यांसाठी दिशादर्शक आहे. येथील ज्ञानाचा उपयोग करून प्रत्येक शेतकऱ्याने आपली शेती समृद्ध करावी.'**
>
> **-डॉ. शरद गडाख,**
> **कुलगुरू,**
> **डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला.**

> **'लोकनेते स्व. भाऊसाहेब माने यांच्या स्मृतिदिनानिमित्त गेल्या २५ वर्षांपासून हा कृषी सोहळा अविरत सुरू आहे. 'ट्रान्स्फर ऑफ टेक्नॉलॉजी' या संकल्पनेतून शेतीतील नवीन तंत्रज्ञान, संशोधन आणि प्रक्रिया उद्योगाची माहिती थेट शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचविण्याचे कार्य या उपक्रमातून केले जात आहे.'**
>
> **-डॉ. विजय पं. माने,**
> **सहयोगी अधिष्ठाता, अन्न व तंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ.**

### प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींचा गौरव

**शेतकऱ्यांचे प्रश्न आणि यशोगाथा समाजासमोर मांडणाऱ्या पत्रकारांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. पश्चिम विदर्भातील अग्रगण्य दैनिक 'अजिंक्य भारत'चे (मुंबई) संपादक तीक्ष्णगत सुगत वाघमारे आणि दैनिक 'सकाळ'चे (छत्रपती संभाजीनगर) उपसंपादक संतोष मुंडे यांना 'कृषी प्रसार व पत्रकारिता गौरव पुरस्काराने'मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.**

सहकारमहर्षी भाऊसाहेब माने यांच्या ३३ व्या स्मृतिदिनानिमित्त रविवारी (दि. १ फेब्रुवारी) हा भव्य सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यवतमाळ येथील अन्न व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजय माने होते. कार्यक्रमाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या हस्ते झाले. या कृषी सोहळ्याला खासदार नागेश पाटील आष्टीकर, आमदार किसनराव वानखेडे, रोजगार हमी योजनेचे आयुक्त भारत बाष्टेवाड (नागपूर), माजी रेशीम संचालक कॅप्टन लक्ष्मीकांत कलंत्री,भाजपचे पूर्व विदर्भ समन्वयक नितीन भुतडा, संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, चोंढीकर, गणेश शिंदे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष अशोकराव वानखेडे, शिवराम धोडके, जिल्हा कृषी अधीक्षक मनोजकुमार ढगे, उपविभागीय कृषी अधिकारी विजय मोकाडे, माजी आमदार विजय खडसे, माजी आमदार नामदेव ससाणे, काँग्रेस नेते तातू देशमुख, राम देवसरकर, कल्याणराव माने, ए. के. मिश्रा, कृषी शास्त्रज्ञ डॉ. नितीन कोष्टी, वासुदेव चांदुरकर, बाबूराव पाथ्रडकर, वसंत फुके, श्रीकांत अमरशेट्टीवार, डॉ. संदीप कदम, डॉ. मयूर ढोले आणि प्राचार्य डॉ. सचिन चिंतले आदी मान्यवर उपस्थित होते.

कृषी क्षेत्रातील 'रत्नां'चा गौरव या सोहळ्यात शेतीत नवनवीन प्रयोग करणाऱ्या २६ कर्तृत्ववान शेतकरी, शास्त्रज्ञ, उद्योजक आणि पत्रकारांचा यथोचित सन्मान करण्यात आला. रेशीम उद्योगातील अतुलनीय योगदानाबद्दल नागपूरचे डॉ. महेंद्र ढवळे यांना मानाचा 'सत्यशोधक भाऊसाहेब माने कृषी जीवन गौरव पुरस्कार'देऊन गौरविण्यात आले. कृषी पर्यटनाचे प्रणेते पांडुरंग तावरे (बारामती), पांडुरंग आवाड (धाराशीव), कृष्णकुमार राठी (अकोला), दिशा उदगीरकर (अकोला), अंकिता मोरे पाटील (जालना), रवींद्र मेटकर (अमरावती), बाबाजी बांगर (पुणे), अजिंक्य कांबळे (पुणे), गोविंद पवार (नांदेड), श्रीपत राठोड (नागपूर), कृष्णराव देशेट्टीवार (यवतमाळ), पूजा जिनेवाड-संगणवार (घाटंजी), संतोष देशमुख, सुरेंद्र नारखेडे (अकोला), मिलिंद देशमुख (राहुरी), डॉ. मनोज माळी (सांगली), डॉ. एन. एम. कोंडे, डॉ. आम्रपाली आखरे आणि डॉ. किशोर बिडवे (अकोला) यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. उमरखेड तालुक्यातील प्रयोगशील शेतकऱ्यांनाही यावेळी 'आदर्श शेतकरी प्रोत्साहन पुरस्काराने'सन्मानित करण्यात आले. यामध्ये खरबी येथील वंदन पांडे, सुकळीचे दत्ता वानखेडे, पोफाळीचे सतीश जामकर आणि खरूसचे समाधान वानखेडे यांचा समावेश होता. केवळपुरस्कार वितरण न होता, यावेळी ज्ञान, अनुभव, कौशल्य आणि विचाराची देवाणघेवाण झाली. रेशीम संचालक डॉ. महेंद्र ढवळे, पांडुरंग तावरे, पांडुरंग आव्हाड, सुरेंद्र नारखेडे, दिशा उदगीरकर, श्रीपत राठोड, अंकिता मोरे, आणि रवींद्र मेटकर आणि कृष्णकुमार राठी यांनी आपले शेती आणि प्रक्रिया उद्योगातील अनुभव कथन केले. संघर्षातून मिळवलेले यश आणि प्रयोगांची माहिती ऐकताना उपस्थित शेतकरी मंत्रमुग्ध झाले होते. कार्यक्रमाचे नेटके सूत्र संचालन सुनील वानखेडे यांनी केले, तर आभार उद्धव गायकवाड यांनी मानले.

CAPTION **एकोप्याचा जागर.......**



**आर्णी : संपूर्ण महाराष्ट्रात हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतीक आणि मानवतेची शिकवण देणारे श्रद्धास्थान असलेल्या आर्णी येथील हजरत बाबा कंबलपोष व हजरत सैय्यदी बच्चू बाबा यांच्या उर्स शरीफनिमित्त दर्गा परिसरात सुरू असलेली लगबग... ५ ते १० फेब्रुवारी दरम्यान भरणारी ही यात्रा, तसेच ५ तारखेला निघणारे शाही संदल आणि ७ तारखेच्या फातेहा कार्यक्रमासाठी बाबा कंबलपोष दर्गा ट्रस्टतर्फे करण्यात आलेली जय्यत तयारी आणि विदर्भ-मराठवाड्यातून येणाऱ्या लाखो भाविकांच्या स्वागतासाठी सज्ज झालेली आर्णी नगरी. (छायाचित्र : मनोज माघाडे)**

# आरोग्य शिबिराचा ४५३ रुग्णांना लाभ

## आर्णी येथे मोफत आरोग्य तपासणी व औषध वितरण शिबिर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**आर्णी,दि. २ :** येथील नगर परिषद शाळा क्रमांक १ मध्ये नगरसेवक डॉ. नाहिद आरीज बेग यांच्या पुढाकाराने प्रभाग क्रमांक ८, ९ आणि १० मधील नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी व औषध वितरण शिबिर पार पडले. या शिबिरात नागपूरचे मधुमेह तज्ज्ञ सुनील गुप्ता आणि स्थानिक आरोग्य विभागाच्या पथकाने ४५३ रुग्णांची रक्तदाब, मधुमेह, सिकलसेल आणि कुष्ठरोगासह विविध आजारांची तपासणी केली.

शिबिराच्या उद्घाटनाला माजी मंत्री शिवाजीराव मोघे, आरीज बेग मिर्झा, नगराध्यक्ष नालंदा भरणे आणि अनिल आडे उपस्थित होते. डॉ. फैजान खान व डॉ. निलोफर खान यांनी रुग्णांची तपासणी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी निता ठाकरे, रियाज सय्यद, शफी मलनस, अश्विनी राऊत, यास्मिन शाह, प्रीती शिवरामवार, भावना मुनेश्वर यांनी परिश्रम घेतले. यावेळी राजू बुटले, माधवराव जाधव, श्याम गुटे, शिवरामवार, सागर घोडेराव, गफूर शाह, मकबूल शाह, खुशाल ठाकरे, संजय राऊत, गजानन राठोड, गणेश चिल्लरवार, विनोद माहेश्वरी, अमित पवार, गीता सनसेटवार, गिरिधर कुबडे, प्रसेनजीत खंडारे, ख्वाजा शेख लाल, दीपक देवतळे, तन्मय बागुल यांनी भेट दिली. डॉ. सुनील गुप्ता, रमा बाजोरिया, आरती नाटकर, सुनील भवरे, राम पद्मावार यांच्या सहकार्याने हे शिबिर यशस्वी झाले. लवकरच इतर भागातही असे शिबिर घेण्याचा मानस नाहिद बेग यांनी व्यक्त केला.

# धम्म हा जीवनाला समृद्ध करणारा निर्मळ झरा

## भदन्त डॉ. खेमधम्मो महाथेरो : मुळावा येथे २१ वी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद उत्साहात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २ : 'धम्म हा अथांग सागरासारखा विशाल असून, त्याचे आचरण हे वाहत्या निर्मळ झऱ्याप्रमाणे मानवी जीवन समृद्ध करणारे आहे,' असे मौलिक प्रतिपादन बौद्ध धम्माचे गाढे अभ्यासक आणि प्रख्यात विचारवंत भदन्त डॉ. खेमधम्मो महाथेरो यांनी केले. उमरखेड जवळील मुळावा येथे माघ पौर्णिमेच्या पर्वावर १ फेब्रुवारी रोजी आयोजित २१ व्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेत 'धम्म आणि संस्कार' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.**



भारतीय बौद्ध ज्ञानालंकार शिक्षण संस्था, मुळावा यांच्यावतीने आयोजित या भव्य परिषदेच्या अध्यक्षस्थानी भदन्त धम्मसेवक महाथेरो हे होते. यावेळी विचारपीठावर नांदेड येथील डॉ. एम. सत्यपाल महाथेरो, मुळावा येथील भदन्त दयानंद महाथेरो आणि श्रीलंकेतून धम्म शिक्षण घेऊन आलेले छत्रपती संभाजीनगर येथील भदन्त धम्मज्योती थेरो यांची प्रमुख उपस्थिती होती. या सर्वांनी समयोचित धम्मदेसना दिली. आपल्या ओघवत्या शैलीत विचार मांडताना डॉ. खेमधम्मो पुढे म्हणाले की, 'आजचा समाज विषमतेने आणि जातीयतेने बरबटलेला आहे. या गढूळलेल्या वातावरणात माणूस सुखाच्या लालसेने सैरावैरा धावत आहे, परंतु त्याला खरे सुख सापडत नाही. अशा अवस्थेत अडीच हजार वर्षांपूर्वी तथागत बुद्धांनी मानवी कल्याणासाठी दिलेला दुःखमुक्तीचा मार्गच एकमेव उपाय आहे. धम्माच्या सेवनानेच माणसाचा सर्वांगीण विकास शक्य आहे.' या दोन दिवसीय परिषदेची सुरुवात पहाटे ५ वाजता धम्मध्वजारोहणाने झाली. या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे, येथे आमंत्रित पूजनीय भिक्खू संघाला धम्माचे वेगवेगळे विषय दिले जातात आणि त्यावरच ते सखोल मार्गदर्शन करतात. यामुळे या परिषदेला एक शिस्तबद्ध आणि आगळेवेगळे स्वरूप प्राप्त झाले आहे. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने भिक्खू, भिक्षुणी आणि उपासक-उपासिका उपस्थित होते.

# तिरळे कुणबी समाज संघटनेच्या अध्यक्षपदी अशोक बेले

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. २ :** येथील श्रीराम मंदिरात पार पडलेल्या बैठकीत तिरळे कुणबी समाज संघटनेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार अशोक बेले यांची बिनविरोध निवड करण्यात आली. दिगांबर भोयर यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रेमराव वखरे यांच्या उपस्थितीत झालेल्या या सभेत उपाध्यक्षपदी वसंत भोंग, ग्रामीण उपाध्यक्षपदी प्रभाकर ठाकरे आणि सचिवपदी अक्षय कडू यांची निवड करून समाजहिताचा संकल्प करण्यात आला.

सभेत वसंतराव पडोळे यांनी बेले यांचे नाव सुचवले, ज्याला सर्वांनी एकमताने अनुमोदन दिले. अशोक बेले हे पांढरकवडा प्रेस क्लबचे अध्यक्ष असून त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत ही जबाबदारी देण्यात आली. निवडीनंतर बेले यांनी शैक्षणिक मदत, विद्यार्थी मार्गदर्शन, बेरोजगार युवकांसाठी प्रशिक्षण आणि महिला सक्षमीकरणासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच संघटना बळकट करण्यासाठी समाजबांधवांनी सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले. बैठकीत ग्रामीण विद्यार्थ्यांचे प्रश्न, शेतकरी मार्गदर्शन आणि सामाजिक ऐक्यावर चर्चा झाली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला आणि पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी उपस्थित समाजबांधवांनी नव्या कार्यकारिणीकडून प्रभावी कार्याची अपेक्षा व्यक्त केली.